अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# मातृसेवा संघ

विनया खडपेकर




राज्य मराठी विकास संस्था

[अनुक्रमणिका]

अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# मातृसेवा संघ

विनया खडपेकर

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

अनुक्रमणिका

**अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण प्रकाशन क्र. ६**
**मातृसेवा संघ**

ARVACHIN MAHARASHTRACHI JADANGHADAN PRAKASHAN No. 6
MATRUSEVA SANGH

**आय. एस. बी. एन. क्रमांक :** 81-87889-57-8

**संगणकीय आवृत्ती :** २७ फेब्रुवारी, २०१५

**पहिली आवृत्ती :** मार्च २०००

**© राज्य मराठी विकास संस्था**

**प्रकाशक**
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१.
दूरध्वनी : - ०२२-२२६३१३२५, फॅक्स : ०२२-२२६५३९६६
ई-मेल : - rmvs_mumbai@yahoo.com
संकेतस्थळ : rmvs.maharashtra.gov.in

**अक्षरजुळणी व मांडणी**
**कुमार कॉम्प्यूटर्स**
'अनुष्का' सर्वे नं.१३/४/१, लेन नं.३०-३१,
धायरी, मुक्ताई गार्डनजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
ई-मेल : - nandu@kumarcomputers.in
संकेतस्थळ : www.kumarcomputers.in

**इ-पुस्तक रूपांतर**
**सीडॅक, पुणे**
सीडॅक-प्रगत संगणक विकास केंद्र,
वेस्टएण्ड सेंटर – III, स.नं. १६९/१, सेक्टर – II
औंध, पुणे – ४११००७

**विनामूल्य वितरणासाठी**
ह्या इ-पुस्तकाचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेच्या अधीन असून हे पुस्तक जनतेसाठी विनामूल्य स्वरूपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक आपण स्वतःसाठी विनामूल्य उतरवून घेऊ शकता. परंतु त्याची प्रत करताना अथवा दुवा इतरांना देताना पैसे आकारणे, ह्या पुस्तकाची नक्कल करून त्याची विक्री करणे, किंवा या इ-पुस्तकाची प्रत आपल्या संकेतस्थळावर घालणे इ. गोष्टी करणाऱ्या व्यक्ती वा संस्था आढळल्यास त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

*कै. कमामावशीस*
*मातृसेवा संघाने तुझ्या आयुष्याला उभारी दिली.*
*तू कृतज्ञतेने या संस्थेची स्मृती मनात नित्य जपलीस,*
*ती माझ्यापर्यंत पोहोचली. हे पुस्तक तुझ्या स्मृतीलाच अर्पण*

**-विनया**

अनुक्रमणिका

## जडणघडण मालिकेविषयी

'अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण' या पुस्तक्मालेची आखणी राज्य मराठी विकास संस्थेने एक विशिष्ट उद्धिष्ट डोळ्यांपुढे ठेवून केली आहे. ज्यांच्या कार्तुत्त्वातून, प्रयत्नातून आणि प्रभावांतून आजचा महाराष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात आकाराला आला आहे अशा व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह यांचा परिचय या मालेतून सर्वसामान्य शिक्षित वाचकांना आम्हाला करून द्यायचा आहे. त्यासाठी निश्चित केलेल्या विविध विषयांवर मान्यवर लेखकांकडून जसजशी पुस्तके लिहून हाती येतील तसतशी ती संस्थेकडून प्रसिद्ध केली जाणार आहेत.

या मालेतील पहिले पुस्तक श्री. म. श्री. दीक्षित यांचे 'महाराष्ट साहित्य परिषद'. हे पुस्तक महाराष्ट्रातील एका विख्यात साहित्य संस्थेच्या कार्याविषयीचे आहे. कृ. श्री. अर्जुनवाडकर लिखित 'मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य' हे दुसरे पुस्तक दामल्यांच्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणा'ला मध्यवर्ती ठेवून मराठी व्याकरण विचाराची आजवर झालेली वाटचाल सांगणारे आहे. हेमंत इनामदार लिखित 'प्रा. गं. बा. सरदार : व्यक्ती आणि कार्य' हे पुस्तक प्रा. सरदारांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कार्याचा परिचय करून देते. मृणालिनी जोगळेकर लिखित 'काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य' या पुस्तकात कालेलकरांच्या अपरिचित चरित्राची व लेखनाची ओळख जशी होते तशीच गांधीवादी जीवनदृष्टीच्या प्रभावाचीही जाण वाचकाला होते. मोहिनी वर्दे लिखित 'बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य' या पुस्तकातून 'बालगंधर्व' नावाच्या घडून गेलेला चमत्कार मराठी रंगभूमी व संगीतपरंपरेच्या अनुषंगाने उलगडला जातो.

'मातृसेवा संघ' हे विनया खडपेकर यांचे पुस्तक या मालिकेतील सहावे पुस्तक आहे.

श्रीमती कमलताई होस्पेट आणि नागपूरचा मातृसेवा संघ ही नावे महाराष्ट्रातील सुशिक्षितांनाअपरिचित नाहीत. तथापि, ज्या व्यक्तिगत आणि सामाजिक परीस्थितीत कामालाताईंनी त्यांचे अजोड सेवाकार्य उभे केले त्याची पुरेशी जाणीव मात्र अगदीच थोड्या व्यक्तींना आहे. विनया खडपेकर यांच्या 'मातृसेवा संघ' या पुस्तकात गेल्या पाऊणशे वर्षात झालेल्या सामाजिक स्थित्यंतरांचा आलेख प्रगटला आहे आणि भोवतालच्या स्त्री-समस्या सोडवता सोडवता कामालाताईंसारख्या कार्तुत्वसंपन्न स्त्रियांचे व्यक्तित्वही कसकसे घडत जाते यांचे दर्शन घडते आहे.

विनया खडपेकर या सामाजिकतेचे भान असलेल्या एक नामवंत कथालेखिका आहेत. त्यांचे कथासंग्रह आणि आयुष्यात वेगळ्या वाटेने चालत गेलेल्या स्त्रियांच्या अनुभवांचा वेध घेणारे 'स्त्रीस्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तन' सारखे लेखन, विशेष गाजलेले आहे. 'जडणघडण' मालेसाठी त्यांनी 'मातृसेवा संघ' या संस्थेविषयी लेखन केले याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

'जडणघडण' मालेतील सर्व पुस्तकांचे बाह्यांग सारखेच राहणार आहे. तथापि, या पुस्तकांचे व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह असे तीन गट असतील आणि त्यानुसार मुखपृष्ठांचे तीन वेगवेगळे रंग राहतील.

**-सरोजिनी वैद्य.**

अनुक्रमणिका

# मनोगत

स्वयंसेवी संस्था या सामाजिक घटकात मला मनःपूर्वक रस वाटतो. कोणत्याही स्थळी, कोणत्याही काळी स्वयंसेवी संस्था – पन्नास वर्षांपूर्वी अधिक काळ टिकलेल्या संस्था- ही सामाजिक इतिहासातील, महत्वपूर्ण घटना असते. समाजात परिवर्तन करू इच्छिणाऱ्या व्यक्ती एका विचारकेंद्राकडे आकर्षित होतात, त्या दृष्टीने कृती करण्याचे योजतात, तेव्हा स्वयंसेवी संस्थेचा जन्म होतो. तीतून परिवर्तनाचे आणि कृती प्रक्षेपित करण्याचा प्रयत्न सुरु होतो. हा प्रयत्न कधी यशस्वी होतो, कधी अयशस्वी होतो. परंतु कोणतीही संस्था हा एक सामाजिक प्रयोग असतो. काही संस्था अल्पजीवी असतात, काही दीर्घजीवी असतात. काही संस्था रूटूखुटू चालत राहतात, काही बंद होतात. काही संस्था मर्यादित वर्तुळात चिकाटीने कार्यरत राहतात, तर काही संस्था जोमाने विस्तारत, बहरत जातात. परंतु पन्नास वर्षांच्या पुढे देखील आपले कार्यक्षेत्र विस्तारत टिकून राहणारी संस्था म्हणजे परिवर्तनाच्या मार्गावरचा महत्वपूर्ण टप्पा असतो. राज्य मराठी विकास संस्थेच्या 'महाराष्टाची जडणघडण' या लेखन प्रकल्पात म्हणूनच मी आनंदाने सहभागी झाले.

महाराष्ट्राच्या स्त्री-जीवनात तर स्वयंसेवी संस्थांचे योगदान अपूर्व आहे. स्त्रीचे जीवन सुसह्य-सुखकर–अर्थपूर्ण करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था उभ्या राहिल्या आणि राहत आहेत. नागपूरची मातृसेवा संघ ही अशीच स्त्री-विकास दक्ष संस्था. यास्तव या संस्थेबद्दल माझ्या मनात आस्था आहे. म्हणून ही लेखनाची जबाबदारी मी स्वीकारली. लेखनाचे काम हातात घेण्यास, याशिवाय एक वैयक्तिक कारणही होतेच. दुर्दैवाने ग्रस्त झालेली माझी मावशी १९६१-६२ च्या सुमाराला या संस्थेत दोन वर्षे राहिली होती. तेव्हा मी तेराचौदा वर्षांची होते. सुट्टीत घरी आलेली मावशी या संस्थेबद्दल भरभरून चांगले बोलत असे. संस्थेत जाण्यापूर्वीची अस्वस्थ मावशी आणि सुट्टीतली मावशी यांच्यातला फरक चांगलाच जाणवला होता आणि संस्थेविषयी मनात अनुकूल ग्रह निर्माण झाला होता. मातृसेवा संघ या संठेबद्दल माझे मन तेव्हापासून संवेदनाक्षम झाले होते. संस्थेवर तिने रचलेल्या ओव्या अजून आमच्या घरात आहेत. या संस्थेने सत्तर वर्ष पूर्ण केल्याचे मी ऐकले. संस्थेच्या प्रवासाचे अवलोकन करावे, प्रमुख कार्यकर्त्यांच्या प्रेरणा समजावून घ्याव्यात अशी तीव्र इच्छा झाली. या प्रकल्पाच्या रुपात ती संधी सुदैवाने प्राप्त झाली. तथापि मी पुण्यात आणि संस्था नागपूरला! त्यामुळे हर जरा कठीणच होते. परंतु डॉ. सत्यबाला तयाल, मोहनी कुटुंबीय आणि डॉ. कुसुमताई आणि वसंतराव वांकर यांच्या सहकार्यामुळे ते सोपे झाले. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

**-विनया खडपेकर**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


पार्श्वभूमी ........ 8

संस्थापिका कमलाताई होस्पेट ........ 14

मातृसेवा संघ ........ 23

दुसरा आधारस्तंभ सत्यबाला तायल : ........ 43

मातृसेवा संघाच्या ‘प्रवृत्ती’ ........ 51

‘मातृसेवा’ मासिक ........ 76

मुलांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय व विकलांग मुलांचे पुनर्वसन (प्रवृत्ती) ........ 80

अखेरचे पर्व ........ 84

परिशिष्ट चरित्रपट ........ 88

कमलाताई होस्पेट ........ 88

सत्यबाला तायल ........ 88

मातृसेवा संघ (कार्यपट) ........ 90

संदर्भ सूची ........ 92

## पार्श्वभूमी

'मातृसेवा संघ' ही महाराष्ट्राच्या जडणघडणीतील एक महत्वाची संस्था. नागपूर येथे १९२१ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. १९२१ मध्ये आजचा महाराष्ट्र अस्तित्वात नव्हता. आजच्या प्रमाणे भाषावार प्रांतरचना झालेली नव्हती. त्या काळी नागपूर हे शहर 'मध्यप्रांत आणि वऱ्हाड' (सेन्ट्रल प्रॅव्हिन्स ॲन्ड बेरार) या प्रदेशाच्या अखत्यारीत येत होते.

'मध्यप्रांत आणि वऱ्हाड' हा भाग म्हणजे विविध सत्ता, व्यवसाय आणि लोकसमूह यांची सरमिसळ होती. यासंबंधी लिहिताना डॉ. य. दि. फडके यांनी विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ मध्ये लिहिले आहे, "इंग्रजांनी १८६१ साली मध्यप्रांत वर्हाड बनविला होता. मध्यप्रांतात सागर व नर्मदेचा हिंदी भाषिकांचा प्रदेश, छिंदवाडा-नागपूर-वर्धा-भंडारा-चांदा-बालाघाट हा मराठी भाषिकांचा मुलुख, निमार व सिरोंचा हे प्रदेश, छात्तीसगढसारखा आदिवासींचा मुलुख, महानदीच्या पाण्यावर पोसलेला संबळपूरचा भाग वगैरेंचा समावेश होतो. निजामाकडून भाडयाने घेतलेला वर्हाडाचा मराठी भाषिक मुलुख (बुलढाणा, यवतमाळ, अकोला व अमरावती) इंग्रजांनी मध्यप्रांताला जोडला. हे जिल्हे माध्यप्रांतातील नागपूर वगैरे मराठी भाषिकांच्या मुलुखात मालगुजारी, मक्तेदारी व मोकासा पद्धती प्रचलित होत्या. तर चांद जिल्ह्यातील काही गावात आणि वऱ्हाडात रयतवारी पद्धती होती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मध्यप्रांत- वऱ्हाड हिंदुस्तानातील सर्व प्रांतांमधला समृद्ध प्रांत म्हणून ओळखला जात असे."

डॉ. फडके यांच्या या अभिप्रायानुसार 'मध्यप्रांत- वऱ्हाड'ची निर्मिती सन १९०० पूर्वीच झालेली होती.

मराठी विश्वकोशात १९०२ मध्ये हैद्राबादच्या निजामाने वऱ्हाड (बेरार) हा मोठा भूप्रदेश ब्रिटीश सरकारला भाडयाने दिला. तेव्हा तो मध्यप्रदेशाला जवळ म्हणून शासकीय दृष्टया मध्याप्रदेशांत गेला असे म्हटले आहे.

'मातृसेवा संघा'च्या जन्माच्यावेळी नागपूर हे शहर 'मध्यप्रांत- वऱ्हाड' या भागात होते हे निश्चित.

आज ज्या भागाला पश्चिम महाराष्ट्र असे म्हटले जाते तो बहुतेक प्रदेश त्या काळत मुंबई इलाख्यात येत होता. मुंबई-पुणे आणि त्याभोवतालच्या परिघातील मुख्य मराठी समाज, मध्यप्रांत- वऱ्हाडातील मराठी भाषिक समाजाला भाषेने, भावनेने जोडलेला होता. पु. य. देशपांडे (अमरावती) आणि के. ना. काळे (मुंबई), वा. ना. देशपांडे (यवतमाळ) आणि माधवराव पटवर्धन (पुणे), गं. त्र्यं. माडखोलकर (नागपूर) आणि न. चिं. केळकर (पुणे) यांच्या निरनिराळ्या विषयांवरील पत्रव्यवहार 'विश्रब्ध शारदा'मध्ये दृष्टीस पडतो. १९२७ मध्ये पुण्यातील पाणंदीकर-खान या हिंदू-मुस्लिम विवाहाचा नागपूरच्या मराठी वृत्तपात्रांनी निषेध केला होता. यामागे आपलेपाणाचीच भावना होती. किर्लोस्कर, महाराष्ट इ. नाटकमंडळ्या मुंबई-पुणे-नागपूर-कोल्हापूर अशा सर्व ठिकाणी हिंडत होत्या. एकंदरीत पाहता असे दिसते कि, त्या काळात शासकीय व्याख्येनुसार महाराष्ट्र हर राज्य जरी अस्तित्वात नव्हते, तरी मराठी भाषिकांच्या मनात 'महाराष्ट्र' हा एकसंध समसाज होता. 'महाराष्ट्र' हा शब्दही सर्वत्र रूढ होता. 'मंगलदेशा-पवित्र देशा-महाराष्ट्र देशा' ही आत्मीयता निरनिराळ्या प्रदेशांतील मराठी भाषिकांच्या ह्रदयात दडलेली होती. ती निरनिराळ्या प्रांतातील मराठी भाषिकांशी निगडीत होती.

अनुक्रमणिका

विसाव्या शतकाच्या प्रारंभी दोन शतकांत 'मध्यप्रांत- वऱ्हाडा'तील मराठी भाषिक प्रदेशातील स्त्री-जीवन कसे होते ते पाहिल्यानंतर त्या पार्श्वभूमीवर कमलाताई होस्पेट यांची कार्यप्रेरणा आणि मातृसेवा संघाचे उद्धिष्ट, कार्यक्षेत्र यांचे महत्व योग्य प्रकारे लक्षात येईल.

या काळात या प्रदेशातील स्त्रीविषयक विचार आणि स्त्रियांची स्थिती, मुंबई-पुणे आणि त्या भोवतालच्या परिसरापेक्षा काहीशी निराळी होती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच पुणे-मुंबई येथे ख्रिस्ती मिशन, ज्योतिबा फुले यांनी मुलींच्या शाळा सुरु केल्या होत्या. सुधारकाग्रणी आगरकरांच्या लेखांनी वादंग माजविले होते. पं. रमाबाई, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, काशीताई कानिटकर, रमाबाई रानडे, रखमाबाई या स्त्रियांची नावे गाजून गेली होती. त्यांच्यामुळे शिक्षण, धर्मांतर, समाजकार्य, पतीपत्नी सहजीवन, घटस्फोट इ. अनेक विषयांवर 'स्त्री' च्या संदर्भात लेखन झाले होते. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सतत चर्चा होऊन गेल्या होत्या. विसाव्या शतकाच्या आरंभिच्या दोन दशकांत मुंबई-पुणे परिसरात अनेक स्त्री-संस्था, स्त्रियांच्या प्रगतीसाठी कार्यरत होत्या. पं. रमाबाई शारदासादन, मुक्तिसदन वादाचा विषय होते. महर्षी कर्वे यांची संस्था चांगलीच रुजली होती. रमाबाई रानडे यांचे सेवासदन स्थापन होऊन विस्तारू लागले होते. कोल्हापूरच्या शाहू राजर्षींनी मुलींच्या शिक्षणासाठी सोयी केल्या होत्या. नाशिक येथे 'आत्मनिष्ठ युवती संघ' सुरु झाला होता. सोलापूर येथे सुमतीबाई सहा यांनी स्त्रियांसाठी 'जैन श्राविक विद्यापीठ' स्थापन केले होते. स्त्रियांसाठी काही नियतकालिके सुरु झाली होती. तीनचार नियतकालिकांच्या संपादकपदी स्त्रिया होत्या. स्त्री-प्रश्नांवर स्त्रियांकडून लेख मागवले जात होते. अल्पशिक्षित स्त्रियाही त्यात लिहू लागल्या होत्या. १९१८ मध्ये मुंबई इलाख्यातील म्युनिसिपालिटयांना मुलामुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा अधिकार देणारा कायदा संमत केला गेला. परंतु म्युनिसिपालिटयांना हा खर्च झेपण्यासारखा नव्हता. म्हणून सध्या मुलांना मोफत शिक्षण द्यावे आणि मुलींच्या शिक्षणाचे नंतर पाहू असा विचार पुढे आला. त्याचे समर्थन लोकमान्य टिळकही होते. यावर एकापाठोपाठ एक अशा, उलटसुलट विचारांच्या पन्नास सभा पुण्यात झाल्या. मुलींनाही सक्तीचे आणि मोफत शिक्षण आताच पाहिजे, अशी मागणी करणाऱ्या पक्षाने रमाबाई रानडे आणि जनाक्का शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जो मोर्चा काढला त्यात दोन हजार स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. ८ फेब्रुवारी १९२० च्या सभेत लोकमान्य टिळकांना बोलू दिले गेले नव्हते. हा काळ म्हणजे महाराष्ट्राचे टिळक-युग होते. लोकमान्य टिळक अखिल भारतीय पातळीवर नेतृत्व करीत होते. हे लक्षत घेता ही बाब फारच महत्वाची होती. १९१७ ते १९२१ या दरम्यान मुंबई इलाख्यात सभा-संमेलनं-मोर्चे यामधून स्त्रियांच्या माताधिकाराची मागणीही जोरात केली जात होती.

नागपूरच्या परिसरातही स्त्रीजगत आपले अस्तित्व दाखवू लागले होते. स्त्री-सुधारणेच्या प्रयत्नांना तुरळक सुरुवात झालेली होती. इ. स. १८९२ मध्ये यशोदाबाई जोशी (सर मोरोपंत जोशी यांच्या पत्नी) यांनी समाजसुधारक दादासाहेब जोशी यांच्या मदतीने अमरावतीत 'वनिता समजा' ची स्थापना केली होती. प्रौढ स्त्रियांना साक्षर करणे, त्यांना संसारोपयोगी गोष्टींची माहिती देणे, जगातील इतर देशात स्त्री-पुरुष आत्मोन्नतीसाठी काय करतात ते व्याखानांद्वारे सामजावून सांगणे, इ. जागृतीचे कार्य या संस्थेने हाती घेतले होते. राजकीय दृष्टीने संवेदनशील असलेल्या या भागात काही मराठी वृत्तपत्रे निघत होती. मात्र या वृतापात्रांत स्त्री-प्रश्नांना महत्व दिले असल्याचा उल्लेख कोठे आढळत नाही. १८८२ साली धोंडोपंत देव यांनी 'नागपूर समाचार' या नावाचे मराठी साप्ताहिक सुरु केले होते. पुढे 'नागपूर ॲन्ड बेरार टाइम्स' या नावाने हे पत्र अंग्लो-मराठी स्वरुपात निघू लागले. १८८५-८६ च्या सुमारास 'नागपूर न्यूज' नावाचे मराठी पत्र तर १८९० मध्ये सदाशिवराव पटवर्धन यांनी 'न्यायसुधा' नावाचे पत्र हरदा व नागपूर येथून आणि

अनुक्रमणिका

कृष्णराव करमरकर यांनी याच काळात 'मराठा' नावाचे पत्र नागपूरहून सुरु केले. १९०२ च्या सुमारास नागपुरात 'टीकाकार' नावाचे साप्ताहिक निघू लागले. त्यात व्यंगचित्रे येत असत. 'वऱ्हाड-समाचार', 'विदर्भ', 'प्रमोदसिंधू', 'कर्तव्य' अशी इतरही नियतकालिके याच काळात निघत होती. १९०७-०८ च्या सुमारास नागपूर- वऱ्हाड प्रांतात हिंदी-मराठी-इंग्रजी मिळून सुमारे अठ्ठावीस नियतकालिके निघत होती. परंतु इतक्या सर्व नियतकालिकांत स्त्रियांसाठी चालविलेले किंवा संपादक पदावर स्त्री असलेले मराठी नियतकालिक आढळत नाही.

१९११ मध्ये पुण्याच्या सुप्रसिद्ध महिला कार्यकर्त्या रमाबाई रानडे यांचा अकोला-अमरावती-यवतमाळ असा व्याख्यानांचा दौरा स्त्री-चळवळीसाठी झाला होता. याच काळात पुणे-मुंबईच्या सुशिक्षित तरुणी, विवाह करून किंवा व्यवसायाच्या निमित्ताने नागपूर- वऱ्हाडात आल्या होत्या. येथील वातावरण त्यांच्यामुळे बदलू लागले होते. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांतच नागपूर परिसरात महार जागृतीची चळवळ जोमाने रुजू लागली होती. या चळवळीतले एक नेते किसान भागू बनसोडे या कार्यात सपत्नीक सहभागी झाले होते. काही दलित स्त्रियांनीही या चळवळीच्या सभांमध्ये भाषणे केली होती. सप्टेंबर १९२० मध्ये नागपूरमध्ये 'भगिनी मंडळ' ही स्त्रियांची संस्था सुरु झाली. स्त्रिया आणि लहान मुले यांची सर्वांगीण प्रगती हे या स्नास्थेचे उद्दिष्ट होते.

लोकमान्य टिळकांचे अनुयायी दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, नाटककार वीर वामनराव जोशी, लोकनायक अणे नागपूर- वऱ्हाडात नेतृत्व करीत होते. त्यांनी राष्ट्रस्वातंत्र्याचा विचार करताना अनुषंगाने स्त्री-प्रश्नांचा विचार निश्चितच केला असणार. यांच्यापैकी वीर वामनराव जोशींच्या नाटकात (१९२७ च्या आसपास), स्त्री आणि युद्ध, स्त्री आणि राजकारण यांवर काही विचार व्यक्त झालेले दिसतात, हे याचेच द्योतक. याच काळात तापीबाई हर्डीकर या विधवा बाई, हुशार आणि पंडिता म्हणून नागपूर परिसरात गाजल्या होत्या. विसाव्या शतकाच्या आरंभ काळात म. गांधींच्या आफ्रिकेतील संघर्षाचे पडसाद हिंदुस्थानात सर्वत्र उमटू लागले होते. आफ्रिकेतील आंदोलनात गांधीजींनी स्त्रियांना सहभागी करून घेतले होते. १९०६ पासून इन्डीयन ओपिनिअन सारख्या नियतकालिकात म. गांधींचे विचार प्रसिद्ध होऊ लागले होते. त्यातील काही लेखात त्यांनी माताधिकारासाठी झगडणाऱ्या ब्रिटीश स्त्रियांची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती. काही लेखांत, द. आफ्रिकेतील हिंदी मुलींना आणि स्त्रियांना शिक्षण द्यायलाच हवे असे म्हटले होते. हिंदुस्थानातील आघाडीचे नेते लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले यांनी गांधीजींची प्रशंसा केली होती. यामुळे १९०१ ते १९२० या टिळक युगात गांधीजींचे विचारही सर्वत्र झिरपू लागले होते. या गांधीप्रणीत विचारांचा प्रभाव आणि रेटा मध्यप्रांत- वऱ्हाडातही पोहोचला असणारच.

हिंदुस्थानातील सार्वत्रिक वातावरण, मुंबई इलाख्यातील महाराष्ट्र प्रदेशही सततचा संपर्क, तुरळक स्थानिक प्रयत्न यांतून मध्यप्रांत-वऱ्हाडातील महाराष्ट्र प्रदेशात स्त्रीप्रगातीच्या उपक्रमांसाठी अनुकूल वातावरण निर्माण होऊ लागले होते. मुंबई-पुण्याशी तुलना करता नागपूर-वऱ्हाडातील प्रदेशात स्त्रीविषयक आंदोलनाची, नवनिर्माणाची गती संथ होती. पण हा प्रदेश गतिहीन मात्र नव्हता.

काही चरित्रे, मुलाखती यांवारुनही या काळात नागपूर परिसरामधील स्त्रीजीवन कसे होते, 'स्त्री 'विषयक दृष्टीकोन कोणता होता, वातावरण कसे होते हे समजू शकते.

अनुक्रमणिका

१९१५ मध्ये मुंबईची पदवीधर तरुणी तारा केळकर आणि तरुण वकील के. व्ही. मोदक यांनी नागपूरला नोंदणी पद्धतीने विवाह केला. अमरावती येथे त्यांचा संसार सुरु झाला. या संदर्भात पद्मजा फाटक लिहितात, “ताराबाईच्या रूपाने अमरावतीने पहिली जिवंत पदवीधर स्त्री पहिली. स्त्रियाही पदवीधर असू शकतात ही गोष्ट वऱ्हाडातल्या या नगरीने वाचली ऐकली होती आणि म्हणून मानली होती. आता ताराबाई मोडकांच्या रूपाने हा दैवी चमत्कार खुद्द त्यांच्या गावातच राहायला आला होता. अनेकजणांच्या सुधारणांच्या कल्पनांना त्यामुळे जोर चढला होता. त्यांची उमेद वाढली होती”. ताराबाईंचे गावात खूपच कौतुक झाले. त्यांना व्याख्याने देण्यासाठी निमंत्रणे येत असत. गावातील सर्व कार्यक्रमांना बोलावणी येत असत. यानंतर दोनतीन वर्षातच मुंबईच्या डॉ. मिस सुलोचना जावळे व्यवसायाच्या निमित्ताने अमरावतीला आल्या. या एकट्या सुशिक्षित स्त्रीला गावातले गुंड त्रास देऊ लागले. त्यांच्यावर काही कायदेशीर कारवाई करता येईल का, हा सल्ला विचारण्यासाठी डॉ. जावळे के.व्ही. मोडकांकडे आल्या. संघटन वाढत जाऊन प्रेमप्रकरणात रुपांतरीत झाले. ताराबाई घर सोडून मुंबईला निघून गेल्या. या प्रकरणाच्या संदर्भात अमरावतीच्या जनतेत बरीवाईट चर्चा निशिचीतच झाली असणार. सुशिक्षित स्त्रियांचे अर्थार्जन-स्वातंत्र्य, प्रीती, द्वितीय विवाह याविषयीच्या अनुकूल प्रतिकूल विचारलहरी वातावरणात उमटल्या असणारच...

अशा काही तत्कालीन घटनांतून एक दिसून येते की या काळात सुशिक्षित स्त्री विवाहाच्या कोंदणात असली की ती कौतुकाला, आदराला, अशा-आकांक्षाना पात्र होत होती. तशी अविवाहित एकटी सुशिक्षित स्त्री मात्र होत नव्हती. किंबहुना ती असुरक्षितच होती.

सुप्रसिद्ध कार्यकर्त्या आणि लेखिका गीता साने यांचा काल यापेक्षा थोडा पुढचा. सन १९०७ चा गीताबाईंचा जन्म. वाशिम-नागपूर परिसरातच त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण या ठिकाणीच झाले. वयाच्या ऐंशीव्या वर्षी त्यांनी दिलेल्या मुलाखतीत त्यांनी आपला बालपणाचा आणि तारुण्याचा काळ कथन केला आहे. त्यात १९२०-२५ च्या सुमाराचे नागपूर-वाशिम येथील स्त्रीजीवन कळते. त्या म्हणतात, “मी धीट होते. वाशिमला असताना माझ वागणं, भटकणं अगदी मनःपूत, मनमुराद असायचं. वडिलांनी मला कुठेही फिरण्याचं, कोणाबरोबरही बोलण्याचं, स्वतः निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य दिलं होत. त्यामुळ मी स्वावलंबी, स्वतंत्र व्यक्तिमत्वाची होते. वडील समाजकार्यकर्ते होते. पैसा बेताचा असला तरी गावात त्यांची प्रतिष्ठा मोठी होती. त्यामुळे मला कोणाचा त्रास झाला नाही. कॉलजच्या शिक्षणासाठी मी नागपूरला गेले होते. एका वाड्यात स्वतंत्र खोली घेऊन राहत होते. मैत्रिणींप्रमाणे मित्रही माझ्या खोलीवर यायचे. माझा दार नेहमी सताड उघडं असायचं. मी स्वातंत्र्य उपभोगलं, पण मी माझ्या पिढीच्या सुशिक्षित ‘स्त्री’ ची प्रतिनिधी होत असं मला वाटत नाही. माझ्या भोवताली इतक्या बंधमुक्त स्त्रिया क्वचितच पाहायला सापडल्या. ज्या थोड्या सापडल्या त्या स्वतः इतक्या पारंपारिक होत्या की त्यांना मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग नव्हता. माझा निर्णय मी घेईन असे म्हणणारी स्त्री फार क्वचित होती. निर्णयशक्ती हा प्रकार स्त्रियांजवळ फार कमी असतो. त्यांच्याजवळ निर्णयशक्ती असली तर त्या बद्दल त्यांना खात्री नसते. कधी खात्री असली तर ती वापरण्याचे साधन त्यांच्या हातात नसते. ही शक्ती निसर्गतः कमी नसते; निर्णयासाठी सतत दुसऱ्यावर अवलंबून राहण्यामुळं ती कमी होते. हे बहुतेक स्त्रियांच्या बाबतीत घडते. बंड करणं हे मला फार स्वाभाविक वाटत असे. पण माझ्या भोवताली मला अशा मुली, स्त्रिया दिसत नसत. मुंबई-पुण्यात गाजलेले रखमाबाई वगैरे खटले आमच्या नागपूर-वाशिमपर्यंत पोहोचलेच नव्हते”.

अनुक्रमणिका

तत्कालीन लेखिका आणि समाजकार्यकर्त्या कृष्णाबाई मोटे या मुळच्या पुण्याच्या. परंतु पदवीधर झाल्यनंतर नोकरीसाठी कृष्णाबाई अमरावतीला आल्या. १९२२ ते १९२५ या काळात कृष्णाबाईंनी अमरावतीच्या मुलींच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी केली. तेथे वासातीगृहात राहिल्या. आपल्या मुलाखतीत त्या म्हणतात, “मी विद्यार्थीनींपेक्षा पाचसहा वर्षांनीच मोठी होते. मुलींमध्ये खूप खेळत होते. काही विद्यार्थिनी माझ्यापेक्षा वयानं मोठ्या होत्या. शाळा गावापासून दूर होती. आमचा गावाशी संबंधच नव्हता. गावातल्या मुली बैलगाडीतून शाळेत येत. बाहेरगावच्या मुली होस्टेल वर राहत होत्या. हिंगण्यात आणि उमरावतीत (अमरावती) एक फरक होता. हिंगण्याला सगळ्या हिंदुस्थानातून मुली येत. उमरावतीच्या शाळेत फक्त विदर्भातल्या आसपासच्या गावातून मुली येत. उमरावतीची शाळा इंग्रजी पहिलीपासून मॅट्रिकपर्यंत होती. मुलींची एकंदर संख्या शंभर ते दोनशेपर्यंत होती. एकेका वर्गात साधारण पंचवीस मुली होत्या. एकंदर पाचसह शिक्षक होते.... नंतर उमरावतीच्या मिस मॉर्ट नावाच्या बाईंबरोबर मी काम करायला लागले. उमरावतीच्या झोपडपट्टीतला अनुभव हिंगण्यापेक्षा थोडा वेगळा होता. मी गेले ती महारमांगांची वस्ती होती. डोळे येणे, खरुज, सर्दी, खोकला या दुखण्यांवर औषध घेऊन मी निरनिराळ्या वस्त्यांमध्ये जात होते. थोडं शिवणकाम शिकवत होते. खेळ सुरु केला की भोवताली मुलं जमायची. आठनऊ वर्षांची एक मुलगी ओढ्यातून हातात मेंढरू घेऊन जाताना नेहमी दिसायची. तिनं साडी नेसलेली असायची. एके दिवशी मी तिच्या पाठोपाठ घरापर्यंत गेले. घरात चांगला मोठ्या वयाचा पुरुष होता. त्याला म्हटलं, “अहो, तुमच्या मुलीला आमच्यामध्ये खेळायला का नाही पाठवत ?” तो एकदम माझ्यावर खवळला. कारण ती त्याची बायको होती. अगदी मोठी म्हटली तरी ती अकाराच्या पुढे नव्हतीच. तो कितीतरी वयस्कर होता. तो माझ्यावर इतका भडकला की मी हबकून गेले. बाईला शिकवायचं आणि त्यातून लग्न झालेल्या बाईला शिकवायचं हे त्याला भयंकर वाटत होतं. बरंच काही बडबडला. मी तशीच माघारी फिरले”.

चरित्रं आणि मुलाखती यांतून दिसणारे स्त्री-जग प्रामुख्याने शिक्षित स्त्रियांचे जग आहे.

शिक्षित स्त्री-जगापलीकडे अफाट स्त्री-समाज होता. मात्र सुशिक्षित स्त्री समाजाच्या आकर्षणाचा विषय होती आणि पर्यायाने काही प्रमाणात अनुकरणीय होती. यास्तव समाजातील स्त्रियांच्या स्थितीचे मूल्यमापन करताना मुठभर शिक्षित स्त्रियांचे जग विचारात घेणे आवश्यकच आहे.

या सर्वातून तत्कालीन नागपूर-वर्हाडातील स्त्री-जीवनाचे स्थूल चित्र डोळ्यासमोर येते. या भागात स्त्री-शिक्षणाला आरंभ झाला होता. शाळेत शिकण्यासाठी मुली वसतिगृहातही राहू लागल्या होत्या. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. सुशिक्षित, पदवीधर स्त्री तशी दुर्मिळच होती.कुतूहलाचा विषय होती. तिच्या बाबतीत तत्कालीन समाजाची भूमिका वस्तुनिष्ठ नव्हती. ती अनुकूल किंवा प्रतिकूल अशी टोकाची होती. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया सुशिक्षित म्हणाव्यात अशा होत्या आणि एखादी पंडिता म्हणून गाजली होती; तरीही सर्वसमान्य स्त्री-जीवनाची पटली उंचावलेली नव्हती. पुणे मुंबईसारख्या येथील स्त्रिया संघटीत नव्हत्या. स्वतः च्या हक्कांसाठी जागृत झालेल्या नव्हत्या. या भागात संस्थात्मक जीवनाचा अभाव होता.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता कमलाताई होस्पेट यांची कार्यप्रेरणा आणि त्यांनी उभी केलेली संस्था यांचे महत्व प्रकर्षाने जाणवते.

अनुक्रमणिका

कमलाताईंनी अखिल स्त्री-समाजच्या मुलभूत गरजेलाच हात घातला होता. यामुळे सर्वसामान्य स्त्री-जीवन सुरक्षित होण्यास मदत होण्याची शक्यता होती आणि त्याची पातळी उंचावण्याची शक्यता तयार होणार होती.

अनुक्रमणिका

## संस्थापिका कमलाताई होस्पेट

कमलाताईंचा जन्म दि. २३ मे १८९६ रोजी मोहिनी कुटुंबात झाला. माहेरचे नाव यमु. त्यांचे वडील कृष्णाजी तात्या मोहनी हे फौजदार होते. यमु ही त्यांची सातवी मुलगी. वेणूताई आणि सीताताई या यमुच्या सर्वात मोठ्या बहिणी. त्यांच्या पाठचे चार भाऊ- गोपाळ, हरिभाऊ, दत्तोपंत उर्फ नाना आणि पुरुषोत्तम. सातवी यामु आणि तिच्या पाठची गंगू, अशी ही आठ भावंडे.

मोहनी कुटुंब नाशिक-धुळ्याच्या बाजूचे. देशस्थ ॠग्वेदी ब्राम्हण. त्यांची शेतीवाडी काहीच नव्हती. सर्वस्वी नोकरीवर अवलंबून असलेले घर. पण यमूच्या जन्माच्या वेळी मोहनी क्तुत्म्ब साधन होते. लहानपणी आपण शानदार बग्गीतून दररोज फिरायला जात असल्याच्या आणि जेवताना अक्षरशः तुपाचे गोळे खात असल्याच्या आठवणी यमुची मोठी भावंडे घरातल्या संभाषणात एकमेकांना सांगत असत.

या परीस्थितीत वेणूताई आणि सीताताई यांचे विवाह झाले. एकूण सगळे सुरळीत चालले होते, पण अचानक कृष्णाजी मोहनी यांचा मृत्यू झाला. मोहनी कुटुंबावर आकाश कोसळले. मुलांमध्ये मोठा असणारा गोपाळ नाशिकला सावकारांच्या "अभिनव भारत" मध्ये होता. त्याने शिक्षण सोडून नोकरी धरली. नानाची रवानगी शिक्षणासाठी मोठ्या बहीणीच्या सासरी झाली. मेहुणे नामांकित वकील. स्वभाव कर्मठ आणि तापट. या घरातील वातावरणात त्याला मिंधेपणाची जाणीव होत असे. या वातावरणात तो रुळू शकला नाही. तेथून पुण्याला न्यू इंग्लिश स्चूलच्या छात्रालयात गेला व नादार विद्यार्थी म्हणून शिकू लागला. पुढे ढवळे नावाच्या कुटुंबाने त्याला ठेऊन घेतले. तिथे त्याची भैय्या बापट नावाच्या मुलाशी मैत्री झाली. भैयाचे वडील बडोद्याचे कमिशनर होते. त्यांचे आणि लोकमान्य तीक्लांचे घरोब्याचे संबंध होते. त्यांच्यामुळे लोकमान्य टिळकांचा सहवास नानाला बराच लाभला. तो टिळकांच्या विचारसरणीने भारावून गेला. भैय्या बापटने 'केसरी' च्या व नानाने 'मराठा' च्या संपादकमंडळात काम करावे असे त्या दोघांना वाटत होते. परंतु त्याच सुमारास लोकमान्य टिळकांना मंडाले येथे पाठविले गेले आणि भैय्या बापटचा अकालीच मृत्यू झाला. नानापुढे प्रश्न निर्माण झाले. चरितार्थ कसा भागवायचा? सुदैवाने त्याला पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली आणि उदरनिर्वाहासाठी एक शिकवणीही मिळाली. आपला खर्च भागवून, थोडी काटकसर करून तो आईला दरमहा दहा रुपये पाठवू लागला. ही रक्कम त्या काळात पुरेशी होती. घरखर्च आणि धाकट्या भावंडांचे शिक्षण त्यामुळे सुरळीत होऊ लागले. यमूही शाळेत गेली नाही तरी लिहू वाचू लागली. वावटळीतल्या वावडीसारखे भटकणारे मोहनी कुटुंब जमिनीवर स्थिरावू लागले.

नाशिकच्या मामाच्या मध्यस्थीने कर्नाटकातील होस्पेट गावाच्या श्री. गुरुराव होस्पेट यांच्याशी यमूचे तिच्या वयाच्या बाराव्या वर्षी (१९०८ साली) लग्न झाले. त्या काळात मुलगी एवढी दूर कशी दिली गेली याचेच आश्चर्य वाटते. याबद्दल कोणीच काही सांगू शकत नाही. तथापि मोहनी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हे कारण असावे. यमुचे वय बारा वर्षाचे होते. त्या काळानुसार लग्नाला अजून उशीर करणे शक्यच नव्हते. त्यामुळे इतक्या दूर मुलगी देण्याची तडजोड झाली असावी. वडिलधाऱ्या मामांनी सुचविलेल्या स्थळी विवाह उरकणे योग्य, असे सर्वांना वाटले असावे. एवढ्या लहान वयातही यमुला आपण आपल्या भावांवर भार आहोत, आले लग्न झाले की घरातले खाण्याचे एक तोंड कमी होईल याची जाणीव होती; त्यामुळे लग्न ठरल्यावर तिलासुद्धा अगदी हायसे वाटले.

अनुक्रमणिका

यमुचे नाव लग्नानंतर बदलून ‘कामाला’ ठेवण्यात आले. तिचे सासर श्रीमंत होते. तिच्या अंगावर दागिनेही खूप घातले होते. पण नवरा व्यसनी होता आणि घरात त्रासदायक सासुरवासही होता. विशेषतः जेवण्याखाण्याच्या बाबतीत हाल होते. उपासमार होई. कमला आणि तिची जाऊ, दोघींपैकी एकीने दारात उभे राहून सासूबाई येताहेत का यावर लक्ष ठेवायचे आणि दुसरीने आत चुपचाप खाऊन घ्यायचे अशी त्यांची कोंडमाऱ्याची परिस्थिती होती !

या सासूरवासाची एक हकीकत पुढे कमलाताईंनी वेणूताई या मैत्रिणीला सांगितली आहे. ‘कामालगंध’ या पुस्तकात इंदूताई देशमुख यांनी ती लिहिली आहे, ती अशी-

“लग्न होऊन पाठराखणीची माणसं घरी गेली. दहाबारा दिवस झाले. गावाला गेल की घरी, विशेषतः आईला पत्र लिहायची आम्हाला सवय होती. माझ्याजवळ कार्ड होतं. मी काढून लिहायला बसले. तिकडून लगेच सासूबाई आल्या.

‘सुनबाई काय चाललंय्?’ करड्या आवाजात सासूबाईंनी विचारलं.

‘आईला पत्र लिहितेय’. खोटं बोलण्याचा स्वभाव नसल्यानं मी उत्तर दिलं.

‘हवं तेव्हा पत्र लिहायची इकडे पद्धत नाही. बारशाच्या नाहीतर बाराव्याचा निमित्तानं पत्र लिहायचं फक्त’.

मग काय! त्यांचं बोलणं, चालणं सारं तोऱ्यात नि ठसक्याचं असे. पुन्हा वळूनही ना पाहता त्यापुढच्या खोलीत त्या चालत्या झाल्या, नि मी सारं साहित्य माझ्या चिमुकल्या ट्रंकेत टाकून कामासाठी पदर बांधून उठले”.

कामलाच संसार जेमतेम तीन वर्ष झाला. १९११ साली धनत्रयोदशीच्या दिवशी गुरुरावांचा मृत्यू झाला. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी कमलाला वैधव्य आले. कमला बधीर झाली. दुखः व्हावे असे नाते त्या दोघांमध्ये निर्माणच झाले नव्हते.

कमलाच्या सासरच्या लोकांनी ही दुःखद बातमी तिच्या माहेरी कळवली देखील नाही. नानाच्या एका मित्राने ती तिकडे कळविल्यानंतर पाचव्या दिवशी नाना तिच्या सासरी पोहोचले. बऱ्याच काळानंतर भाऊ भेटला, तोही अशा दुःखद प्रसंगी. त्याला पाहताच कामालाने त्याला मिठी मारली. सासूबाई ओरडल्या, “सुतकात का शिवलीस?”

भाऊ नम्रपणे म्हणाल, “तुम्ही आम्हांला काहीच कळवलं कसं नाही ?शेवटी आमच्या बहिणीचा हा प्रश्न आहे”. भावाने कमलेला माहेरी नेण्याची गोष्ट काढली.

सासूबाई म्हणाल्या, “तुम्हाला वाटत असेल बहिणीला नेले की तिचे दागिने मिळतील. पण लक्षात ठेवा. तुम्हाला काहीही मिळणार नाही”.

भाऊ म्हणाला, “मला दागिने नकोत. फक्त माझी बहिण द्या”.

सासूबाईंनी समाधानकारक उत्तर दिले नाही. परंतु ‘सर्व धार्मिक विधी’ झाल्यानंतर चौदाव्या दिवशी घेऊन जा असे म्हणाल्या. त्यांचे ते बोलणे सूचक होते. केशवपन टाळायला हवेच होते. कमलेला हाताला धरून भाऊ त्याच दिवशी धडाक्यात बाहेर पडला. आधीच मित्राला सांगून पोलिस सहाय्याची सोय त्याने करून ठेवली होती. त्यामुळे सासरची माणसे काहीच करू शकली नाहीत.

१९११ चा तो काल होता. महाराष्ट्रीय समाजात केशवपनाला आत्यंतिक विरोध सुरु होता. केशवपनाचा निषेध करणारी, हरीभाऊंची ‘पण लक्षात कोण घेतो’ ही कादंबरी (१८९३) या काळात लोकप्रिय झालेली होती. ‘विधवा स्त्री’च्या आयुष्यातल्या दुःखांविषयी संवेदनशील समाज सहानुभूतीने बोलू लागला होता. महर्षी कर्वे यांनी विधवांसाठी चालू केलेल्या आश्रमाची कीर्ती महाराष्ट्रभर झाली होती, भारतातही सर्वदूर पसरू लागली होती. सर्व भारतातून महाराष्ट्रीय अबलांचा ओघ हिंगण्याची पाउलवाट शोधत येऊ लागला होता. पुण्यामुंबईतील या क्रांतीची चाहूल कामलेच्या सासूबाईंनाही लागली असावी. म्हणूनच सुनेच्या केशवपनात माहेरच्यांकडून विघ्न येईल असे त्यांना वाटले असावे. हिचे केशवपन नाही झाले तर आता आपला मुलगा नरकात जाईल, या भीतीमुळे मुलाच्या मृत्यूची बातमी तिच्या माहेरी कळवलीच नसावी. असे काही होऊ शकेल असा अंदाज भावालाही असल्यामुळे आपल्या मित्राकडून पोलीस सहाय्याची तजवीज त्याने केली. कामलेच्या सासरच्या लोकांची पोलिसांच्या विरोधात जाण्याची हिमंत झाली नाही. म्हणजेच त्या काळी क्रूर रुढींविरुद्ध अनुकूल वातावरण बरेच तयार झाले होते. त्यामुळेच एकटा भाऊ आपल्या बहिणीला हाताला धरून बाहेर पडू शकला. भावाने हात दिल्यावर तो घट्ट पकडण्याइतके बळ कामलेच्याही अंगात होते. म्हणूनच मुळूमुळू रडत ना बसता तिने हिमतीने सासरचा उंबरठा ओलांडला.

कमलेला घेऊन भाऊ घरी आला. पण आता पुढे काय? ती कधी शाळेत गेली नव्हती. तरी तिला लिहिता वाचता येत होते. भावाने तिच्यासह हिंगण्याची वाट धरली. कमलाताई हिंगण्याला राहिल्या; पण फार काळ तेथे रमल्या नाहीत. त्याची वेगवेगळी कारणे सांगितली जातात. श्री. द्वारकानाथ लेले लिहितात, “हिंगण्याच्या शिक्षणातून दोन मार्ग होते- मास्तरकी आणि पुनर्विवाह. या दोन्ही गोष्टीत कामालाताईना रस नव्हता. म्हणून त्या लवकरच तेथून निघाल्या”. डॉ. वांकर म्हणतात, “त्यांना औपचारिक शिक्षणामध्ये गोडी वाटली नाही म्हणून त्या तेथून निघाल्या”. कोणी म्हणते तिथली हवा सोसली नाही. कोणी म्हणतात विदर्भापासून पुणे – हिंगणे सर्वांनाच दूर वाटले. काहीही असो, वर्ष-सहा महिन्यांतच कमलाताईंनी हिंगणे सोडले. वर्धा मुक्कामी त्या भावाच्या म्हणजे नानाच्या घरी राहू लागल्या. तेथे धाकटा हरिभाऊ आणि पुरुषोत्तम शिकत होते. या संदर्भात कामालाबाईचे भाचे श्री. ठेर्गावकर सांगतात, “१९१८ मध्ये इंफ्लूएंझाची साथ आली. त्यात आमचे आई-वडील वारले. आम्ही पाच भावंडे मामाकडे म्हणजे नानाकडे राहायला आलो. नानामामा वर्धा इथे होते. कामलामावशी आणि आजी म्हणजेच त्यांची आईही तेथेच होती. कमलाताई स्वयंपाकपाणी करीत. आम्हा मुलांचेही पाहत”.

आता भावा बहिणींचे संसार हेच आपले जीवन असे मात्र कमलाताईना स्वतःला किंवा त्यांच्या संदर्भात त्यांच्या भावांना वाटत नव्हते. हरिभाऊ बी. ए. झाल्यावर स्वातंत्र्य चळवळीत उतरले. त्यांनी अविवाहित राहून जन्मभर देशसेवा केली. गोपाळराव आणि पुरुषोत्तम सरकारी नोकरीत शिरले. पुढे कारकुनापासून अधीक्षकाच्या जागी पोहोचून सेवा निवृत्त झाले. सरकारी नोकरीत नाना शिक्षक – पुढे

मुख्याध्यापक असे चढत उपसंचालक म्हणून निवृत्त झाले. नोकरीत असतानाही सर्वांनी जमेल तेवढी देशसेवा केली. देशसेवा, समाजसेवा या भावनांनी निर्माण झालेले जे वातावरण मोहनींच्या घरात होते त्यामुळे आधुनिक विचारांच्या झुळूकाही घरात शिरल्या होत्या. विधवेने स्वावलंबी असावे असे सार्यांनाच वाटत होते.

१९१८ मध्ये कमलाताई नागपूरच्या डफरीन रुग्णालयामध्ये परिचर्या अभ्यासक्रमासाठी गेल्या. डफरीन रुग्णालय मेयो रुग्णालयाच्या आवारात होते. त्याच्या प्रमुख डॉ. द्वारकाबाई कमळाकर होत्या. अभ्यासक्रम दोन वर्षाचा होता. अट एकच होती- बाई साक्षर हवी. या अभ्यासक्रमामध्ये कमलाताई रमून गेल्या. बहुतेक, पुस्तकी शिक्षणापेक्षा परिचर्यचा प्रत्यक्ष काम करण्याचा अभ्यासक्रम त्यांना स्वावलंबी होण्यासाठी जवळचा मार्ग वाटला. त्यांचा स्वभाव जात्याच सेवाभावी होते. शिवाय नागपूर भावाच्या घरापासून-वर्ध्यापासून-जवळच होते.

डफरीन रुग्णालयामध्ये त्यांना त्यांच्यासारख्या दोन मैत्रिणी भेटल्या. वैधव्य अनुभवणाऱ्या, सावित्रीबाई मटंगे आणि वेणूताई नेने. तिघींचेही भाऊ विचाराने पुरोगामी. बहिणींनी स्वावलंबी व्हावे ही त्यांची इच्छा. सावित्रीबाई तर म्हणतात, “माझा भाऊ चांगला पैसेवाला, आम्हांला पोसणे त्याला सहज शक्य होते. पण मग जन्मभर मिंधेपण वाटला असता”. कमलाताईंचा भाऊ आणि वेणूताईचा भाऊ दोघांचा अल्प परिचय होता. बहिणींच्या परिचर्या अभ्यासक्रमाचा निर्णय त्यांनी सहमाताने घेतला होता. वेणूताई नेने यांचे बंधू हरिभाऊ नेने महानुभाव वाङ्मयाचे अभ्यासक होते आणि लेखक म्हणून प्रसिद्धीला येत होते.

या शिक्षणाच्या संदर्भात सावित्रीबाई मटंगे म्हणतात, “नागपूरच्या मेयो हॉस्पीटल मध्ये तो कोर्स घेणाऱ्या बहुतेक मुली किंवा बायका ख्रिश्चन असत. महाराष्ट्रीय बायका फार थोड्या असत. हॉस्पिटलमधल्या कोपऱ्याकडच्या एका खोलीत आम्ही तिघी जनी (कमलबाई, सावित्रीबाई आणि वेणूताई) राहिलो. त्यावेळी तेथे जेवणाचे क्लब वगरे नव्हते. स्वतःच स्वतःचे जेवण बनवून खायचे व धुणे-पाणी वगैरे स्वताः ची कामे स्वतःच करायची अशी परिस्थिती होती. आळीपाळीने आम्ही तिघी स्वयंपाक करीत असू. त्यावेळेपासून कामालाताईची वृत्ती कष्टाळू आणि केवळ आपल्यापुरते ना पाहता सर्वांसाठी करायचे अशी असल्याचे स्पष्ट दिसून येत होते. आम्ही शिकलेल्या नव्हतो. तितके नित्नीतके लिहिणे आम्हांला कठीणच होते. कमलाताई आम्हांला नोट्स वगैरे लिहून देत असत. आम्हांलाच नव्हे तर इतर कित्येक मुलींना त्यांनी नोट्स लिहून दिल्या.

मी नर्सिंग शिकत असताना माझी दोन छोटी मुले माझ्या दोन दिरांकडे (अनुक्रमे कानपुरला व जबलपूरला) आळीपाळीने राहत होती. ती फारच लहान असल्याने त्यांचे कसे होत असेल या कल्पनेने मला वारंवार काळजी वाटायची व कित्येकदा रडूही यायचे. प्रत्येकवेळी कमलताईनी मला धीर दिला. माझे सांत्वन केले. एकदा मला स्वप्न पडले की माझा मुलगा चि. प्रभाकर आजारी आहे. स्वप्नात माझ्या काळजाचे पाणी पाणी झाले. प्रत्यक्षात माझ्या डोळ्यांचे पाणी खळेचना. कमलाताई माझे नुसते सांत्वन करूनच थांबल्या नाहीत. त्यांनी माज्या दिरांना प्रभाकरच्या प्रकृतीबद्दल तार केली व दिरांकडून प्रकृती उत्तम आहे याबद्दल तारेने उत्तरही आले”.

“कामलगंध” या पुस्तकात श्रीमती इंदुताई देशमुख लिहितात, “शिकायला लागून काही दिवस झाले, तोच कामलाताईची आई नगरसूल येथे आजारी असल्याचे कळले. तेव्हा तार, दूरध्वनी यांचा

आजच्यासारखा घटकोघटकी उपयोग करण्याची पद्धत नव्हती; पण मनुष्यस्वभाव तोच होता ना! एका बाजूला आईचे प्रेम अन् काळजी आणि दुसऱ्या बाजूला शिकायला आल्यावर मध्येमध्ये घरी जायला मिळणार नाही, अशी मुलाखतीच्या वेळीच कबुल करून घेतली गेलेली अट ! त्या अटींपासून सुट मागण्यात आडवा येणारा योग्य अभिमानही होता. एकदोन दिवस टिकाव धरला मनानं. अखेर आईच्या प्रेमानं, काळजीनं, स्वाभिमानावरमात केली अन् कमलाताई गेल्या डॉक्टरांकडे. पण त्या काळची शिस्तही कडक. ब्रिटीश अंमलातील ती शिस्तीची माणसं. कमलाताई विचारायला गेल्या तेव्हा डॉक्टर म्हणाल्या, 'शिकायला आलीस तेव्हा दोन वर्षात आपलं कोण कोण आजारी पडणार आहे, आपल्याला कोणासाठी जावंसं वाटणार आहे याचा आधीच विचार करून यायला पाहिजे होतं. आता आईचं काही झालं तरी जायला मिळणार नाही'. हृदयावर दगड ठेवून कमलाताई परत कामावर रुजू झाल्या. वरिष्ठांनी रजा दिली नाही किंवा आपले काही म्हणणे ऐकले नाही म्हणून काम धड करायचे नाही किंवा संप करायचा किंवा आपली नाखुषी कोणत्या ना कोणत्या प्रकारे व्यक्त करायची असे कोणी तेव्हा वागत नव्हते. अर्थात अपवाद असत, सर्वकाळी असतातच पण हल्लीसारखे तसे सार्वत्रिक वातावरण नव्हते. लवकरच आई बरी झाल्याचे कळले अन् शांत मनाने कमलाताईचा अभ्यासक्रम सुरु झाला".

परिचर्या अभ्यासक्रमाच्या त्या अशा कडक शिस्तीच्या काळात कमलाताईच्या जीवनात घडलेला आणखी एक महत्वाचा प्रसंग अनेक जन सांगतात.

एक दिवस कमलाताई नित्याप्रमाणे वॉर्डमधे काम करीत होत्या. एका बाईला कमोडची आवश्यकता भासली. कमलाताईंनी तिला कमोड दिले. कारण ती अतिशय अशक्त होती. पण अधिसेविका (मेट्रन), जी साधारणतः युरोपियन वा अंग्लो इन्डीयन वा ख्रिश्चन असे, फेरी घेण्यास आली. "पेशंटला कमोड कोणी दिले?" ती ओरडली. कमलाताईंनी ते दिले असल्याचे कळले.

"हिंदू पेशंटला कमोड द्यायचे नाही" ती गरजली.

"त्यांना उठवत नसलं तरी ?" हळूच कमलाताईंनी विचारले.

"होय. त्यांनी उठूनच तिकडे गेलं पाहिजे". पुन्हा गर्जना.

उलट उत्तर देण्याची पद्धत नव्हती. सोयही नव्हती. त्यावेळी कमलताई गप्प राहिल्या. पण मनोमन निश्चय झाला, "जिथं असा कोणताही भेदभाव नसेल असं रुग्णसेवा मंदिर सुरु करायचं." मनातला निश्चय शब्दांवाटे बाहेर आला नाही. स्वप्ने प्रत्यक्ष कृतीत उतरविणे हे किती कठीण असते त्याची कमलाताईंना कल्पना असावी. बोलून दाखविलेला विचार जर तडीला नेता आला नाही तर ती व्यक्ती केवळ वाचाळ ठरते, तिच्या बोलण्याला किंमत उरत नाही, हेही त्या जोखून असाव्यात. तोंडाने बडबडण्यापेक्षा कृतीने बोलणेच त्यांना अधिक प्रिय असावे. 'आधी केले मग सांगितले' ही विचारसरणी त्यांच्या रक्तात भिनलेली होती.

हे आव्हान पेलणे कठीण होते. आपल्या समाजातील आजारी स्त्रीची अवहेलना कमलाताईंच्या जिव्हारी झोंबली होती. जेथे आपल्या स्त्रियांना किंबहुना कोणत्याच जातिधर्माच्या स्त्रियांचा अपमान होणार नाही असे रुग्णालय /सुतिकागृह असावे या इच्छेने त्यांच्या मनात यावेळी मूळ धरले. आपणच असे काही

करावे असेही वाटले होते. मात्र ज्या आपल्या समाजासाठी हे करावेसे वाटले तो समाज कसा होतो? या समाजास 'स्त्री'ने स्वावलंबी होणे मान्य नव्हते. त्या काळात उच्चभ्रू समाजातल्या तुरळक विधवा शिक्षणक्षेत्रात शिरल्या होत्या. पण 'मास्तरणीं'ची कुचेष्टा होत असे. सीताबर्डी सुतिकागृह रजत जयंती पुस्तिकेत म्हटले आहे- "नागपुरात सेविकांच्या कार्यास शिक्षण- कार्य करणाऱ्या स्त्रियांइतकी देखील इभ्रत नव्हती. बाळंतपणे करण्याचे काम गौण मानण्यात येत होते. परिचारिकांचे कार्य जरी पवित्र, परोपकाराचे, स्त्रियांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत जरुरीचे असले तरी ते हलके, उपेक्षणीय समजले जात होते. समाजातील वरच्या ठरमधील स्त्रिया हे कार्य अंगावर घेण्यास धजावत नसत. ख्रिस्ती मिशनऱ्यांमध्ये शिक्षण घेतलेल्या काही थोड्या स्त्रियांचाच भरणा ह्या परिचारिकांच्या धंद्यात होत असे व अशा थोड्या स्त्रियांनाच त्यांचा स्वभाव परोपकारी असल्यास किंमत देण्यास समाज तयार असे. पण सुईणीचा धंदा करण्यास उच्चवर्णीय स्त्री क्वचितच तयार होई. द्रव्यार्जनासाठी जर हा धंदा करण्यास स्त्रिया पुढे येत नसत, तर सेवेसाठी सुईणी होण्यास उच्चवर्णीय स्त्रिया तयार ना झाल्यास त्यात आश्चर्य नाही. नाटकात काम जसे कुलीन स्त्रियांस आत्तापर्यंत वर्ज्य समजले जात असे तसेच परिचारिका होण्यातही निंदास्पदता भरून राहिलेली होती. सामाजास्त असल्या कार्याला मान नसे. एवढेच नाही तर कुटुंबातही अशा कार्याचे चीज करण्यात क्वचितच कोणी तयार होई".

सावित्रीबाई मटंगे यांचे उद्गार या संदर्भात बोलके आहेत. १९७२ मधल्या आपल्या लेखात त्या म्हणतात, "सुमारे छप्पन्न वर्षांपूर्वीची ही कथा आहे. माजे पती निवर्तले त्या वेळी मी चोवीस वर्षांची असेन. मला दोन मुली व एक मुलगा अशी तीन अतिशय लहान मुले होती. माझे शाळेत शिक्षण वगैरे काहीच झाले नव्हते. स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे. नाहीतर कोणी विचारात नाही, असे विचार असल्याने माझे भाऊ श्री. वामन वासुदेव चितळे (संथापक, ऑल इंडिया रिपोर्टर, नागपूर) यांनी मला नर्सिंगचा कोर्स घेण्यास सांगितले. माझे दीर जबलपूर येथील रोबर्टसन कॉलेजमधील प्राध्यापक श्री. दत्तोपंत मटंगे यांना मी नर्सिंग शिकणे व पुढे काम करणे पसंत नव्हते. असे काम करावे लागले म्हणजे आम्ही तुमचे पोषण करू शकत नाही असा अर्थ निघतो, म्हनून तुम्ही हा कोर्स चालू ठेवू नका असे त्यांनी जबलपूरहून येऊन मला सांगितले. पण अर्थात मी माझे शिक्षण चालू ठेवण्याचे ठरविले... शेवटी माझा नर्सिंगचा कोर्स पूर्ण झाला व मी जबाल्पुरास गेले. माझ्या दिरांना मी प्रॅक्टिस करणे आवडत नव्हते. कारण ते सरकारी कॉलेजात प्रोफेसरच्या बड्या हुद्यावर होते. मला तर प्रॅक्टिस करायलाच हवी होती. म्हणून त्यांनी रोबर्टसन कॉलेजपासून दूर गावात मला बिऱ्हाड करावयास लावले. थोड्याच दिवसांनी मी प्रॅक्टिस करण्यासाठी जबलपूर सोडून नागपूरला आले". जबलपूर सोडून नागपूरला येण्याचा निर्णय सावित्रीबाईंनी का घेतला हे त्या बोलत नाहीत. पण दिरांचे मन आणि परिचारिकेचा व्यवसाय या दोन्ही गोष्टी सांभाळणे जमत नसावे अशी एक शक्यता आहे.

भोवतालचा समाज हा असा होता. तरीही या काळात मराठी 'स्त्री'ची अस्मिता जागी होऊ लागली होती. महर्षी कर्वे यांचा आश्रम विस्तारत होता. पंडिता रमाबाईचे शारद सदन चर्चेचा विषयझालेले होते. यशोदाबाई जोशी यांनी अमरावतीमध्ये अमरावतीच्या समाजसुधारकांच्या सहाय्याने 'वनिता समजा'ची स्थापना केली होती. इ. स. १९०५ मध्ये क्रांतिवीर बाबाराव सावरकर यांनी नाशिक येथे 'आत्मनिष्ठ युवती संघ' नावाची स्त्री संघटना स्थापन केली होती. इ. स. १९०९ मध्ये रमाबाई रानडे यांनी स्थापन केलेले 'सेवासदन' पुण्यात रुजले होते आणि इतरत्र त्यांच्या शाखा पसरू लागल्या होत्या. जानकीबाई आपटे यांनी अहमदनगर येथे 'हिंद सेविका संघाची' स्थापना केली होती. इ. स. १९२० मध्ये गांधीजींचा राजकारणात उदय झाला. गांधीजीनी आपल्या कार्यात सहभागी होण्यासाठी स्त्रियांना सन्मानाने हाक

दिली. भोवतालच्या या वातावरणामुळेच परिचर्या अभ्यासक्रम पूर्ण करताना जी ठिणगी कमलाताईच्या मनात पेटली ती अधिकच प्रदीप्त झाली. सर्वसामान्य जनता जरी पारंपारिक होती तरी नागपूरमध्येही काही शिकलेल्या संवेदनाक्षम स्त्रिया जाग्या झाल्या होत्या. या स्त्रिया जणू काही कमलताईंचे शिक्षण पूर्ण होण्याची वाटच पाहत होत्या.

या तीन तरुण विधवांचे शिक्षण पूर्ण झाले. कमलाताई होस्पेट आणि वेणूताई नेने या दोघी डॉ. द्वारकाताई कमळाकरांच्या आवडत्या शिष्या. निरोपाच्यावेळी त्या म्हणाल्या, "मुलींनो तुम्ही पास तर होणारच. मग इथेच येणार ना काम करायला?"

"छे : नोकरी नाही करायची ", कमलाताईचे उत्तर. या उत्तरला वेणूताईचे मानेनेचे अनुमोदन.

"मग घरोघर जाणार स्त्रियांच्या बाळंतपणांसाठी?"

"नाही. तसही नाही वाटत".

"जे तुम्ही कराल त्याला माझे आशीर्वाद" डॉक्टर म्हणाल्या.

त्या परिचर्या अभ्यासक्रमाला गेल्या होत्या केवळ स्वावलंबी होण्यासाठी. आता अर्थार्जनाचा मार्ग खुला झालेला होता. परंतु केवळ स्वावलंबी होऊन पुढे काय? भाऊ जरी सुसंस्कृत होते तरी नोकरीवर जाईपर्यंत भावाच्या घरासाठी राबायचे, नोकरीतून घरी आल्यावर पुन्हा भावाच्या संसाराचा गाडा रेटायचा हेच या प्रश्नाला उत्तर दिसत होते. आपल्या शिक्षणाचा एवढा उपयोग ? असा प्रश्न त्यांना पडला. या उच्चवर्णीय तरुण मुली सुईणीचे शिक्शन्घेउन काय करणार, इकडे बऱ्यावाईट नजरेने भोवतालच्या सगळ्यांचेच लक्ष लागले होते.

विधवांनी आपल्या पायावर उभे राहावे या मताच्या लोकांना त्यांच्या इच्छेचा अंदाज आला आणि कौतुकही वाटले. या मुलींना सरकारी दवाखान्यात पोटासाठी राबने नको आहे, बाळंतपणे करीत लोकांच्या दारोदारी फिरणे आणि गुजराण करणे हेही त्यांना नामंजूर आहे, त्यांना पैशाची लालसा नाही, त्यांना समाजसेवा करीत आत्मसन्मानाने जगण्याची इच्छा आहे, हे लक्षात येताच नागपुरातील प्रतिष्ठित पुरोगामी स्त्रियांनी मदतीच हात पुढे केला. सीताताई गाडगीळ (अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळांच्या आई) मथुराबाई द्रवीड, गंगाबाई गोखले या ज्येष्ठ सुधारक स्त्रया या तरुण मुलींच्या पाठीशी उभ्या राहिल्या.

सीताबर्डीच्या मोदी लाईनमधे गंगाबाई गोखले यांनी आपले घर सुतिकागृहासाठी तीन वर्षांकरिता देण्याचे कबुल केले. अक्षयतृतीयेच्या मंगल दिवशी, (८ मे १९२१) बर्डीवरील गोखल्यांच्या घरात, सुतिकागृह सुरु झाले. अध्यक्ष सौ. सीताबाई गाडगीळ. सेक्रेटरी श्रीमती गंगाबाई गोखले. पहिली तीन वर्षे डॉ. द्वारकाताई कमळाकर यांनी वैद्यकीय जबाबदारी स्वीकारली आणि 'सीताबर्डी सुतिकागृह' ही संस्था सुरु झाली. अशाच प्रकारे अनेकांच्या सहकार्यातून सामानाचीही जमवाजमवी झाली.

स्वीकारलेल्या कार्यात कमलाताईंना उत्तरोत्तर यश मिळत गेले. त्यांच्या कार्यात भावांची सतत साथ होती. त्यांनाही भावांचे संसार हे नेहमी आपलेच घर वाटत होते. कमलाताईंच्या कार्यक्षेत्राचा परीघ

मोठमोठा होत गेला. 'सीताबर्डी सुतिकागृहा'चा 'मातृसेवा संघ' झाला. 'मातृसेवा संघ' अनेक अंगांनी विस्तारू लागला. कमलाताईंचे व्याप अधिकाधिक वाढत चालले. तरी आपल्या भावांच्या संसारात त्या आत्मीयतेने गुंतलेल्या होत्या. संस्था विस्तारत असताना कमलाताईंचा चाललेला हा प्रवास त्यांच्या धाकट्या वाहिनींच्या मुलाखतीत दिसून आला. या मुलाखतीत कमलाताईंचे तेव्हाचे दैनंदिन जीवन, कार्यपद्धती, स्वभावाचे कंगोरे चित्रित होतात.

कमलाताईंच्या धाकट्या वाहिनी सरस्वतीबाई पुरुषोत्तम मोहनी आज आठ्याऐंशी वर्षांच्या आहेत. त्या सांगतात, "पंधराव्या वर्षी मी लग्न होऊन घरात आले. कमलाताई माझ्यापेक्षा नाऊ वर्षांनी मोठ्या होत्या. आम्ही सर्व जावा त्यांना यमुवन्स म्हणत होतो. मी लग्न होऊन आले तेव्हा बर्डीवरचं सुतिकागृह सुरु झालं होतं. कमलाताईंच्या पुढाकारानं माझ लग्न झालं. त्यांचा घरात बराच दबदबा. त्या जे म्हणतील ते घरात झालच पाहिजे. त्या बहुतेक सूतिकागृहातच असायच्या. जेवणांसाठी घरी येत असत. त्या म्हणतील तेच करण्याकडे भावांचा कल होता.

माझ लग्नच पहा. माझा रंग काळा. इतरांना मी पसंत नव्हते. पण कमलाताईंमुले माझ लग्न झालं. सासूबाईसुध्दा त्यांचं ऐकायच्या. त्या विधवा म्हणून त्यांचं मन जपलं जात असे.

माझ्या लग्नानंतर विशेष प्रसंगी त्या घरी यायच्या. त्यांनी सांगितलं की घरातल्या सर्वांनी कार्यक्रमाला जायचंच. मग कुणी काही बोलायचं नाही. घरात लग्न ठरलं, पाहुणे आले की त्या यायच्या. प्रवासाला जायचं असल की यायच्या. एकदा घरी आल्या आणि मला म्हणाल्या उमरावातीला जायचं. उम्रावातीला माझा मुलगा. मला वाटलं त्याच्यासाठी हे घ्यावं ते घ्यावं मग जावं. पण त्यांना कुठं एवढा वेळ? चला वाहिनी म्हटलं की चला. गेलंच पाहिजे. एकदा नाशिकला आम्ही लग्नाला गेलो. तेथून पुढे पुण्यातही गेलो. त्यांना आणखीन पुढे जायचं होतं. त्यांच्या भावानं नकार दिला. त्या मला म्हणल्या 'चल'. नाही म्हणण्याची माझी हिमंत नव्हती. कोकणात देवृख्ला त्याचं सुतिकागृह होतं. तिकडं जायचं होतं. कोल्हापूर मार्गे बसने आम्ही गेलो होतो. प्रभाकर कोरगावकर आणि त्यांची पत्नी कोल्हापूरला राहणारे. ते गुळतेलाचे व्यापारी. देशभक्त शंकरराव देव त्यांच्याकडे नेहमी यायचे-जायचे. त्या म्हणल्या म्हणून मी गेले. पण गेल्यावर बरं वाटलं. कोकणात हरिहरेश्वरपर्यंत आम्ही जाऊन आलो. त्यांना प्रवासाची आवड होती. मुलं मोठी झाली तेव्हा मी कमलाताईबरोबर जायला लागले. सगळे एकत्र राहात असल्यामुळे सिनेमाला जायचं असलं तर कमलाताई आल्यावर जायचं असं ठरायचं. "अयोध्येचा राजा", "कुंकू", "माणूस" हे चित्रपट तेव्हा आम्ही पाहत होतो. चित्रपटांची त्यांना विशेष आवड नव्हती. पुढे पुढे कमलाताई नाही आल्या तरी आम्ही चित्रपटाला जायला लागलो. हिराबाई बडोदेकरांच्या गाण्याला जायचं होतं. मुलांना कमलाताईजवळ ठेवून आम्ही गाण्याला गेलो. असंही चालू असे. आमच्या सासूबाई सकाळी उठल्या की बाहेर जायच्या, कुठे ते माहित नसायचं. पण बहुतेकदा मातृसेवा संघात जायच्या. आम्ही घरी वाट पाहत बसायचो आणि कोणीतरी सांगायचं त्या तिकडे आहेत. कमलाताई आईला बजवायच्या असं काही करू नकोस. निट घरी सांगून ये. त्या मला 'अहो वाहिनी' म्हणायच्या. कारण मी लहान असले तरी त्यांचे भाऊ मोठे होते. त्या म्हणत, खरं म्हणजे मला 'ए वाहिनी' म्हणायला आवडेल, पण लोकांना आवडणार नाही, म्हणून 'अहो वाहिनी' म्हणते आपली !

कमलाताईंचं पुढं असं झालं की त्यांचा परिवार वाढला. त्या आल्या की सगळा परिवार बरोबर ! त्या म्हणायच्या, 'मी आता येतच नाही'. आम्ही म्हणायचो, 'असं कसं ? यायला हवं'. एकदा त्यांचा

वाढदिवस होता. त्या आल्या आणि लगेच निघाल्या. पण त्यांना थांबवलं. त्यांच्या सात आठ जणांच्या परिवारासकट आम्ही त्यांना जेवायला घातलं. त्यांना ते आवडायं. पण वरवर नको म्हणायच्या. आमचं एकत्र कुटुंब. सासूबाई असेपर्यंत म्हणजे माझ्या लग्नाला पंचेचाळीस वर्षे होईपर्यंत आम्ही सर्व जावा एकत्रच राहत होतो. सासूबाई १९४७ मध्ये गणेश चतुर्थीला वारल्या. घरात नवीन सुना आल्या. आम्ही सर्वांनी विचार करून वेगळं राहाण्याचं ठरवलं. त्याप्रमाणे सर्व भावांची बिऱ्हाडं वेगळी झाली. कमलाताईंना हे माहिती नव्हतं. त्या आल्या तेव्हा त्यांनी वेगळी बिऱ्हाडं पहिली. मग म्हणाल्या, "मी आता घरी येणार नाही". पण नेहमी येत असत. सासूबाईंच्या श्राद्धाला तर कसंही करून वेळ काढतच असत. घरी कोणी आजारी असलं की त्या येत असत. घरातलं काहीतरी काम आपण केलचं पाहिजे अशी त्यांची भावना होती.पण त्यांना वेळ होत नसे. मग त्या म्हणायच्या "तुम्ही धान्य घेऊन मातृसेवा संघात या, घरून धान्याचे डबे घेऊन आम्ही जात होतो. मग त्या तांदूळ, गहू आम्हांला निवडू लागायच्य. त्यात त्यांना समाधान मिळत असे. हळूहळू ते बंद झालं. त्यांच्या व्यापात तेवढंही जमेना. मातृसेवा संघाचं नवं केंद्र सुरु व्हायचं असे तेव्हा त्यांचे भाऊ यायचे. आम्ही नेहमी जात नव्हतो. कधीतरी जात होतो. कमलाताईंना वाचनाची आवड नव्हती. वर्तमानपत्र तेवढं वाचायच्या. मी मात्र ह. ना. आपटे, फडके, खांडेकर, नाथमाधव सगळ्यांचीच पुस्तकं वाचीत असे. लग्नानंतर माझ वाचन कमी झालं. कमलाताईची लोकांकडून काम करून घेण्याची हातोटी विलक्षण, नागपूरचे सगळे डॉक्टर त्यांना मदत करायचे".

नवर्याच्या मृत्युनंतर त्यांचा सासरशी संबंध पूर्णपणे तुटला. 'कमलाताई होस्पेट' या नावाखेरीज सासरचे काहीच त्यांना मिळाले नाही. स्वीकारलेल्या कार्यातही कमलाताईंना उत्तरोत्तर यश मिळत गेले. त्यामुळे वैधव्य ही इष्टापत्तीच ठरली. त्यांना आपल्या अंगच्या कर्तुत्वाचे भान आले ते वैधव्यानंतरच, कार्याला दिशा मिळाल्या त्याही त्यानंतरच, अन्यथा नवऱ्याची व्यसने आणि सासुरवास सोसत तत्कालीन बहुसंख्य स्त्रियांप्रमाणे त्याही उंबरठ्याआतच खितपत राहण्याची शक्यता होती.

परंपरेची चौकट मोडण्याची भाषा कमलाताईंनी कधी उच्चारली नाही. पण आपल्या कृतीने त्यांनी वेळोवेळी या चौकटीला छेद दिले. त्यांचा कर्तुत्वाचा आलेख उंचावत गेलेला दिसतो.

अनुक्रमणिका

## मातृसेवा संघ

कमलाताईंनी १९२१ मध्ये स्थापन केलेली 'सीताबर्डी सुतिकागृह' ही संस्था पुढे 'मातृसेवा संघ' या नावाने बहरला आला. कार्याचा मूळ आधारस्तंभ कमलाताई. त्यांना साथ वेणूताईंची. परिश्रम, चिकाटी, सेवाभाव, सचोटी हे त्यांचे भांडवल होते. कमलाताई कृतीशील होत्या. त्या फारसे बोलत नसत असेच बहुतेकजण सांगतात. प्रारंभीच्या काळात स्वयंपाक करण्यापासून ते बाळंतपण करण्यापर्यंतची सर्व कामे कमलाताई करीत असत. कोणी पैसे देवो किंवा ना देवो सर्वांची सोय अत्यंत आपुलकीने व जिव्हाळ्याने त्या करीत गेल्या. त्यांच्या या निःस्वार्थ सेवेमुळेच संस्थेचे व्याप प्रचंड प्रमाणावर वाढत गेले. बर्डीवरच्या सूतिकागृहात कितीतरी साधनांची उणीवच होती. पण या मैत्रिणींच्या उत्साहाला सीमा नव्हती. त्यांनी वेळोवेळी काय केले नाही? बाळबाळंतिणीची बडदास्त निट राहावी म्हणून झाडलोट, स्वयंपाकपाणी, बाजारहाट, वीज नसल्यामुळे दिवाबत्ती अशी सगळी काम त्या करायच्या. शिवाय बाळंतिणींचे पथ्यपाणी पाहावयाचे व इतके सर्व करून दोन घास खाण्यासाठी माहेरी दुपारच्या उन्हापावसात पोहोचून लगेच परतायचे. कष्टाला खरं तर सीमा नव्हती पण या बायकांनी कितीतरी वर्षे संस्थेकडून कापर्दीकसुद्धा ना घेता काम केले. सुतिकागृह सुस्थितीला आणले. माहेरची माणसे विशेषतः भावजया चांगल्या म्हणून हे बिनबोभाट निभले. माहेरघरातून जी धडोती मिळत त्यात समाधान होते. असे कितीतरी वर्षे चालले.

### कठीण आव्हान

त्या काळात बाळंतपणे सर्रास रुग्णालयामध्ये होण्याची प्रथा नव्हती. बहुतेक घरातील अनुभवी स्त्रिया किंवा सुईणी हे काम घरोघरी जाऊन करत असत. रुग्णालये बहुधा ख्रिस्ती मिशनची असत. अडलीनडली बाईच रुग्णालयात बाळंतगृहापर्यंत नेली जात असे प्रशिक्षण नसताना केवळ अनुभवाच्या जोरावर जी बाळंतपणे केली जात त्यात काही धोके होते. श्रीमंतांच्या घरात प्रशिक्षित परिचारिकांनी जाऊन बाळंतपणे करण्याची पद्धत तुरळक सुरु झाली होती. परंतु त्या परिचारिकांना समाजात मनाचे स्थान नव्हते. अशा परीस्थितीत सीताबर्डी सुतिकागृहाला आपले कार्य करायचे होते. घरापेक्षा सूतिकागृहात बाळंतपणं होणे सुरक्षित आणि योग्य आहे हे लोकांना पटवून द्यावयाचे आणि हे कार्य करणे प्रतिष्ठित आहे हे जाणवून घ्यावयाचे असे हे दुहेरी कार्य होते. प्रामाणिकपणा, परिश्रम, आत्मीयता या भांडवलाच्या जोरावर कार्याला आरंभ झाला.

### कार्याचा विस्तार

पहिल्या वर्षी सूतिकागृहात सदतीस बाळंतपणं झाली. तीन बाळंतपणं धर्मार्थ. चौतीस बाळंतपणं

केवळ पाच रुपये फी घेऊन करण्यात आली. डॉ. द्वारकाबाई कमळाकर यांनी अनेक प्रकारे मदत केली. १९२१ मध्ये नागपूरला बलवंत संगीत मंडळींचा मुक्काम असताना 'वीर विडंबन' या नाटकाच्या एका प्रयोगाचे उत्पन्न मिळवून दिले. त्याप्रसंगी डॉ. कमळाकर व सीताबाई गाडगीळ यांनी स्वतः तिकिटे खपवण्याचे काम केले. अत्यंत काटकसरीने संस्थेचा कारभार सुरु होता. महत्वाची घटना म्हणजे 'इंडियन विमेन्स मेडीकल सरर्व्हीस' मधील वरिष्ठ अधिकारी डॉ. मिस बालफोर यांनी पहिल्या वर्षी संस्थेला भेट दिली. संस्थेच्या कार्यासंबंधी समाधान व्यक्त केले व दिल्ली येथील लेडी चेम्सफर्ड ऑल इंडीया मॅटर्निटी व

चाइल्ड वेलफेअर लीगच्या वार्षिक सभेत नागपूरची 'अनुकरणीय संस्था' म्हणून त्यांनी सुतिकागृहाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. पहिले वर्ष उत्साहात संपले.

दुसऱ्या वर्षी बाळंतिणींची संख्या सदतीस वरून एकुणसत्तरवर गेली. कामालाताईचे धोरण घरी बाळंतपणासाठी जाण्याचे नव्हते. परंतु एकंदर सामाजिक परिस्थिती व संस्थेची आर्थिक परीस्थिती लक्षात घेऊन यावर्षी धोरण थोडे बदलण्यात आले. संस्थेतर्फे घरी बाळंतपण करण्यासाठीही परिचारिका पाठवण्याचे ठरले. संस्थेची सांपत्तिक स्थिती होती तशीच होती. पहिल्या वर्षी नाटकाचा प्रयोग मिलाल्यामुळेच रक्कम शिलकीत टाकता आली. पण त्यात भर तक्ता आली नाही. लक्ष्मीबाई गाडगीळ, लक्ष्मीबाई केळकर व जानकीबाई काळे यांनी घरोघरी जाऊन वर्गणी गोळा करण्याचे काम नियमित व दक्षतेने संस्थेचा वर्षाचा खर्च कसाबसा निघाला. आर्थिक परिस्थिती बेताची होती तरी सुतिकागृहाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. लोकप्रियता वाढू लागली होती.

तिसर्या वर्षी वर्धा, अकोला येथून व जवळपासच्या खेड्यांतून बाळंतिणी येऊ लागल्या. सुतिकागृहाची कीर्ती वाढत चालली. तसे रेडक्रॉस सोसायटीकडून एक हजार रुपये संस्थेस मिळाले. सीताबर्डीवरील एका सहकारी संस्थेने 'सत्वपरीक्षा' नाटकाचा प्रयोग करून सुमारे सातशे रुपये संस्थेस मिळवून दिले. श्री. बाबुराव पातुरकर यांनी सुतिकागृहातून सुतिकांना घरोघरी पोचवण्यासाठी मोटारगाडी देऊ केली. नागपूर नगरपालिका समितीने पाणी व सफाईवरील कर माफ करून सर्व धर्मांच्या व जातींच्या स्त्रियांना सुतिकागृहात घेतल्यास दोन अंथरूणांचा खर्च आम्ही देऊ असे आश्वासन दिले. ही अट अर्थातच आड आली नाही. या वर्षात पन्नास –शंभर रुपयांच्या काही व्यक्तिगत देणग्याही मिळाल्या. डॉ. द्वारकाबाई कमळाकर यांनी शब्द दिल्याप्रमाणे तीन वर्षे आपली जबाबदारी सांभाळली. २५ सप्टेंबर १९२४ पासून संस्थेच्या कामातून त्या निवृत्त झाल्या. त्या नंतर वओद्याकीय जबाबदारी डॉ. श्री. ना. भा. खरे यांनी स्वीकारली. ते विनावेतन काम करत असत. सुतिकागृहाचे काम आता जवळजवळ दुपटीने वाढले. सुतिकागृहास स्थायित्व येण्याकरिता चालकांनी १३ मार्च रोजी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वये ही संस्था परोपकारी संस्था म्हणून नोंदविली. संस्था चालवण्याकरता उद्देशपत्र व नित्यं तयार केले. या नियमान्वये जिचे मासिक उत्पन्न तीस रुपयेपर्यंत आहे तिचे बाळंतपण मोफत करावे. मासिक उत्पन्न तीस रु. ते दीडशे रु. पर्यंत असणाऱ्या सुतिकेस दहा रुपये शुल्क आकारावे असे ठरले. डिसेंबर १९२४ पासून श्रीमती गंगाबाई गोखले यांना सुतिकागृहाच्या जागेसाठी दरमहा पंचवीस रुपये भाडे देण्यास सुरुवात क्झाली. या वर्षाची महत्वाची घटना म्हणजे डॉ. इंदिराबाई नियोगी संस्थेत आल्या.

संस्थेचा व्याप वाढू लागला. गोखले यांची जागा अपुरी पडू लागली. संस्थेची स्वतःची इमारत असावी अशी जरुरी वाटू लागली. इमारतीकारिता जागा मिळवणे, निधी गोळा करणे, बांधकाम सुरु झाल्यानंतर कामावर देखरेख करणे इ. कामांसाठी एक समिती नेमण्यात आली व त्या दृष्टीने काम सुरु झाले. सरकारकडून भूखंड मिळवण्याचे प्रयत्न सुरु झाले.

संस्थेला आता निरनिराळ्या प्रकारचे साहाय्य उस्फुर्तपणे मिळू लागले. कोणी भांडी दिली. कोणी बंब दिले. कोणी शिवणाचे यंत्र दिले. नगरपालिकेकडून उपकरणे, सामानसुमान मिळाले. वीस रुपयांपासून दोन हजाररुपयांपर्यंत रोख रकमेच्या अनेक देणग्या मिळाल्या. आचार्य सर प्रफुल्लचंद्र राय, लेडी व मिस बटलर (गव्हर्नर यांच्या पत्नी व कन्या) संस्थेला भेटी देऊन गेले. आता कामालाताईना विश्वास आला. कार्यकर्त्यांना हुरूप वाटू लागला.

न्यायमूर्ती डॉ. नियोगी यांच्या मनात एका नव्या कल्पनेन आकार घेतला- सुतिकाशास्त्राच्या परीक्षेकरिता विद्यार्थिनी तयार करून त्यांना सी. पी. मेडिकल एक्झामिनेशन बोर्डाच्या सुतिकाशास्त्राच्या परीक्षेला बसवावे. १९२६ पासून डॉ. नियोगींनी या उपक्रमास सुरुवात केली. पहिली दोन वर्षे ही परीक्षा खासगी डॉक्टरांकडून घेतली गेली. परंतु १९२८ पासून सरकारी मान्यता मिळाली. त्या वर्षी परीक्षेस एकूण तीन विद्यार्थिनी पाठविल्या. पुढे दरवर्षी विद्यार्थिनींची संख्या वाढत गेली.

१९२८ मध्ये विकृतीचिकित्सा शाखा (पॅथॉलॉजी युनिट) सुरु झाली. १९५२ मध्ये कुटुंबनियोजन केंद्र सुरु झाले. १९६६ मध्ये क्ष किरण विभाग सुरु झाला. १९६७ मध्ये रक्तपेढी सुरु केली. पाठोपाठ औषधांचे ड्रग स्टोअरही सुरु केले. १९७३ मध्ये अपुर्णकाल अर्भक (Premature baby) विभाग सुरु झाला.

**शाखा**

बर्डी विभाग संस्थेच्या कार्यास अपुरा वाटू लागला. शाखा काढावी असे व्यवस्थापक मंडळास वाटू लागले. त्याप्रमाणे पहिली शाखा नागपूरच्या महाल या भागात सुरु झाली. शाखेचे व्यवस्थापन अर्थातच कमलताईंकडे होते. श्रीमती गंगाबाई गोखले यांना वेळ नसल्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. मग सचिवाचे कामही कमलाताईंकडे आले. संस्थेचा विस्तार उत्साहवर्धक होता. तरी आर्थिक स्थिती पाय मागे खेचू शकणार होती. देणग्या, वर्गणी, शुल्काचे पैसे यातून संस्थेचा खर्च जेमतेम चाले. डॉक्टरांचा सल्ला व मदत विनामुल्य मिळत असे. परंतु धर्मार्थ बाळंतपणेही पुष्कळ होत असत. जमा व खर्च कसाबसा होई. शिलकेत काही पडत नसे. देणग्या वेगवेगळ्या स्वरुपात होत्या. १९२८ साली श्रीमंत लक्ष्मणराव देशमुख यांनी इमारत निधीसदोन हजार रुपये देऊन गोरक्षणसंस्थेमार्फत रोज दीड शेर दुध देण्याची सोय केली. गंगाबाई गोखल यांच्या घराची जागा अपुरी पडू लागल्यामुळे १ मे १९२९ रोजी मोदी लाईन नं. १ माडे श्री. नारायण भटजी वझलवार यांच्या घरात बर्डी सुतिकागृह हलवण्यात आले. संस्थेला स्वतःची जागा हवी यासाठीही सतत प्रयत्न सुरु होते. इमारत निधी वेगळा काढला व त्यासाठी देणग्या मागणे सुरु केले. शहरात ज्या ठिकाणी आज महाल शाखा आहे तो वाद विकावयास निघाला होता. तो वाद महाल शाखेकरिता खरेदी केले व तेथेही सुतिकागृह चालू केले. जास्त सुतिकांची सोय झाली. विद्यार्थिनींच्या राहण्याची व शिकवण्याची जागेच्या दृष्टीने सोय झाली. महाल शाखा मागून स्थापन होऊन स्वतःची जागा मिळाल्यामुळे वाढू लागली. सुतिकांची संख्याही वाढली. १९३२-३३ या वर्षी सुतिकागृहाच्या दोन्ही शाखा मिळून ६५८ बाळंतपणे झाली. त्यातील १०२ बाळंतपणे विनामूल्य केली गेली. खर्च वाढत चालला. नगरपालिका समितीतर्फे दरवर्षी काहींना काही मदत व्हावी म्हणून संस्था अर्ज करतच होती. कर माफ व्हावेत, उपकरणे, फर्निचर वगैरे उपयुक्त वस्तू मिळाव्यात, गरीब सुतिकांच्या खर्चासाठी तरी मदत नगरपालिकेने द्यावी, यासाठी संस्था नगरपालिकेकडे सतत टुमणे लावत असे. नगरपालिका समितीने २७ ऑक्टोबर १९२८ रोजी ठराव क्र. ४६ संमत केला की, सुतिकागृहास वार्षिक रक्कम रु. ४००/- द्यावी, ती १९२६ पासून मंजूर केली गेली. रु. ४००/- रक्कम अगदीच अपुरी होती. तथापि मिळेल ते घेऊन अधिकासाठी झगडणे चालू ठेवणे आवश्यक होते.

ना. गव्हर्नर बटलर साहेबांकडून दरवर्षी ना मागता अडीचशे रुपये येत असत पण पुढे दीडशे रुपयेच मिळू लागले. १९३२-३३ अखेर संस्थेला सुमारे रु. ३,०००/- कर्ज झाले.

अनुक्रमणिका

संस्थेला कार्यकर्त्यांची मात्र कधीच वान नव्हती. डॉ. सौ. इंदिराबाई नियोगी यांनी संस्थेच्या कमाल स्वतःला वाहून घेतले होते. कठीण बाळंतपण करणे, लहानमोठ्या शस्त्रक्रिया करणे व परिचारिकांना शिकवून त्यांना परीक्षेसाठी तयार करणे ही सर्व कामे आपला संसार सांभाळून त्या काहीही मोबदला ना घेता करत असत. डॉ.विष्णू गंगाधर पांडे हेही मोबदला ना घेता महाल सुतिकागृहास रोज भेट देत असत. डॉ. ना. मा. खरे, डॉ. ला. वा. परांजपे, डॉ. मनोहरपंत पटवर्धन, डॉ. हरदास, डॉ. गयाप्रसाद, डॉ. मार्टिन, डॉ.हॉग, डॉ. शिरळी ह्यांचीही वेळोवेळी मदत होई. सी. पी. मेडिकल एक्झॅमिनेशन बोर्डाच्या परीक्षेत दर सहा महिन्यांनी सहा-सात मुली पाठविणे सुरूच होते.

२ ऑक्टोबर १९३३ रोजी कस्तुरबा गांधी यांनी जेव्हा सुतिकागृहास भेट दिली त्यावेळी त्यांनी शेरेबुकात खालीलप्रमाणे शेरा दिला-

‘इस सुतिकागृह को देखकर मैं बहुत खुश हुई. इसमे हरिजन स्त्रियों को भी प्रवेश हैं, यहाँ जो कपडा काम मी लय जाता है वाह शुध्द खादी का ही हो ऐसी मेरी इच्छा है | लोगों ने इस उपयुक्त संस्था को हर तरह से मदद देणी चाहिये |”

कस्तुरबा गांधींच्या भेटीनंतर संस्थेमध्ये खादीचा अधिकाधिक वापर होऊ लागला विद्यार्थिनी, परिचारिका व संस्थेत राहणारी इतर मंडळी बहुतांशी खादीच वापरु लागली. संस्था जणू काही कॉंग्रेसचे एक अंग आहे असा समाज सरकारी अधिकाऱ्यांत आणि लोकांत निर्माण झाला. त्याचा संस्त्य्हेला त्रासही झाला. विशेषतः महात्मा गांधींच्या १९३० पासूनच्या सत्याग्रहात चळवळीत व पुढे १९४२ नंतर संस्थेवर पोलिसांची कडक नजर असे. एक दोन वेळा संस्थेची झडतीही घेण्यात आली.

१९३७ पासून ‘मध्यप्रांत व वऱ्हाड’ चे सरकार कॉंग्रेस सरकार होते. मुख्य मंत्री पं. रविशंकर शुल्क होते. द्वारकाप्रसाद मिश्र हे दुय्यम मंत्री होते. कामालाताईंचे बंधू नानासाहेब मोहनी सरकारी नोकरीत Deputy director of Public Instruction या हुद्द्यावर होते. त्यांचा मंत्र्याशी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सहज संबंध येत असे. त्यामुळे कमलाताईंच्या सेवाभावी कार्याची माहिती सरकार दरबारी आपोआपच झाली होती. त्यांना मदत करण्याकडे अनेकांचा काळ होता. अनेक सरकारी अधिकारी संस्थेस भेट देऊन कौतुक करून जात.

१९३७ पासून नागपूरच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न सुरु झाला.

एक शाखा रुजते आहे म्हणल्यावर शाखा ध्याव्यास उत्साह वाटू लागला. भोवतालचे गांधीजींनी निर्माण केलेले वातावरण असे होते की, कोणीही संवेदानाक्षम व्यक्तीस आपण या समाजासाठी, राष्ट्रसाठी काहीतरी करावे अशी इच्छा होत असे. कोणी सत्याग्रहाची वात धरली, कोणी चरख्यावर सुत काढण्याचे व्रत स्वीकारले. काही बॉम्ब करण्यात गुंतले. कमलाताई सूतिकागृहात-स्त्री जीवनाच्या मुलभूत गरजेत, स्वतःचे कार्यक्षेत्र सापडले. परंपरेचा अंधार दूर करून प्रकाशाकडे येणाऱ्या समाजाला प्रत्येक क्षेत्रात शास्त्रीय ज्ञानाची, अद्ययावत प्रशिक्षणाची आवश्यकता भासू लागली होती. म्हणूनच कमलाताईंच्या कार्याचे महत्व पटू लागले होते. भंडारा व अर्वी येथे १९३८ मध्ये शाखा सुरु झाल्या. पसारा वाढत होता. जबलपूर (१९४१) हिंगणघाट(१९४४) आरमोरी, ब्रम्हपुरी, विलासपूर, वरोडा(१९४५), चांदूर (१९५१)

कुऱ्हा (१९५२) अमरावती (१९५४) अकोला(१९५७) येथे संस्थेच्या शाखा सुरु झाल्या.

अनुक्रमणिका

कमलाताईंनी अनेक प्रकारे माणसे जोडली. दास्यत्वाचा यत्किंचितहीस्पर्श नसलेला सेवाभाव त्यांच्या ठिकाणी होत. त्यांच्या नात्यातल्या शरयू धोत्रे वर्धा येथील एक महत्वाची आठवण सांगतात. "पू. बापू त्यावेळी काही दिवसांसाठी आश्रमात आले होते. त्यांच्या बरोबर आलेल्या त्यांच्या कार्यवाह, शिष्यामीराबाई या हिवतापान आजारी पडल्या. त्यांची शुश्रुषा भाडोत्री परिचारिका आणून करणे श्री. जमनालालजींना योग्य वाटेना. काय व्यवस्था करावी असा प्रश्न त्यांना पडला आणि एकदम यमुताइची (कमलाताईंची) आठवण झाली. बोलावल्याबरोबरयमुताई आल्या. आमच्या घरी उतरल्या. आमची आश्रमीय साधी राहणी त्यांना फार आवडली, हे बघून माझा जीव भांड्यात पडला.

तेव्हा त्या पहाटेच उठून, थंड पाण्यने अंघोळ करत. नंतर आसनं, नमस्कार घालून रामरक्षा म्हणत. थोडं दुध घेत. हे सर्व करुन सकाळी साडेसह-सात वाजता यता मीराबाईच्या सेवा-शुश्रुषेला जात. नंतर जेवायला अकरा साडेअकराला येत. आमच्याकडे अगदी संडास सफाईपासून सर्वच स्वावलंबन असल्याने त्यांच्या व्रतांचा कधी प्रश्न पडला नाही. पण एकादशीला त्या पाणीसुद्धा ना घेता काम करताना पाहून जीव कासावीस होत असे.

मीराबाईची शुश्रुषा, पथ्यपाणी त्यांनी इतक्या तन्मयतेने केले की जमनालाल अगदी समाधान पावले. खुद्द मिराबाईही प्रभावित झाल्या. दुसर्या कुणी काही केलेले त्यांना आवडेनासेच झाले. एकीकडे यांना माझ्र कमोड साफ करण्यापासून सर्व करावं लागतं. हव बघून मीराबाईना संकोचही होई. पण यमुताई कपडे धुणं, स्पंज करणं, पथ्याचंखाऊ घालणं वगैरे सर्व कामे जातीने करणेच पसंत करीत. कपाळावर एक आठी न उमटवीत निरलसपणे केलेली ही सेवा बघून सर्वांनाच त्यांच्याविषयी आदर वाटू लागला.

फुरसतीच्या वेळात त्या आश्रमात कोणकोणते उपक्रम चालतात या बाबतही जाणून घेत होत्या. नागपूरला त्यांचे सुतिकागृह तेव्हा सुरु झाले होते. यमुताईच्या गैरहजेरीत ते वेणूताईंनी सांभाळले असावे.

यमुताई परत नागपुरला जायला निघाल्या तेव्हाचा प्रसंग मोठा प्रेरणादायी आहे. श्री.जमनालालनी त्यांना विचारलं की, मी तुम्हाला काय देऊ? हे ऐकून यमुताईना दुखः झाले. नमस्कार करून त्या त्यांना म्हणाल्या, "तुम्ही मला सेवेची संधी दिलीत तीच फार मोठी देणगी आहे. मीच तुम्हाला त्या बद्दल धन्यवाद देते. तुम्हाला पुन्हा जरूर पडल्यास मला हक्काने बोलवा व पुढे मागे वर्ध्यात सुतिकागृह काढा. म्हनजे कार्यकर्त्यांना उपयोग होईल".

जमनालालइ या अनुभवाने भारावले. यमुताईंचे बजाज घराण्याशी जे आत्मीयतेचे संबंध जुळले ते कायमचे.

पुढे वर्धा येथे सुतिकागृहाची शाखा निघाली. तेव्हा जमनालालजी बजाज हे त्या गृहाचा महत्वाचा आधारस्तंभ झाले.

कमलाताईचे लक्ष चौफेर असे. आपल्या संस्थेत शिकण्यासाठी, नोकरीसाठी किंवा अन्य कारणांनी आलेल्या मुलींवर त्या प्रेम करीत. माया करीत त्याचप्रमाणे त्यांना काटेकोर वागण्याची शिस्तही लावीत. शांताबाई गणोरकर लिहितात, "एकदा सकाळी दहा वाजता शिरा, फोडणीच्या लाह्या करायच्या होत्या. जिच्याकडे कामाची पाळी होती तिने आधी शेगडी पेटवली. मग लाह्या आण, तूप आण सुरु केले. त्या

अवधीत शेगडी फुलून कोळसे वाया जाऊ लागले. कमलाताईंनी ते पहिले व शेगडी विझवून त्या निघून गेल्या. समान घेऊन ती मुलगी आली व ओरडू लागली, 'कुणी खोडसाळपणा केला? आता शेगडी पेटवून मग लाह्या केल्या तर किती उशीर होईल? कमलाताई रागावतील'. हे कमलाताई ऐकतच होत्या. त्या आल्या व म्हणाल्या, 'मीच विझवली. किती कोळसे वाया जातात. प्रत्येक ठिकाणी काटकसर हवी. आधी सर्व तयारी करून तरच फायदा होतो'. तत्व साधे पण जीवनाला वळण लावण्यात उपयोगी पडणारे.

आपल्याकडे विद्यार्थिनी घरदार सोडून येतात, त्यांना दार सणाला गोड हवे म्हणून कमलाताई चिरोट्यांपासून सर्व पदार्थ करीत. ही मातृप्रेमाची भावना होती. पण त्यातही काही वाया जाता कामा नये ही दृष्टी असे. एकदा शेवयांची खीर खूप केली पण ती नासली. कमलाताईनी फेकून न देता ती आटवली, खवा घालून वड्या कराव्या अशा वाड्या केल्या, दुसऱ्या दिवशी सर्वांनी आवडीने खाल्ल्या. या काटकसरीतूनच मातृसेवा संघ निर्माण झाला".

ही काटकसर नित्याची होती आणि ती सर्वच ठिकाणी होती.

सीताबर्डी सुतिकागृहाचा रजत महोत्सव १९४७ साली झाला आणि त्याच सुमारास दत्तोपंत उर्फ नाना मोहनींनी संस्थेच्या कामात्रास घेण्यात सुरुवात केली. इमारतीसाठी चार लाख रुपये उभे करायचे होते. एका उद्योगपतीकडून देणगी मिळवण्यासाठी नाना कमलाताईंना घेऊन मुंबईला गेले. या प्रवासात कमलताईंची कार्यपद्धती नानांना कळली. नानांचा प्रवास पूर्वी पहिल्या वर्गाचा असे. बरोबर उपसंचालकांन लवाजमा. आता प्रवास तिसऱ्या वर्गाचा. स्वतःचे सामान हातात घेऊन जायचे. टांगा आणि हमाली या बाबतीत काम्लातैची आत्यंतिक काटकसर. जेवायचा खर्च भरपूर. कारण कार्यकर्त्यांच्या अंगी शक्ती यावी.

दिल्लीत राहणाऱ्या चंपाताई वऱ्हाडपांडेही आपल्या आत्याच्या काटकसरी स्वभावाची आठवण सांगतात.

"कधी कधी यमुताई एकटीच दिल्लीला यायची. आगाऊ सुचाना नसायची. आली की स्टेशनवरुन फोन करायची. 'नोकराला सायकलवर मला घ्यायला पाठव' मी कारघेऊन येते म्हटले तर तिचे म्हणणे एकटीसाठी गाडीचे पेट्रोल खर्च करायची गरज नाही. नोकराबरोबर सायकलच्या मागच्या सीट वर बसून ती घरी येत असे".

स्वयंसेवी संस्थेसामोरचे सगळ्यात मोठे आव्हान कोणते अईल तर ते म्हणजे कार्यक्षम माणूस तयार करणे. पैसा उभा करण्याइतकेच ते कठीण असते. परंतु कमलाताईंना ते जमले होते. कमलाताईंनी आपल्यासारख्या अनेक कार्यकर्त्याही तयार केल्या होत्या. डॉ. कमला जोशी म्हणतात. "नागपूरला कोणी दोघी महाराष्ट्रीय परिचारिका एक प्रसूतिगृह चालवितात आणि तेथील व्यवस्था अगदी घरगुती वातावरणाची पण चांगली आहे असे ऐकले होते. ह्या प्रसूतीगृहाची केलेली काही सरकारी व्यक्तींना व डॉक्टरांना खपत नसे. त्या कालच्या दगा हॉस्पिटलच्या अधीक्षक डॉ. मेनेझिस होत्या. त्यांना सुतीकागृहाची टिंगल करण्यात रस होता. शेगावला स्त्रियांच्या दवाखान्यात एका निष्णात स्त्री डॉक्टरच्या, डॉक्टर लोबोंच्या हाताखाली मी आकां करीत असे. डॉ.लोबो नर्सेसच्या ए. एन. एम. च्या परीक्षेसाठी परीक्षक म्हणून येत असत. ए. एन. एम. च्या सीताबर्डी सूतिकागृहातून विद्यार्थिनी बसत असत. परीक्षा घेऊन आल्यावर सूतिकागृहातील विद्यार्थिनींबद्दल बोलणी निघत. "सूतिकागृहाच्या नर्सेसना ड्रेस करता

येत नाही. नऊवारी साडी नेसूनच येतात. त्यांना इंग्लिश येत नाही. आम्हांला प्रश्न विचारताना पंचाईत होते". वगैरे नेहमी म्हणत. मी नागपूरला मातृसेवा संघात लागले तेव्हा शांताबाई लोणकर, ताराबाई परांजपे, द्वारकाताई ठाकूर, सरलाबाई गलगले यांच्यासारख्या परिचारिका कामाला होत्या. त्यांना जरी इंग्लिश येत नव्हतं तरी कमला ह्या सर्व अति प्रामाणिक, कष्टाळू व साध्या राहाणीच्या होत्या. नवीन कोणतीही गोष्ट शिकायला त्या तयार असत. प्रत्येक केस कडे त्या स्वतः जातीने लक्ष देत असत. हळुवार बोलून पेशंटचा पूर्ण विश्वास संपादन करत असत. पेशंटला या सेविकांच्या ताब्यात सुरक्षित वाटत असे. ऑपरेशनने अथवा इंजेक्शनने बाळंतपण करण्याची सोय नसल्यामुळे सर्व प्रसूती आपोआप नैसर्गिकरीत्याझाली पाहिजे यासाठी त्या सतत चिकाटीने पेशंटच्या जवळ राहून त्यांचे मनोधैर्य वाढवत असत. त्या हे निश्चितचकमलाताई आणि वेणूताईंकडून शिकल्या. त्या दोघींचे आदर्श सतत त्यांच्यासमोर होते. कारण त्या वेळेस सिस्टर, ट्युटर, मेट्रन वगैरेसर्व मिळून कमलाताई व वेणूताई होत्या".

परोपकारी स्वभाव, त्यागातली सहजता आणि आत्यंतिक कर्तव्यदक्षता यांमुळे कमलाताईंविषयी भोवताली आदरभाव निर्माण होत होता आणि त्यांचा वचकही वाटत होता. कार्य करण्यसाठी भोवताली माणसे जमत होती. या संदर्भात संताबाई गणोरकरयांनी सांगितलेला, त्या काळात घडलेला एक प्रसंग बोलका आहे. "मी ड्यूटीवर होते. सर्व खाता बाळंतिणींनी भरल्या होत्या. त्यांत एक बाळंत होऊ घातलेली गरोदर स्त्रीआली. एकही बेड रिकामा नव्हता म्हणून आम्ही अकराव्या दिवशी घरी जाणार्या बाळंतिणीला शेक्षेगडी करून खाली गादीवर झोपवले व तिच्या खाटेवर त्या नवीन बाईला झोपवले. नेमके कमलाताईंनी फेरी मारली तेव्हा हे पहिले व सर्वांना बोलावून कडक सवाल केला, 'खाट नव्हती तर माझी खाट न्यायची होती. आजच काही कमलाताई मेल्या नाहीत.' अजूनही त्यांची रागावलेली मूर्ती दिसते. पण त्या रागामागे त्या रोग्याबद्दल नितांत सहानुभूती व प्रेम होते."

श्री. बी. जी. ओक यांनी लिहिलेली आठवण हृद्य आहे. नागपूरला १९६५ मध्ये ते डिटॅचमेंट ऑफ रेटीनाचे रुग्ण होते. दृष्टी राहते का जाते हा भयाण प्रश्न. नेत्रविशारद डॉ. पावा त्यांच्या डोळ्यांची तपासणी करणार होते. पण डॉ. पावा एका महत्वाच्या शस्त्रक्रियेसाठी मद्रासहून सरळ दिल्लीला विमानाने जाणार असे कळले. श्री. ओक कमालीचे निराश झाले. तत्यांच्या अंगावरून हात फिरवत एक वृद्ध स्त्री त्यांना म्हणाली, "हळूहळू सर्व ठीक होईल." त्यांच्या तोंडून अतिशय कडवट, उर्मट शब्द बाहेर पडले. "म्हणणं सोप!माझ्या समोर काळोख पसरलाय. माझ्या आयुष्याला आता अर्थ नाही."

ते ऐकून कमलाताई म्हणाल्या, "पन्नास वर्षापूर्वी एका मुलीला असंचवाटलं होतं. ती ब्राम्हण बालविधवा होती. परंतु तिच्या बंधूनी प्रोत्साहन दिलं. मुलगी नर्सिंग शिकली. सार जग तिनं स्वतःच मानलं. हळूहळू तीला तिच्या विचारांच्या इतर स्त्रिया मिळाल्या. मातृसेवा संघ स्थापन झाला. ती मुलगी म्हणजे मी. जेव्हा आपल्याला सर्व बाजूंनी परिस्थिती घेरून तेव्हा ईश्वर हळूच एक चोर दरवाजा उघडून देतो. हा माझा अनुभव आहे." हे ऐकून श्री. ओक शरमिंदे झाले.

इतक्यात तारेने बातमी कळली की हवामानातील बिघाडामुळे दिल्लीची सर्व उड्डाणे रद्द झाली आहेत. डॉ. पावा हे जी. टी. एक्स्प्रेसने दिल्लीला जाणार आहेत. त्यांनी श्री. ओकयांना तपासणीसाठी नागपूर स्टेशनवर बोलावले. देवाने चोर दरवाजाउघडला. पण पूर्णपणे नाही उघडला. श्री. ओकयांच्या पुढे प्रश्न होता. जी. टी. एक्स्प्रेस नागपूर स्टेशनात फक्त वीस मिनिटे थांबते. कसं जमणार सगळं? पण कमलाताईंनीपुढचा प्रश्न सोडविला. त्या म्हणाल्या की रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री मातृसेवा संघ पाहून खुश झाले होते आणि कोणत्याही दोन गोष्टी मागा म्हणाले होते. कमलाताईनी तेव्हा एकच गोष्ट मागितली

होती. कुठच्याही अडचणीतल्या स्त्रीपर्यंत पोहोचता यावं म्हणून पहिल्या वर्गाचा पास. दुसरी गोष्ट पुढं कधीतरी मागेन असे सांगितले. कमलाताई श्री. ओकयांना म्हणाल्या. “आज ती दुसरी गोष्ट मागण्याची वेळ आली आहे. मी त्यांना विनवीन.” दुसऱ्या दिवशी श्री. ओकांना डॉ. पावा भेटले त्यांच्या डोळ्यांची तपासणी संपूर्ण झाल्यानंतर ग्रॅन्ट ट्रंक एक्सप्रेस नागपूरहून सुटली!

पुढे श्री. ओकयांच्या शस्त्रक्रियेसाठी सोलापूरला त्या त्यांच्याबरोबर गेल्या. हातसडीच्या तांदुळाचा भात मिळाला नाही तर उपाशीपोटी राहून त्यांनी ओकयांची शुश्रुषा केली. ओक यांच्यावरची शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

शालिनी कुलकर्णी लिहितात, “एकदा मी त्यांच्याबरोबर प्रवासाला होते. आम्ही रेल्वेने जात होतो. अकोला स्टेशनवर गाडी थांबली. एक भिकारी डब्यात शिरला. गयावया करून पैसे मागू लागला. कमलाताई म्हणाल्या, ‘माझ्याजवळ तुला द्यायला पैसे नाहीत. तुला भूक असेल तर मी तुला जेवण देईन.’ ताईनी स्वतःकडचा पूर्ण डबा त्याला देऊन टाकला. प्रवास मुंबईपर्यंतचा होता. नेहमीच हाताने दळलेले खाण्याचे व्रत. मुंबईला जाऊन टॅक्सीत बसल्यावर जात्याचा शोध सुरु झाला. एकदाचे जाते सापडले व सकाळी मुंबईत पोहोचलेल्या ताईंना दुपारी साडेचार वाजता जेवायला मिळाले.”

कमलाताई दुःखितांजवळ व्यक्तीशः जाऊन पोहोचत असत. त्यांचे दुःख हलके करून. त्यांना कार्याला प्रवृत्त करीत. सुधाताई डोंगरे यांनी आपली आठवण लिहिली आहे. पुत्रशोकाने सुधाताई व्याकूळ झाल्या होत्या. घरात बसून होत्या त्यांना काही करावेसे वाटत नव्हते. काहीच ओळख नसताना कमलाताई त्यांच्या घरी जाऊन पोहोचल्या. पाटावर बसून समोर असलेले ताक घुसळू लागल्या. त्यांनी सुधाताईंना विचारले, “तुम्ही आता काय करता?” सुधाताईंनी त्यांच्या जुन्या शारदा समाजाची माहिती सांगून म्हटले, “आता मला काहीच करावसं वाटत नाही.सगळं संपलं काम. पुढच्या पिढीने काय ते करावं.” कमलाताईनी उत्तर दिले, “काम कधीच संपत नसतं. इथं आमची मातृसेवा संघ नावाची संस्था आहे.तिथे खुप काम आहे. मला लीलाताईनी तुमच्या बद्दल सर्व सांगितलं आहे. म्हणून मी तुम्हाला बाहेर काढायला आले. घर सुटलं आहे का? जेवणखाण करावंच लागतं ना? तसाच समाजाचं ऋण आपण असे तो फेडत राहिलं पाहिजे.” कमलाताईनी सुधाताईना मातृसेवा संघात बोलावून घेतले. त्यांच्याजागेत काम देऊन त्यांना कार्यात गुरफटविले.

इंदिराबाई कथावात्ते लिहितात, “माझी सासरी गेलेली मुलगी आजार घेऊन माघारी आली. तिला झाला होता क्षय. मी तिची शुश्रुषा करता करता देवाला तिच्या आयुष्यासाठी आळवू लागले. एवढ्या मोठ्या व्यापात गुंतलेल्या कमलाताईनी नित्यनेमानं यावं, मुलीचं कुशलम विचारवं अन् नेत्रांनीच माझा संतवाण करावं. पिध्म जेव्हा तिचं दुखणं अतिशय वाढलं तेव्हा तर ती माऊली रात्र रात्र सोबत करू लागली. एका सामान्य परिचारिकेच्या मुलीसाठी ! त्यांचं हे रूप पाहन माझं अंतःकरण भरून येई. पण शब्द फुटेनात.माझ्या दुर्दैवानं माझी पोर काळानं हिरावून नेली. मला आप्तांचा आधार नसल्यामुळे माझ्या मृत मुलीचे दिवसकार्य कमलाताईंनी आपल्या देखरेखी खाली करवून घेतले आणि मी त्यांच्या ऋणात पूर्णतः बांधली गेले. त्या ऋणाची फेड होण्यापेक्षा अशा समर्थ ऋणात राहण्यातच आनंद मानते आहे.”

कमलाताईंच्या संपर्कातल्या व्यक्ती अशा अनेक आठवणी सांगतात.

अनुक्रमणिका

-थकून भागून कमलाताई रात्री बाकड्यावरच झोपून जात.

- कमलाताईंना चपला घेऊन दिल्या तर त्यांनी त्या अनाथ मुलीला दिल्या. त्या पुन्हा अनवाणीच.

- कमलाताईंनी कोणासाठी रात्री बारा वाजता उठून स्वयंपाक केला.

-कोण आजर्याचे कपडे धुतले.

-मोलकरीण नव्हती तर कमलाताईंनी सगळी भांडी घासली.

-कोणा पंगु माणसाला धीर दिला.

-कोणा नडलेल्या बाईला पैसे दिले.

कमलाताईंनी स्वीकारलेली व्रते जन्मभर पाळली. गांधीजींनी जेव्हा ग्रामोद्योगाबद्दल सांगितले, तेव्हापासून हातसडीचे तांदूळ, जात्यावर दळलेले पीठ, बैलघाणीचे तेल खाण्याचा जो नियम घेतला तो त्यांच्या शेवटच्या आजारापर्यंत चालू होता.

कोणी कमलाताईंना महाराष्ट्राच्या फ्लॉरेन्स नाईटेंगळ म्हटले.

कोणी गीतेची शिकवण पुरेपूर आचरणात आणणाऱ्या निष्काम कर्मयोगी म्हटले.

या सर्व आठवणींमधून त्यांची जी प्रतिमा डोळ्यांसमोर उभी राहते ती म्हणजे त्या सीताबर्डी सुतिकागृहाच्या गृहस्वामिनी होत्या. पारंपारिक हिंदू कुटुंबांमधील कर्ती गृहदेवता. डोळ्यात तेल घालून आपल्या गृहाचा संसार काटकसरीने, दक्षतेने करणारी गृहिणी. प्रसंगी स्वतः उपाशी राहूनही आबालवृधांना, पैपाहुण्यांना, आश्रितांना, अनाथांना हौसेने जेवूखाऊ घालणारी अन्नपूर्णा. गृहासाठी केलेल्या अपूर्व त्यागामुळे एकही शब्द ना उच्चारता दरारा निर्माण करणारी, सर्वांना आपल्या समोर झुकायला लावणारी गृहस्वामीनी.

रमेश गुप्ता म्हणता, “कमांडिंग फेस ज्याला म्हणतात तो चेहरा. आपल्या सात्विकतेचीच जरब बसवणारा आणि ते डोळे! त्यांच्या टपोरेपणाला उपमा नाही आणि तेजास्वितेला सीमा नाही. भल्याभल्यांचे नकार त्यांच्या हुकुमीपणाखाली गळ्यातच जीरायचे. यमुताई म्हणजे मायेचा तुडुंब आणि गूढरम्य डोह. शब्दांचे तरंग कधीमधीच उठायचे. त्या शब्दांना निर्धाराची केवढी धार!”

कमलाताईंची ही भूमिका पारंपारिक वडिलधाऱ्या ‘स्त्री’चीच होती. शेकडो स्त्रिया जी भूमिका आपल्या घरात पार पडत होत्या तीच भूमिका त्या व्यापक क्षेत्रात गाजवत होत्या. एका अर्थाने असे म्हणता येईल की ‘स्त्री’च्या घरातल्या भुमिके चे ते समजिओकिकरन झालेले होते.

अनुक्रमणिका

स्वतःला जे जे मिळते ते सारे काही आपल्या कुटुंबीयांनाही मिळावे ही या गृहस्वमिनीची उत्कट इच्छा. मग ते खाणे पिणे असो किंवा प्रवास असो!

चंपाताई वऱ्हाडेपांडे बरीच वर्षं दिल्लीत राहत होत्या. आपल्या आत्याच्या- कमलाताईच्या आठवणी सांगताना त्या लिहितात, “समाज कार्यकर्त्यांचा प्रथम श्रेणीचा पास तिला मिळायचा. त्यात एक सोबत व एक मदतनीस एवढ्यांना नेता यायचे. त्यामुले त्या पासावर कितीतरी वयोवृद्ध बायकांना तिने हरिद्वार-हृषिकेश-बद्रीनाथची यात्रा करविली. वाटेत दिल्लीला मुक्काम आमच्याकडेच. मग त्यांना दिल्ली दाखवायचे काम आमच्या नोकराचे. त्या बायकांना ती नोकराबरोबर दिल्ली पाहायला पाठवायचीआणि स्वतः माझ्या मदतीला स्वयंपाकासाठी थांबायची.

दिल्लीला हिवाळ्यात मटार, लाल गाजरे मिळत असत. ती स्वस्तही असत. तशी ती टा काळीनागपूरला मिळत नसत. यमुताईला वाटत असे, ‘पंचवटी’ ह्या वृद्धाश्रमातल्या लोकांना इतकी चांगली गाजरे, मटारमिळत नाहीत. म्हणून पोते भरून गाजरे, मटार घेऊन जायची. प्रथांवार्गाचा पास असल्यामुळे सामान नेण्याची अडचण नसे.

सामानाला मर्यादाचा नसायची. तिचा दबदबा असा की कोणी नाही म्हणू शकत नसे.एकदा तर गमंत झाली. दिल्लीला दही-दुधासाठी मातीची कुल्लड मिळत. स्टेशनवर चहाही कुल्लडमध्ये मिळे. ही कुल्लड यमुताईला फार आवडली. वृद्धाश्रमात चहाला चांगली म्हणून पोतेभर घेऊन जाते म्हणाली. रस्त्यात फुटून वाया जातील असे तिला सांगितले. पण ते तिला पटले नाही. तिने ती घेतलीच. दिल्लीच्या स्टेशनवर हमालाला सांगून पोते अगदी काळजीपूर्वक डब्यात ठेऊन दिले. पण नागपूरच्या हमालाच्या बाबतीत ते काही जमले नाही. पोते फलाटावर आपटले. सगळी कुल्लडे फुटून चक्काचूर झाला.”

या कार्तुत्वातून उदारचरित गृहिणीच्या व्याक्तिमत्वातल्या सामान्य गृहिणीच्या छटाही आपल्याला अधूनमधून दिसतात. क्वचित प्रसंगी ही सामान्य गृहिणी टोमणा मारते. एका गृहस्थांची पत्नी वारली. आपल्या लहान मुलाला घेऊन ते कमलाताईंकडे आले. मुलाचे करणे मला कसे जमत नाही, किंवा एकूणच पुरुषांना कसे जमत नाही ते सांगू लागले. त्यांचा अंतस्थ हेतू ओळखून कमलाताई बोलल्या, “मुलाला येथे ठेवा. मी सांभाळीन. तुम्ही खुशाल दुसरे लग्न करा.” घाव घाव गृहस्थाच्या वर्मी बसला. पण पडत्या फळाची आज्ञा घेऊन ते मुलाला कमलाताईंजवळ ठेऊन गेले आणि त्यांनी दुसरे लग्नही केले!

ही गृहिणी आपल्या स्थानाच्या जोरावर कधी कधी आक्रमक होताना दिसते. श्री. यदुनाथ थत्ते लिहितात, “एखाद्या घरी केवळ लोभापायी एखाद्याने एखाद्या वस्तुचा संचय करून ठेवला आहे आणि गव्हाणीवरच्या कुत्र्यासारखं माणूस वागतो आहे, असे दिसले तर निःसंकोचपणे कमलाताई ती वस्तू खुशाल मागत. स्वतः कमलाताईंना ती वस्तू नकोच असे. संस्थेला किंवा संस्थेबाहेरचा एखादा गरजू अशा वेळी त्यांच्या नजरे समोर असे. दुसऱ्याला गरज आहे आणि स्वतःला गरज नाही असे असताना जो वस्तू साठवून ठेवतो तो समाजाचे पाप करतो असे त्यांना वाटे.” सुशीलाताई गाडगीळ म्हणतात, “कमलाताई कधी अचानक दहाबारा मुलं बरोबर घेऊन अगदी आपलेपणाने जेवायला येत व मग मदतही करायला लागत. कधी एकदम मोदक करायला चला म्हणून घेऊन जात. कधी येऊन म्हणत पाचशे रुपये पाहिजेत. कशाला काय हे विचारण्याची आमची हिमंत नसे.आठवणीनं ते परतही आणून देत असत.” या या प्रकारे दुसऱ्यावर आक्रमण करण्याचा आपला अधिकार कमलाताईंनी गृहीत धालेला होता.

अनुक्रमणिका

विमलाताई घरोटे म्हणतात “असामान्य व्यक्ती काही वेळेला अशा काही विक्षिप्तपाने वागतात की त्या आठवणीमनात कायमच्या कोरल्या जातात” असे सांगून पुढे त्यांनी कमलाताईच्या दोन आठवणी सांगितल्या आहेत.

एकदा कमलाताई हिंगणघाट शाखेला भेट देऊन नागपूरल निघाल्या. हिंगणघाट स्थानकावर आल्यावर कळले की गाडी चार तास उशिरा येणार आहे. स्टेशन मास्तराने त्यांना घरी चलण्याचा आग्रह केला. त्या त्यांच्या घरी गेल्या नाहीत.पण त्यांनी स्टेशन मास्तरांकडून स्टोव्ह, पातेलं, चमचा असे सगळे साहित्य प्लॅटफॉर्मवर मागवले. विमलाताईंना मातृसेवा संघाच्या शाखेत शेवया आणि साखर आणायला पाठवले. एका परिचारिकेल दुध आणायला पाठवले. शेवया, साखर, दुध येऊन पोहोचले. कमलाताई पाणी उकळवत वात पाहत होत्याच. दुध आणणाऱ्या परीचारीकेबरोबर कुतूहलाने आणखी परिचारिका आल्या होत्या. शेवयांची खीर तयारी झाली.स्टेशन मास्तरांच्या घरातून वाट्या, मागवल्या गेल्या. हमाल परीचारीकांपासून, सगळ्यांना खीर वाटण्यात आली. कमलाताईनी स्वतः अर्धी वाटीच खीर घेतली. त्यांचा चेहरा तृप्त होता.

दुसऱ्यांदाएकदा विमलाताई आणि ताराबाई कमलाताईंना हिंगणघाट स्थानकावर पोचवायला गेल्या होत्या. गाडीत बसताना कमलाताई ताराबाईना म्हणाल्या “मी आज माझ्याबरोबर विमलाबाईला नागपूरला नेते.” विमलाताईंबरोबर कपडे, पैसे काहीच नव्हते. पण कमलाताईंचा दरारा असा की नाही कसं म्हणणार? कमलाताईंचा पहिल्या वर्गाचा पास होता. शिवाय त्या आणखी एका व्यक्तीला सोबत नेऊ शकत असतताराबाई म्हणाल्या “मुकाट्याने गाडीत चढा” आणि विमलाताई चढल्या. रात्री दहाला नागपूरला पोहोचल्या. कमलाताईनी मेसमधल्या बाईना सांगितले, विमलाताईंना तिखटमिठाचा सांजा आवडतो. सांजा येईपर्यंत रात्रीचे अकरा वाजले. नंतर त्यांनीं विमलाताईना अंथरुणाची सोय करून दिली आणि पाहते चार वाजता विमलाताईना उठवले. स्वतःच्या हातांनी चहा केला आणि हिंगणघाटच्या गाडीत परत बसवून दिले. विमलाताई लिहितात “हा सर्व प्रकार अनुभवून मी मात्र कपाळाला हात लावला.”

मातृसेवा संघ हे कमलाताईंचे घर होते. साहजिकच आपल्या संबंधितांची सर्व कार्ये त्याच ठिकाणी पार पडावीत असा आशी त्यांची इच्छा असायची; कोणी इतरत्र गेलेले त्यांना खपत नसे. या घरात राबणाऱ्या इतरांना त्याचा काही त्रास होतो आहे का याचा विचार करण्याची आवश्यकता त्यांना वाटत नसे. बाळशास्त्री हरदासांच्या पुस्तकाचे प्रकाशन होणार हे कळल्यावर कमलाताई त्यांच्याकडे जाऊन पोहोचल्या. “ग्रंथ प्रकाशन करणार ऐकलं. तुम्हाला मातृसेवा संघाचं सभागृह नाही चालत? असा प्रश्न करून पत्र कुणाला लिहायचे ते त्यांनी सांगितले आणि पैसे पडणार नाहीत हेही ऐकवले.

दुसऱ्या दिवशी सभागृहात परिचारिकांची परीक्षा होती. त्यासाठी बाके, खुर्च्या लावून ठेवलेली होती. विना हरदास लिहितात “कमलाताईंसमोर कोणाचे काही चालले नसावे. व्यवस्थापकांनी सगळ्या बाकांचा ढीग केला. सभेसाठी एक टेबल व चार खुर्च्या लावल्या. कार्यक्रमाच्या फक्त दहा मिनिटे आधी कमलाताई आल्या. त्यांना ती व्यवस्था आवडली नाही. त्यांनी चार डायस जोडून मंच तयार करायला लावला. त्यावर खुर्च्या लावल्या. डेस्क ओळींनी भिंतीशी लावले. ज्यांना काम करायला लागले त्यांच्या चेहऱ्यावर त्रासिकपणा आणि कपाळावर आठ्या. पण कुणाची काही म्हणायची हिमंत झाली नाही.” निरोप घेताना त्या बाळशास्त्रींच्या पत्नीला-वीणाताईंना म्हणाल्या “तुमचा कोणताही कार्यक्रम याच सभागृहात घ्यावा.”

आपल्या घरासाठी आपण स्वतः राबायचे आणि इतरांनाही तसेच राबवायचे हे त्यांनी गृहीत धरले होते.

रमाबाई चौधरींनी लिहिलेली आठवणही कमलाताईंचे अनेक पैलू दाखवणारी आहे. १९६८ सालची अकोला शाखेतली आठवण. संस्थेच्या काही कामाकरिता कमलाताई रात्री आल्या होत्या आणि सकाळी नऊ वाजता त्यांना नागपूरला जायचे होते. पहाटे पाच वाजता रमाबाईंना निरोप मिळाला की कमलाताईंनी ताबडतोब बोलावले आहे. इतक्या अवेळी बोलावल्यामुळे रमाबाई गोंधळल्या. थोडी भीतीही वाटली. आपली काही चूक झाली आहे का ही शंका भेडसावू लागली. पण पोहोचल्यावर कमलाताईंनी हसतमुखानं स्वागत केलं. रमाबाईंनी बोलावण्याचं कारण विचारल्यावर त्यांनी प्रश्न केला, तुम्ही संस्थेवर नाराज का? मग रमाबाईंच्या लक्षात आले की त्यांच्या दोन्ही मुलींची बाळंतपणं संस्थेत केली नाहीत म्हणून कमलाताई अशा साशंक झाल्या होत्या. मुलींची बाळंतपणं अवघड होती. संस्थेत शस्त्रक्रियेची पुरेशी सुविधा नाही. जागा अपुरी हे रमाबाईंनी दिलेले उत्तर त्यांना पटले.

एखाद्या कार्यकर्तीच्या दुरत्वाच्या वागण्याची शंका येऊन कमलाताईंची तळमळ होणे सहज पटू शकते. त्याचे स्पष्टीकारण विचारून मन मोकळे करणे ही वृत्ती निश्चितच स्वागतार्ह आहे. कार्यकर्तीने दिलेले उत्तर मनःपूर्वक मान्य करणे हा तर मनाचा खूपच मोठे पणा आहे. पण स्पष्टीकरण विचारण्यासाठी एखाद्या व्यक्तीला पाहटे पाच वाजता बोलावले ही तळमळीची मात्रा जरा जास्तच तीव्र होते. हा प्रश्न अनौपचारिक पत्राने विचारता आला असता. त्या अनेकदा अकोल्यात येत असत. पुढे कधी भेट झाल्यावर विचारले असते तरी चालण्यासारखे होते.

प्रसंग कोणताही असो रेल्वे स्थानकावर खीर करण्याचा किंवा विमलाताईसारख्या कार्यकर्तीला अकारण एका रात्रीसाठी नागपूरला यायला लावण्याचा! यातून एकच दिसून येते की इतरांच्या अडचणींचा, मनाचा विचार करण्याची त्यांना कधी आवश्यकताच भासत नव्हती. मुख्य म्हणजे कोणीही त्यांच्या वागण्याबद्दल त्यांना जाब विचारत नव्हते. उलट त्यांच्या अशा वागण्याचे कधी कधी कौतुकच होताना दिसते. कर्तुत्व आणि त्याग यांच्या संयोगातून निर्माण झालेल्या अहंकारात या लहरी, आक्रमक, काहीशा आत्मकेंद्रित वागण्याचे मूळ असावे.

स्वतःला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या वागत होत्या. त्यांचा दबदबा असा होता की त्यांना कोणी उलट प्रश्न विचारू शकत नसे. अशा प्रकारच्या लोकशाही वातावरणाशी त्यांचा परिचय नसावा. त्यांना तशी गरजही भासलेली दिसत नाही. एकाधिकारशाहीचे सर्व गुणदोष त्यांच्या कार्ययंत्रणेत असणारच. या संदर्भात श्री. द्वारकानाथ लेले यांचे भाषण महत्वाचे आहे-

“कोणी गर्भश्रीमंत पैशाच्या अडचणीत येऊन त्यांच्या जवळ पैशाची मागणी करायचे धाडस करतो याला काय म्हणायचे? विश्वासच ना? की ही बाई आपली नड भागवीलच. आणि ही बाईही इतक्या विश्वासाने इकडून तिकडून पैसे मिळवते आणि त्या गृहस्थाची गरज भगवते. देणारा मनुष्यही काही कमी धाकधुकीत नसतो. कारण छोटी रक्कमही त्याच्या मानाने भारीच असते. पण यमुताईने त्याला इतकी माया दिलेली असते की पैशाची मायाही तो बाजूला ठेवतो आणि यमुताईला तो पैसे देतो. काही काळाने ते पैसेही ज्याचे त्याला परत होतात. या उठाठेवीबद्दल अनेकांनी यमुताईला नावं ठेवायला कमी केले नाही. पण त्यांनी ते कधी मनाला लावून घेतले नाही.”

अनुक्रमणिका

इंदुमती देशमुख म्हणतात की, कमलाताईंच्या या स्वभावविशेषावरून अनेक वेळा झगडे निर्माण होण्याचे प्रसंग येतात. कारण त्यांच्या आश्रयाला येऊन, त्यांचा नाना परीने लाभ घेऊन मग 'गरज सरो नि वैद्य मरो' या म्हणीला अनुसरून अनेक मंडळी कमलाताईंपासून दुर जातात. सांपत्तयिक व अन्य अडचणीत सापडलेले स्त्री-पुरुष, अनाथ बालके, असे एक ना दोन किती तरी! अडचण भागली की दूर जावे, कमलाताईंचे स्मरणही दाखवू नये, हवे तर कमलाताईंबद्दल सदभिरुचीला न शोभतील असेही उद्‌गार काढावेत. पण पुन्हा प्रसंग आला असता या कमलेच्या कोवळीकीची अनुभवसिद्ध जाणीव असल्याने पुन्हा निःसंकोचपणे दारी यावे, आणि पुन्हा कमलाताईंच्या कृपावर्षावात न्हाऊन घ्यावे. मागील अनुचित वर्तनाबद्दल कमलाताई स्वतः तर कधी बोलणारच नाहीत, पण आवती-भोवती कोणाल बोलूही देणार नाहीत. यामुळे एक प्रकारे वाईट वागणारांना, कित्येक वेळेला अनितीमंतांना तसं वागायला प्रोत्साहन मिळते, असा कित्येकांचा कमलाताईवर आरोप आहे. पण "मला मागचं उकरून काढता येत नाही, आता काय करावं हा विचार करू न मी वागते." असं त्या म्हणतात.

संस्थेच्या आश्रयाला आलेल्या माणसाकडे कमलाताई किती व्यक्तिगत लक्ष पुरवीत असत हे पाहिले की आदरयुक्त आश्चर्य वाटते आणि मनात अनेक प्रश्नही निर्माण होतात. कमल वैद्य यांनी लिहिलेली आठवण या दृष्टीने विचार करायला लावणारी आहे. त्या म्हणतात "वृद्धाश्रमातील मंडळींना त्या सभा-संमेलनाकरिता घेऊन जात. एकदा टाकळीला भन्साळी आश्रमात मोठा समारंभ होतो. त्या मंडळीत अंध गोरेआजीही होत्या.त्यांच्यासाठी कमलाताईंनी डबा करून घेतला होता. टाकळीला पोहोचल्याबरोबर गोरेआजींना त्यांनी हाथ धरून बाथरूममध्ये नेऊन आणले अन् मग त्यांना जेवायला वाढले. त्यांना अंथरून घालून दिले. अशा रीतीने गोरे आजींचे सर्व व्यवस्थित करून मग त्या रसोड्यात व्यवस्था पहावयास व मदत करावयास गेल्या.दुपारी कार्यक्रम सुरु झाला. गोरे आजींनी चांदीची ताटली व पेला बरोबर आणला होता. तो त्यांना सापडेना. त्यासाठी त्यांनी खूप आरडओरडा सुरु केला. 'माझ्या नातवाणे तो दिला होता. आता जाऊन कमलाताईंन विचारा.'

कमलाताई व्यासपीठावर होत्या. गोरेआजी मुळीच ऐकेनात म्हणून नाइलाजास्तव एका कार्यकर्तीने कमलाताईंजवळ जाऊन भीत भीत व हळूच विचारले. कमलाताईंनी लगेच ध्वनिक्षेपकावारून ताटली आणि पेला कुणाला सापडला आहे का, अशी चौकशी केली. तेथील प्रमुख कार्यकर्त्या पुष्पाबेन देसाई यांना ही घटना फार चमत्कारिक वाटली. त्यांनी ध्वनिक्षेपकावर सांगितले की ताटली व पेला मी ठेवला आहे. कार्यक्रम झाल्यावर मिळेल. तव्हा कुठे गोरेआजी शांत झाल्या. कार्यक्रमानंतर पुष्पाबेन म्हणाल्या, कमलाताईंसारख्या थोर श्रेष्ठ अशा व्यक्तींना असा त्रास देणे शोभते का? कमलाताईंनी तरी या अशा बाईला कशाला आणावे? हे समजल्यावर कमलाताई म्हणाल्या, "आंधळ्या झाल्या म्हणून काय झाले त्यांनाही बदल हवा असतो. एका जागी त्या कंटाळतात."

आधार नसलेलेया, रंजल्यागांजल्या वृद्धांना सांभाळण्याचे व्रत कमलाताईंनी स्वीकारले होते. त्यांचे हे वागणे त्यांच्या व्रताशी सुसंगत असेच होते. तरीही मनात अनेक प्रश्न उभे राहतात. म्हातारपणामुळे तारतम्य गमावून बसलेल्या व्यक्तीसाठी सभेच्या व्यासपीठाचे संकेत डावलले जावेत का ? पूर्ण संस्थेचा भार ज्यांनी खांद्यावर घेतला आहे त्यांनी एकेका व्यक्तीत इतके अडकणे योग्य आहे का? गोरे आजींना बरोबर ना घेणे, किंवा बरोबर आणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे कमलाताईंच्या व्रताशी सुसंगत झाले असते का? नेतृत्वाने जर विचार आणि आचार यात काटेकोर संगती ठेवण्याचा अट्टाहास केला तर या प्रकारचे प्रसंग अटळ आहेत का? असा अट्टाहास मुख्य कार्याला साधक होईल की बाधक?

अनुक्रमणिका

कमलाताई सर्वांना वंदनीय होत्या. त्यांच्या त्यागामुळे त्या मोठ्या झाल्या होत्या. सर्व लेखांमधून त्यांचा उल्लेख पुज्य कमलाताई असा होतो. परंतु त्या बरोबरच त्यांचा दरारा होता. त्यांच्या पुढे बोलण्याची हिंमत नव्हती, त्यांचे ऐकायलाच लागले, असे उल्लेखही सरसकट येतात. त्यांचे आक्रमण सहन केले गेले. म्हणून लोकांना ते आवडत होते, पटत होते, त्यांचा त्रासच झाला नाही, असे म्हणणे चुकीचे ठरेल. समोर बोलले नाहीत तरी लोक मागे कुरकुरत होते हे द्वारकानाथ लेले आणि इंदुमती देशमुख यांच्या लेखनातून दिसुन येते.

मात्र या आक्रमक स्वभावामुळेच त्यांनी कितीतरी धडाडीची कामगिरी बजावली.

कमलाताई बर्डीवरून महाल सुतिकागृह सांभाळायला गेल्या. तेथून हाकेच्या अंतरावर कॉंग्रेसच्या सर्व चळवळी चालत. हरिभाऊंच्या सर्व कार्यकर्त्यांची उठबस तेथेच असायची. ते जेवण्याखाण्यासाठी क्वचित झोपण्यासाठीही सूतिकागृहात थांबायचे. त्यामुळे कॉंग्रेसच्या मंडळींशी त्यांचा परिचय झाला. त्यात जी नवयुवक मंडळी घरदार सोडून चळवळीत पडली होती त्यांची कवण कमलाताईंना आली कमलाताईंचे सुतिकागृह त्यांचे घरच झाले. या वणवण करणाऱ्या मंडळींना कमलाताई यथास्थित खाऊपिऊ घालीत. पुष्कळांना, इतकेच कशाला कमलाताईंच्या माहेरच्या मंडळींनाही, तरुण मंडळींची ही ये-जा फारशी आवडलेली नव्हती. पण प्रत्यक्ष कोणाचीही त्याबाबत बोलण्याची हिंमत झाली नाही. जसे मनाला येईल तसे कमलाताई करणार असे अनेक लहानसहान प्रसंगांमुळे जवळच्या मंडळींना उमगले होते. विधवेच्या, बाळंतिणींच्या संस्थेत तरुण पुरुषांचा वावर तत्कालीन समाजास रुजणे शक्य नव्हते. पण कमलाताईनी त्याची परवा केलेली दिसत नाही. इंदुमती देशमुख लिहितात, कोणी तरी येई, एखादी पिशवी कमलाताईच्या खोलीत अंधाऱ्या कोपऱ्यात ठेवी आणि म्हणे, "कोणीतरी संध्याकाळी ७-८ च्या सुमारास येईल, पिशवी ठेवलीय का विचारील. त्याला ही घेऊन जाऊ द्या. त्याचं नाव विचारू नका. "असं सांगणारा तो माणूस अचानक येई तसाच अचानक निघून जाई. देशकार्याला हाथभार लावण्याच्या इच्छेपोटी अशा आलेल्या प्रत्येकाला कमलाताई 'होय' आणि 'बरं' अशी उत्तरं देऊन बसत आणि मग वचनपूर्तीचं तर व्रतच घेतलेलं. कोणी एकजण बरोबर एखाद्याला घेऊन रात्री ११ च्या सुमारास येई. "कमलाताई, हा माणूस काही बोलणार नाही. आजारी रोगी आहे असं समजून गुंडाळून भुसावळपर्यंत पोचवायचा. तिथे उतरवायला येतील, त्यांच्या स्वाधीन करा. पुढच्या गाडीनं तुम्ही परत या अन् आता उठावंच लागेल, कारण सव्वाबाराला गाडी आहे." "बरं" म्हणून कमलाताई बिनबोभाट काम पार पाडीत. तो आजारी रुग्ण म्हणजे बहुदा भूमिगत कार्यकर्ता असायचा.

"कमलाताई, आता पाऊण एक तासानं पंचवीस मंडळी जेवायला येतील, होईल ना तयारी? आता रात्रीचे १० वाजलेत ११ ला ती मंडळी येतील. ११.३० ला शंकराच्या मंदिरात सभा आहे, कार्यकर्त्यांची." असा निरोप येई. "बरं." कमलाताईचं उत्तर. रात्री ११ ला चिमण्याच्या मिणमिणत्या प्रकाशात पंगत अगदी एकीकडे, स्वयंपाकघरात बसे, स्वयंपाकघराचंही दार लाऊन घेतलं जाई. जवळच्या खोलीत कमलाताईच्या विश्वासार्ह मैत्रिणी- विशेषतः कृष्णाताई भावे नी वेणूताई असत. प्रसंग आला, कोणी चौकशी केली तर त्याला टाळावे कसे, आतील लोकांना हे कळवावे कसे, याचे ज्ञान अन् प्रसंगावधान त्यांनाही असे. इ. स. १९३० ते १९४३ कमलाताईनी आपल्या संस्थेच्या व मैत्रिणींच्या सहकार्याने अशी अनेक कामं केली. अनेक लोकांना विशेषतः कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यांनी साहाय्य केले. कारण त्यांचे बंधू कॉंग्रेसचेच कार्य करीत आणि त्यांच्या ओळखीनेच बहुधा अनेक लोक येत.

अनुक्रमणिका

एकदा एक भूमिगत गृहस्थ पंधरा दिवस कमलाताईच्या घरी राहिले. पुढे ते सरकारला सापडले. कमलाताईना कोर्टात आमंत्रण आले. विचारले, “हे गृहस्थ १५ दिवस तुमच्याकडे राहत होते अस्म कळलं. खरंय ना?”

“माझी स्त्रियांची संस्था आहे. तिथ हे गृहस्थ येतील कसे आणि आले तरी इतके दिवस राहतील कसे?” हे कमलाताईचे उत्तर.

पुनःपुन्हा प्रश्न तोच, नि उत्तरही तेच. त्याच गंभीर मुद्रेने, न दचकता, भेदक नजरेने पाहत दिलेले उत्तर. अखेर कोर्ट कंटाळले.

असाच आणखी एक गमतीदार प्रसंग. पोलीस ज्याच्या मागावर होते असा एक चांगला कार्यकर्ता, सूतिकागृहात शिरला. थोडक्यात परिचय करून दिला. बोलणं मुळीच न वाढविता कमलाताईनी आधी समोरचा दरवाजा लावायला सांगितले. नंतर त्या गृहस्थाला म्हणाल्या “आता निजा पाहू त्या पलंगावर. ही पंढरी साडी घ्यायची गुंडाळून. डोक्यावर पदर. तोंड भिंतीकडे. पाय थोडेसे पोटाशी घेऊन निजा म्हणजे उंची थोडी कमी दिसेल. जरा काही दुखतंय असं दिसेल.” एवढे होते आहे तोच दारावर धक्के बसू लागले. पांघरूण नीट घालून व सर्वांना आपआपल्या जागी जायला सांगून कमलाताई स्वतःच दार उघडायला गेल्या. पोलीस सब-इन्स्पेक्टर नि एक शिपाई दोघेजण आत आले व इकडे तिकडे पाहू लागले. सब-इन्स्पेक्टर साहेब जाणकार मुरलेले. “कमलाताई तुम्ही आता काही लपवू नका. आम्ही ज्यांच्या मागावर आहोत त्यांना दूर त्या चौकावरून तुमच्या दरवाज्यातून आत शिरताना पाहिलं. न्कुथे आहेत ते?”

“इथ तर कोणी आलं नाही. आमचा पंडित आला आत्ताच, तो दिसला असेल तुम्हांला. तो बघा लागतोय स्वयंपाकाला आत्ताच. हाथपाय धुवून!” कमलाताई म्हणाल्या, “अहो, तुम्ही हवं तर सारं सुतिकागृह धुंडाळा. माझी ना नाही. हवं तर या पलंगावरच्या बायका पहा. पण त्यांचे चेहरे निरखण्यापूर्वी त्यांच्या नवऱ्यांची परवानगी घ्या मात्र. नाहीतर नसती भांडणे निर्माण करून आमच्या मागे भानगडी करुन ठेवाल.” इतके बोलून कमलाताई जणू एकेकीच्या पलंगाजवळ जायला तयार होऊन म्हणाल्या, “चला तर.”

क्षणभर सारे थक्क होऊन स्तब्ध उभे राहिले. सब-इन्स्पेक्टर झाले तरी त्याचे पाऊल पुढे उचलेना. प्रत्येक पलंगाजवळ जाऊन चेहरे पहिले तर होणाऱ्या अनर्थाचे चित्र त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहिले, ते म्हणाले, “ठीक आहे आम्ही जातो. पण असा माणूस आला, तर वर्दी द्या आम्हांला.”

जी जबाबदारी कमलाताई स्वीकारत ती ठामपणे धैर्याने पार पाडत. सामान्यतः सुधारणेसाठी लोकांना दुखावण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. यामुळे प्रसूतीसाठी आलेल्यांपैकी ज्यांची इच्छा असे अशांसाठी सूतिकागृहात ‘पाचवी-सहावीची’ पूजा ब्राम्हणांकडून केली जाई. परंतु एखाद्या कोवळ्या मुलीसाठी समाजाच्या चाकोरी विरुद्ध जाण्याचे धैर्य त्या दाखवत. त्यांना आईच्या ठिकाणी मानणारे डॉ. टी. एन. देशपांडे सांगतात, “माझ्याकडे नेहमी येणारा एक पेशंट आपली अडचण घेऊन आला. त्याची कुमारी बहिण दुर्दैवाने गर्भार झाली. लगेच ती मुलगी, तिचा भाऊ व मी असे नागपूरला महाल सूतिकागृहात कमलाताईंना भेटलो. प्रथम त्यांनी आम्हां तिघांनाही जेवू घातले. व नंतर आमची अडचण

अनुक्रमणिका

विचारली व तत्क्षणी त्यांनी आम्हांला सांगितले की या मुलीला येथे ठेवा व तुम्ही परत जा. जेव्हा तिच्या भावाने खर्चाबद्दल विचारले तेव्हा त्या काहीच बोलल्या नाहीत.

नंतर त्यांनी त्या मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र घातले व आईच्या प्रेमाने तिचे बाळंतपण केले. मुलगा किंवा मुलीचे काय केले ते आम्हाला कळले नाही. फक्त दुसऱ्या वर्षी तिचा भाऊ तिच्या लग्नाची पत्रिका देण्याकरिता आला, तेव्हाच मला कळले की आमच्या आईने त्या अडचणीतून मार्ग काढला."

यदुनाथ थत्ते यांनी कमलाताईंवर केलेले भाष्य लक्षणीय आहे.

"मातृत्वाची या समाजात नित्य चाललेली विटंबना त्यांना असह्य वाटे. अवांछित संतती हा मातृत्वाला शाप असतो हे ओळखून, गांधी, विनोबांची मते माहिती असूनही त्यांनी कुटुंबनियोजनाची जान आपल्या सुतिकागृहांना दिली. वैचारिक निर्भयतेचे हे एक देखणे उदाहरण म्हणावे लागेल."

मात्र कमलाताईंची कृती उत्स्फूर्त दिसते.त्यामागे माणसाविषयीचा कळवळा आहे. जिव्हाळा आहे. परोपकारी बुद्धी आहे. दयाळू अंतःकरण आहे. समाजमनाच्या समतोल सूक्ष्म अभ्यासातुन येणारे वैचारिक अधिष्ठान नाही पण कार्यकर्तीच्या अनुभवातून आलेले व्यावहारिक शहाणपण आहे. या शहाणपणातून आपला विचार अगदी सोप्या भाषेत नित्याच्या उदाहरणातून त्या जनतेपर्यंत पोहोचवू शकत होत्या. शालिनी कुलकर्णी यांनी लिहिलेला एक प्रसंग याचे उदाहरण आहे.एक वृद्धा कमलाताईंजवळ येऊन खेदाने म्हणाली, "ताई, सुनबाईला तिसरीही मुलगीच झाली." कमलाताई करारी आवाजात म्हणाल्या, "मग त्यात काय बिघडलं? माझ्या आईला मी मुलगी झाले म्हणून बरं नाही का झालं? तुम्ही तुमच्या आईला मुलगी झालात म्हणून दुसऱ्याच्या घराला घरपण आलं! पं. नेहरुंचीही इंदिरा एकच मुलगी आहे ना!" मुलीचा जन्म खेदकारक नाही हे अशिक्षित अडाणी माणसालाही सहज समजावून सांगणारे हे शब्द आहेत.

याच उत्स्फूर्तपणे कमलाताईंनी धर्मातल्या कर्मकांडाविरुद्ध बंडखोरी केली. वीणा हरदास यांची आठवण महत्वाची आहे. पंचवटीमध्ये म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या हस्ते रामरायाची प्रांप्रतीस्था करण्याची कमलाताईंची इच्छा होती. त्यानुसार त्यांनी बाळशास्त्रींना विचारले; बाळशास्त्री म्हणाले, की मूर्तीची प्रतिष्ठा खुशाल करावी. पण प्राणप्रतिष्ठा जर करायची असेल तर नित्याची पंचोपचार पूजा, नैवेद्य याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. कमलाताईंनी मी जिवंत आहे तोपर्यंत ही व्यवस्था होईल असे आश्वासन दिले. कमलाताईंची, इच्छा, आश्वासन, पारंपारिक गृहिणीला साजेसेच होते. पण तरीह त्या कर्मठ नव्हत्या. पुढे वीणा हरदास लिहितात, "अश्विन शुद्ध द्वितीयेला शास्त्रोक्त रीतीने समारंभाला सुरुवात झाली.आम्ही उभयता पुण्याहवाचन केले. होमहवन तेवढे राहिले होते. अकल्पितच माझी 'अडचण' आली. शास्त्राप्रमाणे पत्नी अशुद्ध असताना पुढचे कार्य होऊ शकत नव्हते. सगळ्या ब्राम्हणांनी तास सल्ला दिला. पण कमलाताईंनी सांगितले, 'परगावाहून इतके लोक आले आहेत. ते इतके दिवस अधिक राहू शकत नाहीत. कार्य खोळंबणार नाही. पुढे चालू द्या.' त्यांच्यापुढे कुणाचे काही चालले नाही. रामरायाची प्राणप्रतिष्ठा झाली. ती एकट्या शास्त्रीबुवांनीच केली."

कमलाताईंनी विचारपूर्वक बंडखोरी केली नाही.पण परिस्थितीचा रेटा आल्यावर त्यांनी ती फार सहजपाने केली. त्या ठिकाणी बंडखोरीचा आवेश तर नव्हताच पण आपण बंडखोरीचे पाऊल उचलले आहे

याची जाणीवही दिसत नाही. एवढ्या जमलेल्या उत्सवाचा बेरंग होऊ द्यायचा नाही हे धोरण. त्या व्यवहारी बुद्धीने वागताना सहजपणे बंडखोरी झाली.

कधी संस्थेचे नियम शिथिल करून त्या एखादीचे जीवन मार्गी लावून देत. तर कधी स्वतः झीज सोसून, जातीने लक्ष देऊन, एखादीला आधार देत. पदरात तीन पोरे असताना वैधव्याचा डोंगर कोसळलेल्या शांताबाई लोणकरांना त्यांनी स्वयंपाकघरातल्या कामासाठी संस्थेत ठेऊन घेतले. परिचर्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक ते चौथी पास शिक्षण झालेले नव्हते. म्हणून दोन वर्षे शांताबाईंना शिकवण्यासाठी स्वतंत्र बाई ठेवली. ती बाई आली की ताबडतोब शांताबाईची कामातून सुटका केली जाई. डॉ. कमलाबाई जोशींना परदेशी शिक्षणासाठी जाताना काही रक्कम हवी होती. आपली एक कार्यकर्ता परदेशी शिकून येणार म्हटल्यावर त्यांना आनंद झाला. स्वतःच्या अधिकारात त्यांनी संस्थेची रक्कम देऊ केली. अशी कितीतरी उदाहरणे! कमलाताईंबद्दल असे कौतुकोद्गार सर्व बाजूंनी ऐकू येतात. इंदुमती देशमुख आणि द्वारकानाथ लेले यांनी लोकांच्या मनातली नापसंती ओझरती नोंदवली आहे तेवढीच. बाकी 'मातृसेवा' च्या अंकातून ज्यांनी ज्यांनी त्यांच्यावर लिहिले त्यांचा सूर कमलाताईंच्या गौरवाचा, कौतुकाचा आहे. पण भक्तांनी कोणतेही प्रसंग कौतुकाने वर्णन केले असेल आणि कमलाताईंचा कणखरपणाच ह्यात दिसून येतो असे म्हटले असले तरी सुजाण वाचकाला त्यातून कमलाताईंच्या व्यक्तिमत्वातली विचित्र प्रश्नचिन्हे जाणवतातच.

दुर्गाबाई वझलवार लिहितात की वझलवारांच्या मृत्यू नंतर सर्वजण शोक करू लागले. पण आपल्या कणखर हिमतीच्या स्वभावानुसार कमलाताईंनी सांगितले, "आता त्या स्वयंप्रकाशी झाल्या." संदर्भावरून दिसते की वझलवार दांपत्य तरुण होते. त्यांची मुलगी अगदी लहान होती. अशावेळी सांत्वनाचे हे उद्गार म्हणजे अस्थानी दाखविलेली हिंमत वाटते.

कमलाताई आपला वैधव्य दिवस किंवा वैधव्याचा वाढदिवस साजरा करीत असेही अनेकजण सांगतात. धनत्रयोदशीला 'पंचवटी' प्रवृत्तीला प्रारंभ झाला तेव्हा आपल्या पन्नासाव्या वैधव्य दिनानिमित्त कमलाताईंनी पन्नास मेहूणं जेवायला घातली. कमलाताईंच सगळं वागणं जसं अलौकिक तसंच हे वागणंही पहा किती अलौकिक अशा थाटात या वैधव्य वाढदिवसाचे उल्लेख आले आहेत.

या वागण्यामागच्या मानसिकतेचा अर्थ कसा लावायचा? नवऱ्याच्या मृत्यूनंतर सासारघराशी संबंध पूर्णपणे तुटलेला होता. सासरची माणसे नंतर कधी नागपूरच्या बाजूला फिरकलीही नाहीत. त्या काळातील अनेक मुलींना सासुरवास होता तसा तो त्यांनाही झाला. हा वैवाहिक जीवनाचा काळ केवळ तीन वर्षाचा होता. तो पन्नास वर्षे दूर गेलेला होता. पुढील यशस्वी वाटचालीमुळे वैधव्य ही इष्टापतीच ठरली असे वाटण्यात काहीच गैर नाही. पण वैधव्यामुळे येणाऱ्या आगतिकतेची च्या जीवनात कुठेच उरलेली नसताना पन्नास मेहुणं जेवायला घालून तो दिवस साजरा करणे ही मानसिकता अपसामान्य (abnormal) होती असे म्हणावे का? की वैधव्यात विपरीत काहीही नाही असे जनतेला सांगण्याचा तो एक ढोबळ, भडक प्रयत्न होता?

दिवसेंदिवस त्यांचे कार्य विस्तारत चालले होते. याचा अर्थ त्यांचे व्यक्तिमत्व, कार्यपद्धती कार्यविस्ताराला पोषक होती. १९३७ पासून नागपूरच्या पालीकडे जाण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु झाला होता.

वर्धा येथे शाखा सुरु करण्याचे ठरवले. कमलाताई कामाला लागल्या. दि. १५ फेब्रुवारी १९३७ वसंतपंचमीच्या दिवशी वर्धा शाखेचा उद्‌घाटन समारंभ झाला. श्री. काकासाहेब परांजपे अध्यक्ष होते. कमलाताईंच्या कार्याचे हे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सुतिकागृहाच्या उद्‌घाटनास त्यांनी पुरुष अध्यक्षाला निमंत्रित केले. स्त्रियांसाठी उभारलेल्या कार्यात पुरुषांचा सहभाग कमलाताईंनी स्वाभाविकपणे गृहीत धरलेला दिसतो. स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांना आश्रय देण्यास त्या दचकल्या नाहीत. अनेक पुरुष त्यांच्या कार्यात सहभागी झाले. मातृसेवा संघाच्या स्मरणिकेमध्ये कमलाताईंविषयी, संस्थेविषयी बरेच काही लिहिले गेले आहे. त्यात कोठेही स्त्री-पुरुषांच्यामध्ये पडदा असल्याचे जाणवत नाही. संस्थेचे वातावरण नैसर्गिक निकोप राहण्यासाठी ही कार्यपद्धती योग्यच होती. मात्र सामाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन त्या व्यवस्थित जाणत होत्या. डॉ. वसंतराव वांकर सांगतात, "कमलाताईंच्या बहुतेक कार्यकर्त्या विधवा, परित्यक्ता होत्या. तरुण होत्या. त्यांच्यावर नव्या शाखांची जबाबदारी कमलाताईंनी सोपविली. परंतु एकट्या स्त्रीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन स्वच्छ नसतो. म्हणून कमलाताई गावातील प्रतिष्ठितांशी संपर्क साधत.आपल्या कार्यकर्तीमागे त्यांचे पाठबळ निर्माण करीत असत. आपली कार्यकर्ती गावात सुरक्षित असली पाहिजे हे कमलाताईंनी प्रथम पहिले. तरच ती निर्भयपणे कार्य करू शकेल याची त्यांना जान होती." कमलाताईंनी वर्धा येथे सर्व व्यवस्थापनासाठी कृष्णाताई भावे यांनी नेमणूक केली. तेव्हा त्यांनी वर्धा येथील जमनालाल बजाजव सर्व गांधी परिवारामध्ये कृष्णाताईची ओळख करून दिली आणि त्यांच्या हातात शंभर रुपये सुपूर्द केले.

शाखा हळूहळू वाढतच गेल्या. निरनिराळ्या क्षेत्रातील व्यक्ती, पुढारी, मंत्री, लेखक, समाजकार्यकर्ते संस्थेत भेटी दते असत. या मागे कमलाताईंचे परिश्रम असत. थोर व्यक्तींचे विचार आपल्या संस्थेतील महिलांना ऐकवावेत याची त्यांना खास आवड. साने गुरुजींच्या व्याख्यानासाठी त्यांचे प्रयत्न चालले होते. त्यांना काही वेळ होत नव्हता. शेवटी एके दिवशी रात्री अकरा वाजता. त्या त्यांना घेऊन संस्थेत आल्या. संस्थेतच साने गुरुजींची जेवणाची, झोपण्याची व्यवस्था केली. दुसरे दिवशी पाहाटे साडेचार वाजता प्रार्थनेच्या वेळी त्यांनी साने गुरुजींचे व्याख्यान सर्वांना ऐकवले.

सीताबर्डी सुतिकागृहाची पहिली नोंदणी झाली तेव्हा त्याची घटना अगदी जुजबी होती. आता विस्तारलेल्या संस्थेला अधिक सुव्यवस्थित काटेकोर घटनेची आवश्यकता वाटू लागली. १९५४ मध्ये वर्धा येथून श्रीकृष्णदास जाजू या वकिलांना पाचारण केले गेले. त्यांनी संस्थेसाठी नवी घटना तयार केली. याचवेळी संस्थेचे नामांतरही झाले- "मातृसेवा संघ". हरियाणामधील सत्याबाला तायल १९५६ मध्ये मातृसेवा संघाचे तहहयात कार्य करण्यासाठी दाखल झाल्या. आता 'सुतिकागृह' हा विचार समाजात रुजला होता. शहरात इतरत्र खाजगी सुतिकागृहे सुरु झाली होती. मातृसेवा संघाने काळाची पाऊले ओळखून 'सुतिकागृह' एवढेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही. संस्थेने आता निरनिराळ्या क्षेत्रांत प्रवेश करायला सुरुवात केली. नव्या उपक्रमांसाठी मातृसेवा संघाने प्रथमपासून एक खास शब्द योजलेला दिसतो-'प्रवृत्ती.' उदाहरणार्थ-दुर्बलमनस्कमुलांचे केंद्र 'नंदनवन' हि एक प्रवृत्ती.वृद्धाश्रम 'पंचाती' हि एक प्रवृत्तीच याप्रमाणे समाजकार्य महाविद्यालय, विकालांगाचे पुनर्वसन, या प्रवृत्तीही सुरु झाल्या. सर्व उपक्रमांचा आणि शस्त्रांचा एकमेकांशी संपर्क साधला जाण्यासाठी 'मातृसेवा' नावाचे एक मासिक सुरू झाले. हि एक प्रवृत्ती.


अनुक्रमणिका



*पद्मश्री कमलाताई होस्पेट*



अनुक्रमणिका



मातृसेवा संघ, नागपूर इमारत



जयदेव प्रसाद भास्कर मातृमंदिर, चांदूर रेल्वे

## दुसरा आधारस्तंभ : सत्यबाला तायल

मातृसेवा संघाचा पसारा दिवसेंदिवस वाढत चालला होता. या वाढत्या मोठ्या पसाऱ्याला आवर घालण्यासाठी जबाबदार मदतनीस स्त्रीची आवश्यकता भासू लागली होती. कमलाताई सतत कार्यकर्त्यांच्या शोधात होत्या. नवनवीन माणसे कार्यात सहभागी होत होती. काही सोडूनही जात होती. काहीजण अल्प वेतन घेत होते.काहीजण पूर्णपणे विनावेतन कार्य करीत होते. अनेक डॉक्टर सहकारी मिळाले होते. मनोभावे संस्थेला वाहून घेतलेल्या निष्ठावंत स्वयंसेविका लाभल्या होत्या. परंतु नेतृत्वगुण असलेली तरुण स्त्री संस्थेसाठी पाहिजे होती. ती पूर्णवेळ किंबहुना आयुष्यभर मातृसेवा संघाची बांधीलकी मानणारी असावी असेही वाटत होते. अशी स्त्री अजून भेटलेली नव्हती.

देशसेवेला वाहून घेतलेले सर्वदूर हिंडणारे कमलाताईचे बंधू हरिभाऊ यांना त्यांच्या भटकंतीत पंजाबमधील हिस्सार गावात अशी एक तरुण स्त्री आढळली-सत्यबाला तायल. त्यांचे घराणे बड्या जमिनदाराचे. बनिया, मारवाडी. ७ ऑक्टोंबर १९२४ चा सत्यबालाताईंचा जन्म. त्या श्रीमंतीतच वाढल्या. डॉ. वि. स. जोग त्यांची माहिती देताना लिहितात, “त्यांचे आजोबा लाल चंदुलाल हे हरयाणातील हिस्सार गावचे मोठे जमीनदार होते. ते आर्यसमाजी होते. लाला लजपतराय यांचे निकटचे सहकारी होते. हिंदुत्वाचा अभिमान त्यांच्या रोमारोमात भिनला होता. पण ते हिंदुत्व तथाकथित धर्मपंडितांच्या हिंदुत्वान्सारखे वांझ नव्हते, उपयुक्त संघटनतत्वांना जन्म देणार होते. हिस्सारमध्ये एकदा भयंकर दुष्काळ पडला. गोरगरीब शेतकऱ्यांनी गाईगुरे कसायाकडे विक्रीसाठी चालवली. लाला चंदुलाल यांनी ती हजारो गुरे खरेदी केली. दूषकाळ ओसरेपर्यंत पोसली. लाला चंदुलाल यांचे पुत्र लाल जयदेव. यांनीही समाजसेवेची पितृपरंपरा नीट जपली. काही चांभार मुलांना त्यांनी आपल्या मोठ्या कुटुंब परिवारात नेहमीकरिता सामावून घेतले. तत्कालीन मारवाडी समाजात अपवादानेच आढळणारा पुरोगामित्वाचा हा वासरा घेऊनच सत्यबाला तायल घडत होत्या, वाढत होत्या. सत्यबालाताईचे मातुल घराणे म्हणजे श्री. रघुवीरसिंह यांचा संपन्न परिवार पाश्चिमात्यांच्या आधुनिक विचारसरणीने झपाटलेला होता. त्यांची आई त्या काळच्या सुशिक्षीत धीट हिंदू स्त्रीचा नमुना होती. तिने कधी पदडा पाळला नाही. कधी घुंगट घेतला नाही. आपल्या पतीसमवेत सार्वजनिक समारंभात जाण्याचे तिने कधी टाळले नाही.

हिस्सारच्या मिशनरी हायस्कूलमधून सत्यबालाताई शालांत परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. संपूर्ण हिस्सार जिल्ह्यात त्या पहिल्या आल्या. पंडित नानकचंद वकील यांनी पालकत्वाखाली लाहोरच्या किनमंड या मिशनरी महाविद्यालयात त्यांचे पुढचे शिक्षण सुरु झाले. महाविद्यालयात ‘चॅपल’ (धर्म शिक्षणाचा तास) बायबलचा अभ्यास आदींची सक्ती होती. परंतु सत्यबालाताईंच्या मनावर आर्यसमाजाचे आणि पुरोगामी हिंदुत्ववादाचे संस्कार इतके जबरदस्त होते कि ख्रिश्चन धर्माचे आकर्षण त्या कोवळ्या वयातही त्यांना कधी वाटले नाही. लाहोरमध्ये ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन या कम्युनिस्ट विद्यार्थी संघटनेशी सत्यबालाताईंचा संबंध आला.पण कॉंग्रेसचा प्रभाव अधिक होता. महाविद्यालयीन विद्यार्थिनी असतानापासून त्यांनी खादीचे व्रत घेतले. ते आजतागायत टिकविले आहे. १९४३-४४ मध्ये सत्यबालाताई बी. ए. च्या परीक्षेत संपूर्ण पंजाब विद्यापीठात पहिल्या आल्या. गणित, खगोलशास्त्र हे त्यांचे प्रमुख विषय होते. त्यानंतर म. ए. करण्यासाठी त्यांनी बनारस विश्व हिंदू विश्वविद्यालयात नाव नोंदवले. दुर्दैवाने त्याच सुमारास सत्यबालाताईंना दीर्घ मुदतीचा ताप आला. अर्ध्या शैक्षणिक सत्रातून त्यांना हिस्सारला परतावे लागले.”

अनुक्रमणिका

देशात फाळणीचे वारे वाहूलागले होते. फाळणी जरी झालेली नव्हती तरी मुस्लीम प्रदेशातून निर्वासितांचे लोंढे हिस्सारच्या आजूबाजूला येऊ लागले होते. १९४४ मध्ये हिस्सारला सत्यबालाताईंच्या सार्वजनिक कार्याला आरंभ झाला.निर्वासितांच्या मदतीसाठी त्यांनी स्त्रियांना एकत्रित केले. केंद्र उभे केले. शाळेत, तंबूत निर्वासितांची राहण्याची सोय केली. लोकांकडून अन्न, अंथरूण-पांघरूण जमवून निर्वासितांना देऊ केले. स्वातंत्र्य मिळाले, फाळणी झाली. निर्वासितांचे पुनर्वसनाचे काम आटीतटीने सुरु झाले. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्यांना वैद्यकीय मदत पुरविणे, छावण्यात मेलेल्या प्रेतांची विल्हेवाट लावणे इत्यादी प्रकारच्याही सर्वच कार्यात सत्यबालाताई घुसल्या होत्या. बालात्कारित स्त्रियांच्या धक्काग्रस्त मनाला दिलासा देत होत्या. गर्भवती स्त्रियांना प्रसूतिगृहात नेण्याची व्यवस्था करीत होत्या. एका संकटग्रस्ताला सावरून सुटकेचा निःश्वास टाकावा तो दुसर्या आपद्ग्रस्ताचा आक्रोश ऐकू येई. हि तरुणी त्या प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होती.

निर्वासितांचे पुनर्वसन संपते न संपते तोच भोवतालच्या प्रदेशात कडक दुष्काळ पडला. तेव्हा दुष्काळ निवारण समितीच्या त्या सचिव झाल्या. हजारो मैल दुष्काळी टापू त्यांनी पायाखाली तुडवला. एकशेवीस अंश फॅरनहीट तपमानात कधी पायी, कधी उंटावरून, कधी जीपमधून फिरल्या.मदतीचे काम केले. आपल्या दुष्काळी दौऱ्याचा वृत्तांत त्यांनी 'हिंदुस्थान टाइम्स' या दैनिकाला दिला. हे दैनिक गांधीजींचे पुत्र चालवित असत. त्या दैनिकाने हा वृत्तांत 'आमच्या खास प्रतिनिधीकडून' म्हणून छापला. परिणामस्वरूप काही दिवसांतचा नव्वद लाख रुपये पुनर्वसन कार्यासाठी जमा झाले. सत्यबालाताईंनी यशस्वीपणे पार पाडलेल्या या विधायक कामगिरीमुळे कॉंग्रेसच्या अत्यच्च वर्तुळात त्यांचे नाव पोहोचले. स्वतः गांधींनी त्यांची विचारपूस केली.

पुढे स्थानिक पातळीवर साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण प्रसार, त्यासाठी राजा बाजा प्रायमर्स सारख्या त्या काळात गाजलेल्या अंकलिपी किंवा चित्रमालेची निर्मीती, कस्तुरबा बालवाडी या मोहिमाही सत्यबालाताईंना तडाखेबंद उत्साहाने पार पाडल्या.

घरामध्ये सत्यबालाताईच्या विवाहाचा विचारही सुरु होता. दहेज देऊन विवाह करावयाचा नाही हे त्यांचे निश्चित ध्येय होते. तत्कालीन मारवाडी समाजात ही फारच कठीण अट होती. जातीच्या बाहेर लेकीने विवाह करावा अशी आईची अजिबात इच्छा नव्हती. सत्याबालाताईच्या स्वतःच्या मनात जातीभेदाची कल्पना नव्हती. तरीही या बाबतीत आईचे मन मोडण्याची त्यांची यत्किंचितही विचार केला नाही. विवाहाच्या प्रश्नात गुंतून त्यांनी आपले कार्य ही थांबवले नाही.

दुष्काळ निवारणाच्या कार्यात असताना सत्यबालाताईंचा शंकरराव देवांशी परिचय झाला. शंकरराव देवांमुळे विनोबाजींच्या कार्याची ओळख झाली. सत्यबालाताईंना भूदान चळवळीचे विलक्षण आकर्षण वाटले आणि त्यांनी त्या कार्यात उडी घेतली. प्रथम आपल्या आजोबांकडेच जमीन मागून त्यांनी आपल्या कार्याला आरंभ केला. आजोबांनी आपली सातशे एकर जमीन भूदान चळवळीला दिली. हिस्सार जिल्ह्यातच तीस हजार एकर जमीन त्यांनी मिळवली. गाववाले त्यांना भूदानवाली बाई म्हणत आणि आल्यागेल्याला सांगत, "चंदुलालकी पोती हमारे गावमे आये- ये खून मांगे तो भी हम देंगे, ये तो सिर्फ जमीन मांगती है." लोकांचा प्रतिसाद उत्साह वाढविणारा होता. परंतु मिळालेल्या जमिनीचे वितरण मात्र बरोबर झाले नाही. सत्यबालाताई अस्वथ झाल्या. त्या चळवळीपासून मानाने तुटल्या. त्यांचा तीव्र अपेक्षाभंग झाला.

अनुक्रमणिका

तरीही त्यांच्या भूदान चळवळीतील कर्तबगारीचा बोलबाला कॉंग्रेसच्या वर्तुळात चांगलाच झाला. कॉंग्रेसच्या सत्तेच्या राजकारणात सत्यबालाताईंना निमंत्रण द्यावे, असा विचार सुरु झाला. नेमके याचवेळी हरिभाऊ मोहनी हिस्सारला आले होते.

हरिभाऊंना ही तरुणी मातृसेवा संघाचे कार्य करण्यास योग्य वाटली. त्यांनी तसे सत्यबालाताईंच्या वडिलांना सुचवले. नंतर कमलाताई दोनतीन वेळा हिस्सारला सत्यबाला तायल त्यांच्या घरी गेल्या. त्यांच्या वडिलांना म्हणाल्या, "तुमची मुलगी आमच्या संस्थेच्या कार्यासाठी द्या." सत्यबालाताईचे वडिल त्यांना 'हो' म्हणाले. मे १९५६ मध्ये वडिल वारले. वडिलांची इच्छा पुरी करण्याचा निर्णय सत्यबालाताईंनी घेतला. आज सत्यबालाताई सांगतात, "त्यावेळी मी तीन महत्वाचे निर्णय घेतले. पहिला म्हणजे विवाह करायचा नाही. दुसरा म्हणजे राजकारणात शिरायचं नाही आणि तिसरा म्हणजे हिस्सार सोडून नागपूरला जायचे नाही. हे तिन्ही निर्णय तसे कठोरच होते. पण मी ते घेतले. Some women choose the path of ease and happiness in the conventional sense. I have chosen the path of hard work which even if fraught with difficulties leads to fulfilment because it is development oriented."

जून १९५६ मध्ये त्या नागपूरच्या मातृसेवा संघात दाखल झाल्या. सत्यबालाताईंच्या आईचा व भावांचा त्यांच्या या निर्णयाला खूप विरोध होता. हिस्सार आणि नागपूर शेकडो मैलांचे अंतर. मुलुख परका. भाषा वेगळी. नागपूरला कोणी नात्यागोत्याचे नाही. समाजकार्य करणे हिस्सारलाही चालूच होते मग नागपूरला कशासाठी जायचे? पण सत्यबालाताईंनी मानले नाही. वडिलांनी कमलाताईना दिलेला शब्द पाळण्याची त्यांची इच्छा होती. शिवाय त्यांना सतत एक जाणवत होते, कि हिस्सार आणि आसपासच्या भागात बड्या जमीनदाराच्या घरातील एक कन्या अशीच त्यांची इतरांना ओळख होती. त्यांचे स्वतःचे कर्तुत्व होते तरी त्यात त्या पार्श्वभूमीचा वाट होता. नागपूर हा त्यांच्यासाठी सर्वस्वी वेगळा मुलुख होता. तेथे त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी कोणालाच ज्ञात नव्हती. येथे जे कार्य करायचे ते पूर्णपणे स्वतःच्या ताकदीवर. म्हणूनही सत्यबाला तायल यांनी नागपूरच्या मातृसेवा संघाची वात धरली.

मातृसेवा संघाने त्यांना तहहयात निवासाची जागा दिली. भोजनाइतके पैसे दिले. बाकी खर्चासाठी सत्यबालाताईच्या घरून पैसे येत होते. सत्यबालाताईंच्या रूपाने कमलाताईंना मनासारखी सहाय्यक मिळाली.

सत्यबाला तायल यांनी मातृसेवा संघाच्या सर्वच कार्यात लक्ष घातले. संस्थेला तोपर्यंत चांगलेच स्थैर्य आले होते. नव्या नवलाईचा काळ संपला होता. पण स्थैर्यातून निर्माण होणारे नवे प्रश्न सुरु झाले होते. पगारी मंडळींची संख्या वाढू लागली होती. नोकरदारांच्या खास मानसिकतेने संस्थेत प्रवेश केला होता. तरीही ताज्या दमाच्या सत्यबाला तायल यांनी समाजकार्य महाविद्यालय ही नवी 'प्रवृत्ती' सुरु केली. ती विद्यापीठाला जोडून नागपूरच्या मातीत खोल रुजवली. या प्रवृत्तीद्वारा नव्या काळाचे प्रश्न समजावून घेण्याचा आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न चालविला. म्हणूनच समाजकार्य महाविद्यालयातून कौटुंबिक सल्ला केंद्र, दत्तकसेवा प्रकल्प, व्यसनमुक्ती केंद्र असे प्रकल्प सुरु झाले. विकलांग मुलांच्या पुनर्वसनाचा नवा प्रकल्प उभा झाला. सत्यबालाताईंनी संस्थेच्या हिशोबात लक्ष घातले. पैशाचा अपव्यय कोठे होतो आहे ते शोधू काढले. पैसा कोठे वाचवता येईल, निधी कसा जमवता येईल याचा व्यवस्थित विचार करून कार्याची आखणी केली. प्रत्येक 'प्रवृत्ती' आर्थिक बाजूने स्वावलंबी असली पाहिजे असे धोरण ठेवले. समाजकार्य महाविद्यालयाच्या प्राचार्य असताना पहिली दहा वर्षे त्यांनी वेतन घेतले नाही. म्हणजे

पगारावर सही करून तो संस्थेलाच परत देणगी देत असत. दहा वर्षानंतर त्या पगार घेऊ लागल्या. सत्यबालाताई आज मिस्कीलपणे सांगतात, "एक मात्र निश्चित. पगार घ्यायला लागल्यावर भोवताली माझी इज्जत वाढली. मी हाडाची बनिया मारवाडी. मला पैशाचं महत्व चांगलं कळतं. इथे आल्यावर पहिल्या आठ वर्षात मी संस्थेची आर्थिक परिस्थिती मजबूत केली. कामाची सचोटी लागतेच. मला तर या संस्थेखेरीज दुसरं काही व्यवधान नव्हतं. म्हणून मी काम करीतच होते. पण संस्थेचा पैसा वाचविणं, सतत नवीन पैसा कसा निर्माण होईल हे पाहणं हेही मी केलं. या पैशाचा उपयोग गोरगरीब बायकांसाठी कसा करायचा ते मी पाहताच असते.

मी घेतलेल्या तीन निर्णयांचा मला कधीही पश्चाताप झाला नाही. कॉंग्रेसनं मला सन्मानानं बोलावलं होतं. ते निवडणूकीचं तिकीट देऊ इच्छित होते. मला चांगली कौटुंबिक पार्श्वभूमी होती. स्वतःचं कर्तुत्व होतं. मी जर राजकारणात पडले असते तर पंजाबमध्ये केव्हाच मंत्री झाले असते. पण मला त्या मार्गानं जायचं नव्हतं. मला जणतेसाठी कार्य करायचं होतं. माझा प्रदेश सोडून नागपूरला येऊन मी स्वतःचं असं कार्य उभं केलं. यात मातृसेवा संघाचेही श्रेय आहे. इथं पहिल्यापासून वातावरण चांगलं. एकटी स्त्री म्हणून मला कधीही असुरक्षित वाटलं नाही. झगडे झाले तरी एकंदर वातावरण सहकार्याचं. कार्यनाश व्हावा असं कोणाला वाटलं नाही.

कमलाताईंच्या मृत्यूनंतर वातावरण खूप बदललं. कधी नाही ते कोर्टाची पायरी चढावी लागली. फारच संघर्ष सुरु झाला. मग संस्थेच्या सगळ्या कारभारात ढिलाई आली. पेपरमधेही बऱ्याच उलटसुलट बातम्या छापल्या गेल्या. पण मी जे तन मन धन अर्पून कार्य केलं होतं, त्याचं शेवटी चीज झालं. मला अनेकांनी अनेक प्रकारे मदत केली. म्हणून मी सगळा कारभार पुन्हा सुरळीत करू शकले. पहिल्या पिढीतल्या बहुतेकांनी विनावेतन काम केलं. आताच्या काळात ते जवळजवळ अशक्य आहे. आता सत्तर वर्षे वयाच्या आसपासची जुनी माणसं तेवढीच विनावेतन काम करतात. तरुण माणसं सगळी पगारी आहेत. मी त्यांना दोष देत नाही. परिस्थिती बदलली आहे. मला म्हणायचं आहे, मोबदला घ्या आणि प्रामाणिकपणे काम करा. ही सगळी वस्तुस्थिती लक्षात घेऊन पुढच्या योजना आखल्या पाहिजेत."

सत्यबाला तायल यांनी निर्माण केलेल्या समाजकार्य महाविद्यालयाची आधुनिक इमारत नागपूरात डौलाने उभी आहे. भोवताली सगळीकडे ऐकू येते की तायल बाई म्हणजे कामाचा तडाखा आहे आणि बोलण्याचाही फटाका आहे. चूक वाटली कि ताडताड बोलतात. किती टोकाला जाऊन तोडून बोलतील त्याचा नेम नाही. संस्थेतले सहकारी किंवा घरातली स्वयंपाकीण कोणीच त्यातून सुटू शकत नाही. त्यांच्या डोक्यात राग टिकत नाही. पण अधूनमधून तो जोरात उसळी घेत असतो. त्यांचा प्रामाणिकपणा, तळमळ सगळीजणं समजून आहेत. म्हणून कोणी आकस धरत नाही.

एखाद्या प्रायव्हेट कंपनीच्या मॅनेजिंग डिरेक्टरसारखी सत्यबालाताईंची कार्यपद्धती आहे. संस्थेच्या आवारात त्या राहतात. त्यामुळे कार्याशी बांधीलकी चोवीस तास आहे. विकासाच्या त्यांच्या मनातील कल्पना निश्चित आहेत. निवासी नोकरवर्ग, बागकाम, रुग्णालयातील वर्दळ सगळीकडेच त्यांचे लक्ष असते. संस्थेच्या प्रत्येक प्रवृत्तीची स्वतःची इमारत असणे, त्यात आधुनिक सुविधा असणे, बँक-बॅलन्स वाढणे, लाभार्थींची संख्या वाढणे हा त्याचा दृष्टीने निश्चित विकास आहे. व्यक्तीचे आत्मबळ वाढविणे, व्यक्तिमत्व प्रगल्भ होणे यांवर त्यांचा जोर दिसत नाही. वंचित गरीब वर्ग हा लाभार्थी असावा असे त्यांचे प्रयत्न असतात. कोणत्या शासकीय योजना संस्थेद्वारे राबविता येतील, त्याचे फायदे तोटे कोणते हा विचार त्या

सतत करीत असतात. शासकीय योजनेतील कर्मचारीवर्ग अमुकतमुक वर्षंझाल्यावर मातृसेवा संघाकडे भविष्यनिर्वाह निधी इ. मागण्या करू शकतो का या नियमांचे गणित त्या मांडत असतात. एखादा शासकीय प्रकल्प कोणत्याही क्षणी बंद होऊ शकतो आणि आपली नोकरी जाऊ शकते. अशी टांगती तलवार डोक्यावर असली तर कर्मचारी मनःपूर्वक काम करू शकत नाहीत आणि परिणामी संस्थेचा तोटा होतो. या परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा याचा त्यांना सतत विचार करावा लागतो. कारण शासकीय योजनांची स्वयंसेवी संस्थांना गरज असते आणि त्यांचे शासनावर कोणतेही नियंत्रण नसते. कोणत्याही संस्थेचा पसारा जसजसा वाढत जातो तसतशी राजकारण, अर्थकारणाची गुंतागुंतही वाढत जाते. हे सर्व मातृसेवा संघातही आहे. सत्यबाला तायल यांचा या सगळ्यांशी सतत सामना सुरु आहे.

संस्था विस्तारत असताना कार्यालयीन कागदपात्रांचे कामकाजही वेगाने विस्तारत चालले. कमलाताई लोकसंग्रह करण्यात कुशल. स्वयंपाकपाण्यापासून बेडपॅन उचलण्यापर्यंत सर्व कष्टाला खंबीर. पण कागदपत्रांचे काम त्यांचे काम नव्हते. ती सर्व जबाबदारी त्यांच्या बंधूंनी, विशेषतः नाना मोहनींनी स्वीकारली होती. सेवानिवृत्त झाल्यावर तर ते पूर्णपणे मातृसेवा संघाच्याच कार्याला लागले होते. संस्था सुरु झाल्यापासून शासकीय यंत्रणेत कितीतरी बदल झाले होते. ब्रिटीश हिंदुस्थानातल्या या सेंन्ट्रल प्रॉव्हिन्स ॲन्ड बेरार मध्ये १९३७ साली कॉंग्रेस सरकार आले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. १९६० साली भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र राज्य जन्माला आले. कार्यालयीन कामाच्या कार्यवाहीचा मार्ग सतत बदलत गेला. काही कामे नागपुरात काही पुणे-मुंबईत, काही दिल्लीत. कागदी घोडे नाचविण्याचे किचकट काम नानांनी कसोशीने केले. मात्र त्यामुळे कमलाताईच्या हातून सूत्रे सुटली असे अजिबात नाही. कागदी घोडे नाचविणे जमत नसले तरी त्या आपल्या ध्येयाशी ठाम होत्या. या संदर्भात वीणा हरदास यांनी लिहिलेली आठवण महत्वाची आहे.

“कमलाताईंनी वृद्धाश्रम काढला तेव्हा त्यामागचा त्यांचा हेतू असा होता की त्यांच्या नर्सेस निवृत्त झाल्या म्हणजे त्यांना एक हक्काचं स्थान असावं. पुढे बाहेरचे निराधार वृद्धही तिथे प्रवेश घेऊ लागले. वृद्धांची आणि अनाथ मुलांचीही कमलाताईंनी तिथेच व्यवस्था केली. तिथल्या विहिरीला उन्हाळ्यात पाणी नसे. तेव्हा इतक्या लोकांची दोन-तीन महिनेपर्यंत काय व्यवस्था करायची असा प्रश्न कार्यकारी मंडळापुढे होता. मला त्यांनी सभासद करून घेतले होते. वरील विचारासाठी एक दिवस सभा घेतली होती. सुशीलाबाई मोहनी त्यावेळी अध्यक्ष होत्या. स्वतः कमलाताईचे स्थान मात्र निमंत्रिताचे होते. त्यांचे बंधू श्री. नानासाहेब मोहनी यांनी असा एक विचार मांडला कि, मुलांना त्यांच्या आईबपांकडे पाठवावे. अन् कमलाताईंचा चेहरा एकदम उग्र झाला. त्या म्हणाल्या, “तुम्ही सरकारकडून देणगी घेता तेव्हा ही मुलं अनाथ आहेत म्हणून सांगता आणि आता त्यांना आईबापाकडे पाठवतो म्हणून सांगता? ही संगती कशी लावायची ?” आणि एकदम उसळून म्हणाल्या “हा प्रश्न माझ्याकडे सोपवा. मी मुलांना घेऊन भिक्षा मागीन.” ह्यावर सगळेच स्तब्ध झाले.

मातृसेवा संघात येणारे पाहुणे आणि कमलाताई यांच्या आठवणी डॉ. वसंतराव वांकर यांनी सांगितल्या. १९५६ मध्ये पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू संस्थेत आले होते. नागपुरात त्यांना चाकू दाखवला गेला. म्हणून समारंभाच्या वेळेस लोकांना व्यासपीठापासून पन्नास यार्डावर बसवण्यात आले. कमलाताई व्यासपीठावरून बोलल्या, “नेहरूंना धीट म्हटलं जातं. पण हा माणूस तर भीरु आहे. आमच्या मुलांना किती दूर बसायला लावलं.” जवाहरलाल नेहरू स्वतः उठले. त्यांनी मुलांना जवळ बोलावाले. १९७२ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी मातृसेवा संघात आल्या. कमलाताईंनी त्यांच्यासाठी केलेल्या पुरणपोळ्या

त्यांच्यामार्फत पोहोचेनात. कमलाताईंनी व्यासपीठावर पुरणपोळ्यांचा डबा दिला आणि त्यांना व सभेल्या म्हणाल्या, “ही मुलगी आईच्या घरातून काही न खातापिता तशीच निघली. या पोळ्या मी माझ्या हातांनीं केल्या आहेत. तुमचे वडीलसुद्धा माझ्याकडून जेऊन गेले आहेत. या पोळ्यांपासून तुम्हाला कोणताही धोका नाही.” सगळी सभा अवाक झाली.

कमलाताईंनी आपल्या कार्यात स्वतःच्या भावंडांनाही सामावून घेतले होते. भावाबहिणींचा एकमेकांवर गाढ विश्वास आणि आत्यंतिक प्रेम. तरीही कधी कधी खटके उडायचे. ‘एका वानप्रस्थाची कथा’ या पुस्तकातील रमेश गुप्ता यांचे याबद्दलचे भाष्य महत्वाचे आहे. ते म्हणतात.

“दैनंदिनीच्या रगाड्यात भावाने बहिणीवर आणि बहिणीने भावावर रागवायचे, बिघडायचे, तुटायचे प्रसंग किती तरी वेळा आले; पण तडकले तरी तुटू मात्र शकले नाही. तुटू दोघांनी दिले नाही. यमुताईच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला मर्यादा नाहीत असे नाही. नानांना त्या जाणवल्या नाहीत असेही नाही. पण अशी जी महातपस्वी व्यक्तिमत्वे असतात त्यांचे एक मुलभूत मोठेपण आणि बाकीचे त्यांचे सामान्य व्यवहार यात फरक करायला आपण शिकले पाहिजे, असा नानांचा प्रयत्न आहे. एखाद्या वेळी खटके उडण्याचे प्रसंग आले, वाटले कि, पुरे झाले, आता संस्थेबिंस्थेच्या जंजाळातून बाहेर पडले पाहिजे; पण पुन्हा असे वाटले कि संस्थेचे काम सोडून सर्व जंजाळातून बाहेर पडलो तर कदाचित आपल्या क्षुद्र तात्कालिक अहंकाराचे समाधान होईल पण; अंतरात्मा दुःख देत राहील. अरे, युरोपियनांपुढे मान खाली घालून काम करताना का मान होता? त्या गोष्टी सहन केल्या. मग आपल्याच माणसाचे बोलणे, वागणे का सहन होऊ नये...”

रमेश गुप्तांनी स्वतःच्या पुस्तीसकट नानांच्या डायरीमधले जे बोल दिले आहेत त्यात नानांच्या मनातला बहिणीबद्दलचा आदर आणि आत्मपरीक्षणाची वृत्ती दिसून येतात.

“दान मागण्यासाठी अजूनही यमुताई बरोबर असावी असे वाटते. ती असली म्हणजे धीर असतो. तिने मागितले कि मिळते. तिची तपश्चर्या आमची होऊ शकत नाही.”

“मुख्य कीर्तन तिचे; आम्ही ताल सूर धरणारे!”

आत्मपरीक्षणाच्या या सवयीनेच आपला उपजत रागीटपणा नानांनी कमालीचा कह्यात आणला. संवेदनशील असूनही संतुलित, मायाळू असूनही व्यवहारी असे एक अत्यंत जागरूक व उत्क्रांत मन त्यांनी कमावले.

कमलाताई आपल्या कार्यात व्यग्र होत्या. त्या कार्याचा प्रसारही होत होता. परंतु शासकीय यंत्रणेत मुरलेल्या नानांना एवढेच यश पुरेसे वाटत नव्हते. या यशाला राजमान्यता मिळाली पाहिजे असे त्यांना वाटे. कमलाताईच्या सेवेचे महत्व जनतेपर्यंत योग्य प्रकारे पोहोचले पाहिजे अशी त्यांच्या मनाची ओढ होती. रमेश गुप्ता लिहितात, “नानांना फार वाटे, योगायोगाने ती आपली बाहीण आहे. दुसऱ्या एखाद्या बाईने एवढे काम करून दाखवले असते तर नसते का आपल्याला तिचे असे कौतुक समाजाकडून व्हावेसे वाटले, आणि त्यासाठी नसती का आपण खटपट केली? हा प्रश्न स्वतःशीच त्यांनी विचारला. अंतर्यामातून त्याचे होकारार्थी उत्तर उमटले तेव्हा त्या दिशेने त्यांची संपर्कसाधना लगोलग सुरु झाली.” नानांच्या पाठपुराव्याला यश आले. कमलाताईना परिचारिकेला व्यवसायात उत्तम सेवा केल्याबद्दल रेड क्रॉसचे

नलवा मेडल मिळाले. १९६१ मध्ये त्यांना 'पद्मश्री' ही मिळाली. नाना तृप्त मानाने, भरल्या डोळ्यांनी 'पद्मश्री' चा सोहळा पाहत राहिले.

मातृसेवा संघात यशवंतराव चव्हाण यायचे होते. त्या दिवशी कमलाताईनी नानांना गाडी भेट पाठवली. नाना संकोचले. "मी गाडीत बसून चाललेला कार्यकर्ते पाहतील. त्यांना काय वाटेल? संस्थेला ज्यांनी आपले जीवन दिले, अनामिक राहून ज्यांनी आपल्याला गाडून घेतले, त्यांना नको गाडी? मी नुसता एक लुडबुडणारा सल्लागार 'आमच्या जीवावर ह्यांची मौज'असे त्यांना वाटणे साहजिकच नाही का? कदाचित माझी सद्सद्विवेक मला दुःख देणार नाही. कारण चोवीस तास माझ्या मनात ही संस्था आहे, पण या प्रतिक्रियांनी मला दुःख जरूर होईल. ते मूक धिःकार मी कसे बरे सहन करू शकेन?" असे त्यांना वाटले. पण यावर कमलाताईंचा अभिप्रायही महत्वाचा आहे- "संस्थेसाठी काम करणाऱ्या माणसाच्या कार्याला मदत ही संस्थेने स्वतःलाच केलेली मदत ठरत नाही का? वानप्रस्थ वृत्तीच्या सेवकाला त्याच्या वयानुरूप आणि त्याच्या कार्यक्षमतेस आवश्यक असे सेवेचे साधन उपलब्ध करून देणे हे समाजाच्या दृष्टीनेही एक कर्तव्य नव्हे का? त्याला या कर्तव्यापासून तुम्ही तरी वंचित का करावे? जे आजीव सदस्य आणि इतरेजन तुम्हाला जाणतात त्यांच्या मनात असला प्रतिकूल तरंग उठणे शक्य नाही. बाह्य टीकेला का भ्यावे? तुकारामाच्या मोठेपणात काही एक भूमिका असते, हे का विसरावे?"

अशा प्रकारे दिवस चालले होते कमलाताईना सर्वत्र मानमान्यता मिळत होती. सत्यबाला तायलही नवीन प्रकल्पांची आखणी करू लागल्या होत्या. १९६१ मध्ये 'पंचवटी' हा वृद्धाश्रम सुरु झाल्यावर कमलाताईंनी आपला मुक्काम तिकडेच हलवला. त्यांच्या पंचवटीतील कार्यासंबंधी श्रीमतो कमल वैद्य लिहितात –

"तेथील सर्व व्यवस्था त्या स्वतःच पाहात. वृद्धांची सेवा करणे, त्यांना गरम व सात्विक आहार देणे, इतकेच नव्हे तर आजारी व्यक्तींना स्पंजिंग करणे, औषधपाणी देणे, त्यांचा बिछाना, खोली स्वच्छ करणे, त्यांचे कपडे धुणे इत्यादी सर्व त्या करीत. घरादाराला, समाजाला नकोशी झालेली ती माणसे, अत्यंत दुःखी, वैतागलेली, चिडखोर, भांडखोर अशी असत. त्यामुळे त्यांचे एकमेकांशी पटत नसे. सतत आरडाओरडी, भांडणे, चिडणे चालू असायचे. त्या त्यांची मनःस्थिती ओळखून होत्या. ज्या मुलांसाठी काबाडकष्ट करून, प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन, त्यांच्या सुखासाठी झटल्या, त्यांना पायावर उभे केले, त्याच मुलांनी आपल्याला घरातून काढून टाकावे, निराश्रित करावे हे केवढे अपार दुःख आहे. प्रत्येकाला आपल्या घराची किती ओढ असते. कितीतरी भगिनी मुला-नातवंडांच्या आठवणींनी व्याकूळ व्हायच्या, रडायच्या. त्यांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवून कमलाताई त्यांचे अश्रू पुसायच्या.

कमलाताईंनी कधी ध्यान-धारणा, जपजाप्य, देवपूजा केली नाही. जनसेवेतच त्यांनी जनार्दन पहिला. पण वृद्ध लोकांकरिता त्यांनी राम मंदिर बांधले. रामजन्मोस्तव सुरु केला अन् त्या निमित्ताने मोठमोठे कथाकार, प्रवचनकार यांना निमंत्रित करून त्यांच्या ज्ञानाचा लाभ वृद्धांना करून दिला. देवळात रोज रामाची पूजा, आरती सुरु केली. भाविक लोक त्याचा लाभ घेतात, तेवढाच त्यांना विरंगुळा व मनःशांती लाभावी हा उद्देश."

कमलाताई कधी कधी उग्र रूप धारण करीत. संबंधित व्यक्तीच्या मुलांना ताराकरून बोलावून घेत. शब्दांच्या आसुडांचे फटकारे मारून त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देत. "इथे जेवायला

अनुक्रमणिका

खायला सगळं मिळतं. पण मुलानातवंडांचं प्रेम मिळू शकत नाही. या माणसांना कधीतरी मायेचा निवारा देणं हे तुमचं कर्तव्य नाही का?” असे त्या खडसावून विचारीत.

पंचवटीत राहून कमलाताईंचा संस्थेच्या सर्व शाखांशी आणि प्रवृत्तींशी संपर्क असे. सतत सगळीकडे भेटीगाठी असत. देणगी गोळा करण्यासाठी खांद्याला कायम झोळी असे, भोवतालचे लोक म्हणत जशी काही ती झोळी आता त्यांच्या शरीराचाच एक भाग झाली आहे.

अनुक्रमणिका

## मातृसेवा संघाच्या 'प्रवृत्ती'

कमलाताईंनी जी व्रते, ज्या निष्ठा स्वीकारल्या त्या जन्मभर पाळल्या. स्वातंत्र्य चळवळीत कॉंग्रेसशी स्वीकारलेली बांधिलकीही अखेरपर्यंत निष्ठेने सांभाळली. स्वातंत्र्यानंतर कमलाताईआणि त्यांचे बंधू कॉंग्रेस पक्षाचे निकटवर्ती राहिले. संस्थेच्या शासनाचे सतत सहकार्य लाभले. अनेक अधिकारी, मंत्री संस्थेत येत जात असत. १९४६ मध्ये नाना मोहनी निवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर आपले तनमन त्यांनी कमलाताईंच्या कार्याला समर्पित केले. सुतिकागृहाची कक्षा ओलांडून संस्था अनेकानेक कार्ये करू लागली. कमलाताईंचा सेवाभाव कायम होता. त्यामुळे सरकार दरबारी वजन होते. भोवती कितीतरी माणसे जमत गेली. कोणी काही प्रकल्प सुचवला, योजना सांगितली कि कमलाताईंचे उत्तर, "मनात आले आहे ना, लवकर सुरु करा. कार्य सुरु झाले की मला पैसा कमी पडत नाही. माणसे आपोआप मिळू लागतात." या आशीर्वादाने कार्यकर्त्यांना उत्साह वाटू लागे. १९५२ पासून कमलाताईंना शासनातर्फे पहिल्या वर्गाचा दोन व्यक्तींचा पास मिळू लागला. शिवाय एक सर्व्हंट पासही मिळत असे. त्यामुळे दूर प्रवास करणे सोपे झाले. देशात सगळीकडे त्या फिरू लागल्या.

मातृसेवा संघाचे कार्य आता सुतिकागृह एवढेच मर्यादित राहिले नाही. मातृसेवा संघाने निरनिराळ्या क्षेत्रांत पाऊल टाकले. आपल्या या प्रत्येक उपक्रमाला कार्यशाखेला मातृसेवा संघाने प्रवृत्ती असे म्हटले आहे. 'नंदनवन', 'समाजकार्य महाविद्यालय', 'पंचवटी', 'मातृसेवा', 'अस्थिव्यंगोपचार रुग्णालय व विकलांग मुलांचे रुग्णालय व विकलांग मुलांचे पुनर्वसन' या त्या पाच प्रवृत्ती.

### नंदनवन प्रवृत्ती

कमलाताई होस्पेट यांची भाची, गोपाळराव मोहनी यांची कन्या उषा एम. ए. झाली. दुर्दैवाने तिची दृष्टी गेली. मुंबईपर्यंत जाऊन सर्व उपाय झाले. परंतु यश मिळाले नाही. जी वस्तुस्थिती येईल तिचा स्वीकार करायचा आणि त्यातून मार्ग काढायचा हा कमलाताईचा स्वभाव. उषासाठी मार्ग कोणता? कमलाताईंना एक मार्ग दिसला. समदुःखी समप्रश्नी व्यक्तींशी संवाद झाल्यास एकमेकांना दिलासा मिळेल, आधार वाटेल. उषाही मुळूमुळू रडत बसली नाही. तिने आपल्या आत्याला साथ दिली. त्यांनी एक कल्पना राबविली. दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी मातृसेवा संघात सर्व अपंगांनी (अंध, पंगु, लुळे इ.) एकत्र जमायचे. त्याप्रमाणे ते जमू लागले. हास्य, विनोद, गप्पागोष्टी, गायनवादनाचे कार्यक्रम वगैरेंनी दोन-तीन तास करमणूक करून घेऊ लागले. एकमेकांच्या अडचणी, दुःखे समजावून घेऊ लागले. या ठिकाणी, डॉ. सुलोचना शिरोळी (एम. बी. बी. एस), श्री. बापूराव ठाकरे, शालिनी कुलकर्णी, चारुशीला मराठे, श्री. हरिश्चंद्र पाटील या व्यक्ती येत असत. या एकत्र जमण्याला 'नंदनवन' क्लब असे नाव दिले गेले. वैद्यकीय सल्लागार डॉ. वसंतराव वांकर व ज्येष्ठ सल्लागार श्री. नानासाहेब मोहनी हेही पुष्कळदा नंदनवन क्लबमध्ये येत असत. एकत्र जमून एकमेकांना दिलासा देणे, एवढ्यावरच या व्यक्तींचे समाधान झाले नाही. अपंगांच्या पुनर्वसनासाठी काहीतरी केले पाहिजे असे सर्वांनाच वाटू लागले.

यातूनच 'नंदनवन' या अपंगांचे पुनर्वसन करणाऱ्या नवीन प्रवृत्तीची कल्पना कमलाताईंसमोर मांडली गेली. कमलाताईंची आडकाठी असण्याचे काहीच कारण नव्हते. सामाजिक कार्याचा चाळीस वर्षांचा अनुभव आता त्यांच्या पाठीशी होता. त्यांच्या कार्याला समाजमान्यता मिळालेली होती. आधीचा

अनुक्रमणिका

खडतर काळ मागे पडलेला होता. कमलाताईंच्या कार्याबद्दल जनतेच्या मनात विश्वास निर्माण झाला होता. सरकारदरबारी ओळखी झालेल्या होत्या. सुतिकागृहाच्या अनुषंगाने वैद्यकीय मदतीचे कितीतरी विभाग आता सुरु झालेले होते. अपंगांसाठी शाळा ही थोडी वेगळी वाट होती. ही सामाजिक समस्या खास 'स्त्री'शी निगडीत असलेली समस्या नव्हती. हा एक सामाजिक प्रश्न होता. अशा वेळी संस्थापकांची भूमिका कर्मठ होण्याचा संभाव असतो. आमची संस्था स्त्रियांचे कार्य करणारी आहे. अपंग हे आमचे कार्यक्षेत्र नाही अशी घोषणा होण्याची शक्यता असते. परंतु गांधीवादाने भारलेल्या कमलाताईंचा दृष्टीकोन या प्रकारे कर्मठ नव्हता. त्यांच्या कार्याला 'स्त्री'पासून सुरुवात झाली होती आणि शेवटपर्यंत 'स्त्री' हाच केंद्रबिंदू राहिला. तरी त्यामुळे त्यांनी कर्यसंकोच होऊ दिला नाही. अपंगांच्या शाळेचा प्रस्ताव आल्याबरोबर क्षणाचाही विचार न करता त्या म्हणाल्या, "मनात आले आहे ना, कार्य ताबडतोब सुरु करा. कार्य सुरु केले म्हणजे त्यासाठी मला पैशाची कमतरता कधीच भासली नाही. शाळा केव्हा सुरु करता?" कार्यकारिणीनेही आपली संमती नोंदवून या योजनेवर शिक्कामोर्तब केले.

नागपूर नगरपालिकेने बर्डी सुतिकागृहाला सीताबर्डीवर 'श्री' चित्रपटगृहाजवळ काही जागा दिली होती. त्या जागेवर संघाने बालचिकीत्सा केंद्रासाठी तीन खोल्या बांधल्या होत्या. या जागेत सुरुवातीला सात विद्यार्थी दाखल करुन घेऊन 'नंदनवन' नावाची शाळा १ एप्रिल १९६० या दिवशी सुरु करण्यात आली. उषाताईंनी आपल्या कल्पनेप्रमाणे शाळेच्या कामाला सुरुवात तर केली. अपंगांना काम मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी प्रथम केले. 'नंदनवन' शाळेत हस्तव्यवसाय शिक्षक नेमतानाही अपंगांना काम मिळेल हे पाहिले गेले. त्याच दृष्टीने दोन्ही पायांनी अपंग असलेल्या एका व्यक्तीची नेमणूक केली होती.

या सुमारास महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाने शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलामुलींसाठी त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने त्यांना शालेय आणि व्यावसायिक शिक्षण देण्यास रामदासपेठेत एक शाळा आणि वसतिगृह सुरु केले होते. या शाळेची तपासणी करण्यासाठी समाजकल्याण विभागाचे संचालक डॉ. हजरनवीस नागपूरला आले होते. नानासाहेब मोहनींनी त्यांना नंदनवन शाळा दाखविली, शाळा पाहिल्यावर डॉ. हजरनवीस यांनी एक सूचना केली. ते म्हणाले, "राज्य सरकारने शरिरीक अपंगत्व असलेल्या मुलांमुलीसाठी नागपुरात एक शाळा सुरु केलीच आहे. त्यासाठी दुसऱ्या शाळेची गरज नाही. तुम्ही 'नंदनवन' शाळा अपंगांऐवजी फक्त दुर्बलमनस्क मुलांसाठी चालू केली तर तुम्हाला मध्यवर्ती सरकारचे आर्थिक अनुदान मिळू शकेल. अनुदानासाठी अर्ज आमच्याकडे पाठवा म्हणजे तो आम्ही आमच्या शिफारशीसह मध्यवर्ती सरकारकडे रवाना करू." ज्या योजनेची कार्यवाही सुरु झाली होती त्या योजनेपेक्षा अगदी वेगळाच प्रस्ताव पुढे आला. अशा वेळी व्यवस्थापन गोंधळून जाण्याची शक्यता असते. स्वयंसेवी संथेने पैशाच्या मागे लागून आपली योजनाच समूळ बदलावी किंवा नाही याबद्दल वादंग होऊन तट पडून कार्यनाश होणेही शक्य असते. परंतु मातृसेवा संघाचे व्यवस्थापन एकंदरीत व्यवहारी दिसते. अतिविचार, अतिचिकीत्सा कमलाताईच्या संस्थेला मानवतच नसावी. दुर्बलमनस्क मुलांसाठी शाळा ही सुद्धा सामाजिक गरज होती. त्यासाठी सहज अनुदान मिळू शकत होते. योजना राबविणे त्यामुळे सोपे जाणार होते. शाळेच्या समितीने अपंगांऐवजी दुर्बलमनस्क मुलांची शाळा सुरु करायची असा निर्णय घेतला. मूळ ध्येयापासून दूर न जाता बदललेला निर्णय स्वागतार्हच वाटतो. शाळेच्या समितीने सूचनेनुसार अर्ज केला आणि शाळेला पाच वर्षासाठी अनुदान मिळाले. केंद्र सरकारकडून खर्चाच्या ७५% आणि राज्य सरकारकडून २५% अनुदान मिळाले.

शाळा सुरु झाली. सरकारी अनुदानही मिळाले. पण शाळेत विद्यार्थी मिळणे ही कठीणच गोष्ट होती. अंध, पंगु, लुळा माणूस सहजपणे डोळ्यांना दिसतो. तेथे वस्तुस्थिती नाकारण्याचा प्रश्न नसतो. दुर्बलमनस्कता अशी स्पष्टपणे डोळ्यांना दिसत नाही. मुलांचे हसणे, बोलणे, चालणे वयानुरूप होत नसेल तर त्याचे कारण दुर्बल मनस्कता आहे हे सहजपणे लक्षात येत नाही. काही मुले संथ असतात असे वाटते. अभ्यासात प्रगती झाली नाही तर मुल आळशी, चुकार वाटते. दुर्बलमनस्कता उमगल्यावर तिचे साम्य वेडेपणाशी वाटते. हा दोष म्हणजे कुटुंबावरील कलंक वाटतो. दुर्बल मनस्कांच्या बुद्धयांकामध्येहो निराळ्या पातळ्या असतात. पालक आपल्या मुलाला दुर्बल मनस्क म्हणवू इच्छित नाहीत. हा कौटुंबिक कलंक लपविण्याचा प्रयत्न केला जातो. यातून मार्ग काढायचा होता.

संस्थेच्या समितीने या कामासाठी एका खास कारकुनाची नेमणूक केली. त्याने शहरातील मराठी शाळेत जाऊन दुर्बलमनस्क मुलांची माहिती मिळवायची, संस्थेतील कार्यकर्त्यांनी, शिक्षकांनी, त्या मुलांच्या घरी जाऊन आई-वडिलांचे मन वळवायचे, त्यांच्या पोटी दुर्बलमनस्क मुले निपजली यात त्यांचा काही दोष नाही हे पटवून द्यायचे असे ठरले. शाळेचे पहिले वर्ष दीड वर्ष याच खटपटीत गेले. हळूहळू दुर्बलमनस्क मुले शाळेत येऊ लागली. एकदा सुरुवात झाल्यावर माहिती पसरू लागली. सर्वसामान्य शाळेच्या मुलांपेक्षा येथे मुलांची संख्या खूपच कमी. दुर्बलमनस्कांचा विकास हेच उद्दिष्ट असल्याने प्रत्येक मुलावर व्यक्तिगत लक्ष दिले जाते हे लक्षात आल्यावर सर्वसामान्य मुलांबरोबर आपली मुले शिकवण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा येथेच मुल पाठविण्यात मुलाचे कल्याण आहे हे पालकांच्या लक्षात येऊ लागले.

थोडेसे विद्यार्थी असल्यामुळे वरचेवर सहली, करमणुकीचे कार्यक्रम येथे होत असत. शाळेतील वातावरण घरगुती स्वरूपाचे होते. शिक्षकवर्ग मोजकाच होता. त्यांना पगार फारसा नसला तरी इतर प्रकारांनी थोडी मदत केली जाई. उदा. प्रवासभत्ता मिळे किंवा शाळेच्या खर्चाने प्रशिक्षणासाठी पाठविले जाई वगैरे. मातृसेवा संघातर्फे येथे बालचिकित्सा केंद्र चालू झाले. त्यामुळे येणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत मिळत असे. संपूर्ण मध्य भारतात जिची खरोखर गरज होती अशी शाळा काढल्यामुळे मातृसेवा संघाच्या समाजसेवी वृत्तीचा एक वेगळा आविष्कार लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आला. संस्थेचा लौकिक अधिक पसरू लागला.

प्रकल्प उभे करण्यासाठी पैशांची किती गरज असते याची जाणीव कार्यकर्त्यांनासतत होती. त्यामुळे १९६३ पासूनच दिल्लीची इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्च (आय. सी. एम. आर) आणि अमेरिकेतील व्होकेशनल रिहॅबिलिटेशन ॲडमिनिस्ट्रेशन (व्ही. आर. ए.) या संस्थांशी संपर्क साधण्यास सुरुवात झाली होती. आता मुले सहजपणे शाळेकडे येऊ लागली.

अमेरिकेतील या संस्थेचे आरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याण या खात्याचे प्रमुख श्री. जोसेफ ला राक्का हे भारतात आले असल्याचे डॉ. वसंतराव वांकर यांना कळले. श्री. वांकर यांनी त्यांना “नंदनवन” शाळा पाहण्यास बोलावले. २८ नोव्हेंबर१९६३ या दिवशी श्री. जोसेफ ला राक्का यांनी नंदनवनला भेट दिली. त्याचप्रमाणे दिल्लीच्या आय. सी. एम. आर. चे डॉ. रामाचारी हे श्री. नानासाहेब मोहनींच्या खास निमंत्रणावरून २७ सप्टेंबर १९६४ रोजी नंदनवन शाळा पाहण्यास आले. दिल्लीच्या आय. सी. एम. आर. चे संचालक पद्मभूषण डॉ. पंडित २७ सप्टेंबर १९६३ रोजी नंदनवनात येऊन गेले. त्यांनीही आर्थिक मदतीसाठी व्ही. आर. ए. या अमेरिकन संस्थेचे नाव सुचवले. १९६४ मध्ये मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देणारी संरक्षित कर्मशाळा सुरु झाली. तिला सरकारी मान्यता मिळाली.

मध्यवर्ती सरकारच्या पंचवार्षिक अनुदानाची मुदत संपत आली होती. ३१ मार्च १९६५ च्या पुढे शाळेला लागणाऱ्या मदतीचा प्रश्न शाळेच्या समितीला भेडसावू लागला.

१९६५ पासून शासनाची अनुदानसंहिता बदलली. शिक्षणखात्याच्या अखत्यारीत असलेली ही शाळा समाजकल्याण खात्याच्या अखत्यारीत आली आणि १००% अनुदान बंद होऊन खर्चाच्या ६६²/३% अनुदान मिळेल असा नियम आला. उरलेली ३३¹/३% संस्थेने देणग्या वा अन्य मार्गांनी मिळवायची होती. नवीन अनुदानसंहितेमुळे केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान पूर्णतः बंद झाले.

हा फटका चांगलाच जाणवणारा होता. आता तर संरक्षित कार्मशाळेला जागा बंधणेही आवश्यक होते. कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढली. कार्यकर्त्यांनी 'नंदनवन'ची सामाजिक गरज समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींना पटवून देण्यास सुरुवात केली. लहान मोठ्या देणग्यांचे आवाहन केले. बराच प्रयत्न आणि लिखापडी करून ऑस्ट्रेलियाच्या 'हेल्प ॲब्रॉड' या संस्थेकडून संरक्षित कर्मशाळेची रक्कम मिळवण्यात आली. मातृसेवा संघाच्या आवारात एक मोठी पत्र्याची छपरी उभारून तेथे संरक्षित कर्मशाळेचे काही हस्तव्यवसाय हलविण्यात आले.

अमेरिकन सरकारला पाहिजे असलेल्या साच्यात बसेल अशी एक योजना शाळेतर्फे पाठविण्यात आली. श्री. जोसेफ ला राक्का यांनी या संशोधन आणि शिक्षण योजनेत सहकार्य देण्याचे मान्य केले. पाच वर्षांसाठी म्हणजे १ सप्टेंबर १९६५ पासून ३१ ऑगस्ट १९७० पर्यंत व्ही. आर. ए. कडून शाळेला आर्थिक सहाय्य मिळाले. ही रक्कम सात लाख रुपये होती.

या योजनेत संशोधन कार्याचा समावेश असल्याने संशोधन प्रमुख म्हणून डॉ. कुसुमताई वांकर यांनी ही जबाबदारी घ्यावी असे ठरले. दि. २० जुलै १९६५ रोजी त्यांनी मातृसेवा संघातर्फे अमेरिकन करारपत्रकावर स्वाक्षरी केली आणि १ सप्टेंबर १९६५ पासून योजना कार्यान्वित झाली. अमेरिकेची आर्थिक मदत मिळाली. महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सहाय्य पूर्वीप्रमाणे चालू होते.

नंदनवन केंद्राचे कार्य तीन विभागात विभागले होत.

१) व्ही. आर. ए. व्यवसायपूर्व कर्मशाळा

२) संरक्षित कर्मशाळा

३) नंदनवन शाळा : दुर्बलमनस्क मुलांसाठी औपचारिक देणारी शाळा.

पहिल्या विभागात व्यावसायिक शिक्षणक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने त्यांना अधिक योग्य वाव मिळावा म्हणून "नंदनवन" शाळेची स्वतंत्र "संरक्षित कर्मशाळा" १ ऑगस्ट १९६७ पासून सुरू करण्यात आली.

दुर्बलमनस्क मुलांच्या बाबतीतच संशोधन करण्यासाठी व्ही. आर. ए. ची मदत होती. या योजनेचे दोन भाग होते. ६ ते १६ या वयोगटातील शाळेत जाणाऱ्या दुर्बलमनस्क मुलांचे प्रमाण किती याचा शोध घेणे

आणि दुर्बलमनस्क मुलांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने त्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन स्वावलंबी बनविता येणे शक्य आहे का याविषयी संशोधन करणे.

ही योजना राबविताना शाळेच्या कामाचा व्याप बराच वाढणार होता. शाळेला आणि संरक्षित कर्मशाळेला जोडून एक वसतिगृह चालविणे आवश्यक होते. त्यासाठी धंतोलीत एक स्वतंत्र इमारत भाड्याने घेण्यात आली. सर्वेक्षणासाठी मानसशास्त्रज्ञ नेमावे लागले. हस्तव्यवसाय शिकवण्यासाठी बराच कर्मचारीवर्ग नेमला. कार्यालयीन कामासाठीही जादा कर्मचारीवर्ग घेतला. वसतिगृहात सर्व मोफत मिळणार असल्याने दूरदूरचे दुर्बल मनस्क विद्यार्थी वसतिगृहात दाखल झाले.

मानसशास्त्रज्ञ व त्यांच्या मदतीस क्षेत्र कार्यकर्ते मिळून शहरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांची पाहणी केली. त्याचप्रमाणे घरोघरी जाऊन मुलांच्या बुद्धिगुणांबद्दल सखोल चाचणी करून, त्यांच्या मानसिक पातळीचे वर्गीकरणकरून पुण्यात गोखले इन्स्टिट्यूट येथे पृथक्करणाचे काम सुरु झाले. विशिष्ट संस्था, उदा. अंध विद्यालय, अपंग विकास गृह अनाथालय इ. संस्थांनाही भेट देऊन संशोधनोपयोगी माहिती मिळवली.

डॉ. कुसुमताई वांकर यांना व्ही. आर. ए. ने फेलोशिप दिली आणि दुर्बलमनस्क मुलांसाठी अमेरिकेत चाललेले काम पाहण्यास ३० जुलै १९६६ रोजी बोलावले. त्या एकाहत्तर दिवसांसाठी तिकडे जाऊन आल्या. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाने अमेरिकेची योजना यशस्वीपणे पार पडली. डॉ. कुसुमताई वांकर यांनी नंदनवनवरील आपल्या लेखात जे विचार मांडले आहेत ते संस्थेची महत्वाची वाटचाल दाखविणारे आहेत. त्या म्हणतात, “दुर्बलमनस्कता हा एक रोग नसून वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक व संस्कृतिजन्य दुष्परिणामांचा दृश्य परिणाम आहे. अर्थात समाजाला याची जाणीव, याचे महत्व जास्त वाटण्याचे कारण म्हणजे बुद्धिमांद्यामुळे समाजाला त्यांचा भार सहन करावा लागणार आहे. या दृष्टीने या क्षेत्रात बदल घडवून आणणे म्हणजेच बुद्धिमांद्य असलेली व्यक्ती जास्तीत जास्त उत्पादक घटक म्हणून कशी तयार होईल याचा प्रामुख्याने विचार करणे. आतापर्यंत एखाद्या व्यक्तीच्या आर्थिक कमाईवरून शैक्षणिक कार्यक्षमतेची मोजदाद केली जात होती. हे बरोबर नाही. खरं म्हटलं तर शिक्षणाची कार्यक्षमता मोजावयाची असेल तर ते शिक्षण एखाद्या व्यक्तीची उत्पादनक्षमता किती वाढविते यावरून व्हावयास पाहिजे. विशेषतः बुद्धिमांद्यत्वाच्या क्षेत्रात औद्योगिक शिक्षणाच्या जोडीला शालेय शिक्षण हातात हात घालून असावयास पाहिजे. सारांश- दुर्बलमनस्कतेच्या क्षेत्रात संपूर्ण शिक्षणाचा पाया हाच आहे. तसेच दुर्बलमनस्क मुलांचे शिक्षण हे हळूहळू खास व्यवसाय शिक्षणाच्या अंतिम हेतूने व्हावयास पाहिजे. व्यवसाय शिक्षणामुळे ही मुले व्यवसायात भाग घेण्यालायक किंवा निदान संरक्षित कर्मशाळेत व्यवसाय करून कमाई करण्यालायक व्हावयास हवीत. अनुभवाने असे लक्षात आले की एकच ठरावीक ढाचा (Master Plan) सर्व विद्यार्थ्यांना उपयोगी पडू शकत नाही. विद्यार्थ्याला पाहून त्याला साजेल असा आराखडा बनवावा लागतो.”

डॉ. कुसुमाताई वांकर यांनी पुढे आपल्या लेखात नंदनवनने आखलेले उपक्रम दिले आहेत. पुनर्वसनाच्या दृष्टीने, प्रशिक्षित झालेल्या दुर्बलमनस्क मुलांना नोकरी-व्यवसाय मिळणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी नोकरी देऊ शकणाऱ्या व्यक्तीचे म्हणजे मालकाचे प्रबोधन हेही आवश्यक असते. नंदनवनमध्ये मालकांसाठी शिक्षण वर्ग सुरु केला गेला. त्याच्या तीन पायऱ्या योजल्या गेल्या- १) प्रथम मालकांना भेटून दुर्बलमनस्क मुलांबद्दल त्यांची एकंदर प्रतिक्रिया काय आहे याचा अंदाज घेणे. २) नंतर मालकांना नंदनवनमध्ये निमंत्रण देऊन, प्रत्यक्ष विद्यार्थी, त्यांची कामे दाखवणे व त्यासंबंधी त्याची

शिक्षणवर्गाशी चर्चा घडवून आणणे. ३) यापुढची पायरी म्हणजे नंदनवनच्या दृष्टीने प्रशिक्षित, लायक असे विद्यार्थी संस्थेच्या पैशाने मालकांकडे नोकरीस ठेवून, मालकांचे विध्यार्थ्याच्या कामाबद्दल मत आजमावणे. साधारणपणे तीन महिन्यांच्या काळात त्यांचे परस्परसंबंध व्यवस्थित होण्यास, कामाबद्दल पक्के मत होण्यास पुरेसे आहेत असे ठरले. चांगले मत झाल्यास मालकाने त्या काळानंतर इतरांप्रमाणे पगार देऊन त्यास नोकरीस ठेवावे. पसंत न पडल्यास संस्थेने विध्यार्थी काढून घ्यावा.

पुन्हा शिक्षण देऊन काम नापसंत पडण्याचे कारण दूर करण्याचा प्रयत्न करावा. काही काळाने पुन्हा नोकरीसाठी प्रयत्न सुरु करावेत. असे प्रयत्न सातत्याने करीत राहायचे. नोकरीत रुजू झालेल्या मुलाची प्रथम दर महिन्यास भेट घ्यावी. नंतर हळूहळू हा कालावधी वाढून वर्ष-दोन वर्ष हा परिपाठ चालू ठेवावा. यामुळे आपल्या विध्यार्थ्याला मन मोकळे करण्यास जिव्हाळ्याचे माणूस आहे असा विश्वास वाटेल. इतरजण त्यांच्या दुर्बलमनस्कतेचा गैरफायदा घेणार नाहीत. असे झाले तरच खरे पुनर्वसन झाले असे म्हणता येईल.

निरिक्षणात असे आढळते, मालक दयेपोटी नोकरी देतात. त्यांचा एकंदर अभिप्राय दोन प्रकारचा असतो. एक म्हणजे आम्हांला तंदुरुस्त, धडधाकट माणसं तेवढ्याच पैशात मिळत असताना आम्ही यांना का घ्यावं? दुसरं म्हणजे, हा प्रश्न सरकारलाच मोठ्या प्रमाणात सोडवणं शक्य आहे. या प्रयोगात नंदनवनच्या मुलांच्या बाबतीत एक उणेपणा लक्षात आला. दुकानात एरवी ही मुले समाधानकारक काम करीत असली तरी गर्दीच्या वेळी ती भांबावतात. मालकाला तापदायक होतात. त्यामुळे एक मालक अशा मुलाला कामाच्या मोसमात संस्थेत परत पाठवी व एरवी कामावर ठेवी.

पुनर्वसनाचा प्रश्न कार्यकर्त्यांची आत्यंतिक कसोटी पाहणारा आहे. डॉ. कुसुम वांकर यांनी या प्रश्नाला आपल्या परीने उत्तर शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या मताप्रमाणे पुनर्वसनासाठी मुख्यतः दोन गोष्टींची निकड भासते. सार्वजनिक वाहनांचा उपयोग करणे, पैशांची देवाणघेवाण शिकणे, पोषाख व्यवस्थित ठेवणे या गोष्टी मुलांना जमल्याच पाहिजेत. यासाठी संस्थेच्या आवारातच एक लहानसे दुकान थाटले गेले. त्या ठिकाणी मुलांना विक्रीकाम करायला लावले. हा प्रयोग यशस्वी झाला. दुसरी निकड याहीपेक्षा महत्वाची. मुले स्वतंत्रपणे नोकरीला लागेपर्यंत किंवा एक नोकरी सुटल्यावर दुसरी मिळेपर्यंत मधल्या काळात त्यांची कामाची सवय चालू ठेवणे भाग असते. असे न केले तर दुर्बलमनस्क मुल शिकलेले सर्व विसरण्याचा संभाव असतो. कारण शिकलेली गोष्ट मेंदूत टिकवून ठेवण्याची शक्ती या मुलांमध्ये निश्चित कमी असते. परिणामी कधी कधी पुन्हा प्रथमपासून शिक्षणाची सुरुवात करावी लागते आणि आधीच्या श्रमांवर पाणी पडते. यावर उपाय म्हणून कायमस्वरूपी संरक्षित शाळा संस्थेत सुरु केली गेली. मुले तेथे काम करतात.

अमेरिकन योजनेच्या ५ वर्षाच्या कालावधीत ‘नंदनवन’ मधील विद्यार्थ्यांनी ३२, ००० रु. चा माल तयार करून विकला. त्यामध्ये सुमारे १०० मुलांना रु. ५००० मजुरी देण्यात आली.

विद्यार्थ्याला संस्थेत प्रवेश देतेवेळी त्याच्या बुद्धीचे मूल्यमापन केले जाई. नंतर वेळोवेळी त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला जाई. विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचा तपशील दररोज ठेवून, दोन किंवा तीन महिन्यांनी त्यांना पैसे दिले जात. वसतिगृहातील आणि शाळेतील मुलांना, सुटीच्या दिवशी शाळेत तयार केलेल्या वस्तू विकण्यासाठी घरोघरी पाठवून प्रत्यक्ष अनुभव दिला जाई.

अनुक्रमणिका

आर्थिक पाठबळ असल्यामुळे ‘नंदनवन’ला यंत्रसामुग्री घेता आली. तसेच कच्च्या मालत पैसे गुंतवता आले. साहजिकच वार्षिक उत्पादन आणि विक्री वाढली. त्यामुळे चालकांना आणखीनच हुरूप येत होता. त्यांनी आणखी एक पाऊल पुढे जाऊन १९६८ साली संरक्षित कर्मशाळेची स्थापना केली.

नोव्हेंबर १९७० पर्यंत अमेरिकन योजना कार्यान्वित होती. दि. १ डिसेंबर १९७० पासून ‘नंदनवन’ ची ही मदत थांबली. ‘नंदनवन’ शाळा चालविण्याचा पाच वर्षाचा अनुभव, मातृसेवा संघाची स्वतःची इमारत आणि नागपूरसारखे देशातील मध्यवर्ती ठिकाण या गोष्टींचा फायदा अमेरिकन योजना चालवताना ‘नंदनवन’ला झाला. तरीही, अनुभवी, प्रशिक्षित शिक्षकांच्या अभावाला अमेरिकन योजना काहीही मदत करू शकली नाही.

१९६५ च्या काळात स्वयंसेवी संस्थांनी परदेशी अनुदान स्वीकारणे सर्रास रूढ नव्हते. परदेशी अनुदान स्वीकारावे किंवा नाही, हे नैतिक आहे की अनैतिक, यामुळे अप्रत्यक्ष परदेशी हुकुमत या संस्थेवर चालेल काय, या अनुदानाचे फायदे तोटे कोणते, यावर नियतकालिकांतून चर्चा होत असत. मातृसेवा संघाच्या कार्यकर्त्यांमध्ये या प्रकारच्या चर्चा झाल्या की नाही हे नेमके समजू शकले नाही. स्मरणिकांमध्ये अशा प्रकारचा उल्लेख दिसत नाही. एकंदरीत ज्येष्ठ व्यक्ती स्वतःच्या अधिकारात व्यवस्थापनाचे सर्व निर्णय घेत होत्या असे आढळते. ज्येष्ठांचा दृष्टीकोन कल्याणकारी होता, व्यवहारी होता. इतरेजनांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता, भरवसा होता.

आज १९९९ मध्ये बहुतेक सर्व स्वयंसेवी संस्था परेदशी अनुदान मिळवण्याच्या प्रयत्नात असतात. तेव्हा म्हणावेसे वाटते, मातृसेवा संघाच्या व्यवस्थापनाने काळाची पाऊले आधीच ओळखली होती.

अमेरिकन योजनेची मदत थांबल्यानंतर राज्य सरकारच्या अनुदानपद्धतीत बसेल अशा रीतीने १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांची शाळा आणि १५ ते २२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी संरक्षित कर्मशाळा असे दोन विभाग पुन्हा सुरु झाले.

१९७७ पासून टेरे डेस होम्स या जर्मन संघटनेकडून शाळेला निरनिराळ्या खर्चासाठी सुमारे पन्नास ते साठ हजार रु. वार्षिक देणगी मिळू लागली. यामुळे शैक्षणिक साहित्य घेता येऊ लागले. नागपुरातील मागास वस्तीत दोन शिक्षणकेंद्रे सुरु केली गेली. व्हि. आर. ए. च्या वेळी घेतलेल्या शाळेच्या बसला डिझलायझेशन इंजिन बसवून मुलांसाठी ती चालू करण्यात आली.

१९८१ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाने दाननिधी या स्वरुपात पाच वर्षांकरिता दोन लाख रुपये नंदनवनला दिले. नंदनवनच्या गरजा वाढत होत्या. निरनिराळे उपक्रम हाती घेतले जात होते. खर्चाच्या तोंडमिळवणीचे विविध मार्गही शोधले जात होते.

दुर्बलमनस्क मुलांच्या प्रश्नांकडे ग्रामीण भागाचे लक्ष वेधून घ्यावे, सामाजिक जाणीव निर्माण करावी आणि दुर्बलमनस्क मुलांनाही नेहमीपेक्षा निराळे जग दिसावे म्हणून मुलांची खेडेगावी शिबिरे घेण्यास सुरुवात झाली.

अनुक्रमणिका

या शिबिरांमध्ये दुर्बलमनस्क लोकांना कसे ओळखावे या माहितीपासून त्यांना कसे वागवावे व कसे शिकवावे हे सगळे सांगितले जात असे. या शिबिरांमध्ये कर्मशाळेच्या विध्यार्थ्यांच्या वस्तूंचे प्रदर्शन हा खास आकर्षणाचा विषय होता. ह्या उपक्रमाच्या सुरुवातीला किंचित अविश्वासानेच 'खरेच का दुर्बलमनस्क मुले ही कामे करू शकतात?' असा प्रश्न विचारला जात असे. नंतर मात्र 'आमच्याही गावात हे शिबीर घ्या.' असं स्वतः हून सांगणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढून ह्या शिबिरांना चांगला प्रतिसाद मिळू लागला.

'नंदनवन'ने आपल्या वाटचालीत पालकांना सतत सामावून घेतले. त्यांच्याशी संवाद साधला. दुर्बलमनस्क पाल्याला 'नंदनवन'च्या सहाय्याने वाढवताना आलेल्या अनुभवांचे वर्णन मातृसेवा संघाच्या अंकात वाचायला मिळते. त्यावरून रूढ शिक्षणाच्या, मानसन्मानाच्या सर्व कसोट्या बाजूला ठेवून प्रत्येक मुलाच्या विकासासाठी किती धडपड करावी लागते याचा प्रत्यय येतो.

नंदनवनने आपल्या वाटचालीत पालकांना सतत सामावून घेतले आहे. त्यांच्याशी सतत संवाद साधला आहे. अशा पालकांनी संस्थेच्या स्मरणिकेत, मातृसेवा या मासिकात लेख लिहिलेले आढळतात.

एक पालक कमल तुळपुळे लिहितात, "शाळेत जे विद्यार्थी येतात ते विविध दर्जाचे व पातळीचे असतात. त्यांच्या काही मानसिक शक्तींना धक्का पोचलेला असतो, तर काही शक्ती काही प्रमाणात का होईना शाबूत असतात. कोणत्या शक्ती शाबूत आहेत ते हेरून त्याच्या माध्यमाने त्यांना लिहायला, वाचायला शिकवणे शक्य आहे. हे करताना आपण आपल्या सर्वसामान्य कसोट्या थोड्याश्या बाजूलाच ठेवावयास हव्यात. आता माझ्या मुलीचे अनुभव सांगते. तिला चित्रपटाची फार आवड. तेव्हा चित्रपट व चित्रपटगृहे यांची नावे ती प्रथम वाचावयास शिकली. नंतर तिला त्या चित्रपटात काम करणाऱ्या नट – नट्यांची नावे वाचता येऊ लागली. याचा उपयोग करून घेऊन आम्ही तिला अक्षर – ओळख दिली. नंतर तिला सोपे शब्द वाचावयास शिकवले. शाळेतही शिक्षक लिहायला वाचायला शिकवत असतीलच. पण अशा तऱ्हेने त्या विद्यार्थ्यांच्या आवडीच्या माध्यमाचा उपयोग केल्यास शिक्षकांचे काम जास्त सुलभ व सुकर होईल."

पालकांची मते अशा विविध प्रकारे व्यक्त झालेली आढळतात.

नंदनवनच्या एकनिष्ठ कार्यकर्त्या इंदिरा परांजपे यांनीही आपले पालाकांबद्दलचे अनुभव लिहिले आहेत. त्या लिहितात, "पुण्याचा एक मुलगा नंदनवनच्या वसतिगृहात होता. वसतिगृह बंद झाल्यावर तो घरी गेला. मी मुद्दाम त्याला भेटायला गेले. मी गेल्याबरोबर त्यानं धावत जाऊन आईला सांगितलं – 'नागपूरच्या इंदुताई आल्या.' त्याने मला छान सरबत करून दिले. ग्लास विसळून ठेवला. मी त्याच्या आईशी तो काय उद्योग करीत होता वगैरे बोलत होते. तेवढ्यात त्याचा मोठा भाऊ आला. नुकताच एम. एससी. प्रथमवर्गात पास झालेला. आईने त्याच्याशी माझी ओळख करून दिली. एकंदर १५ – २० मिनिटेच मी त्याच्याशी बोलले. पण तेवढ्या वेळात सुद्धा, त्या मोठ्या भावाने, त्या मंदबुद्धी भावाला इतंक हिडीसफिडीस केलं की ते मला सहन होऊ शकलं नाही. मी त्याला म्हटलं, तुमचा एकच भाऊ तो मंदबुद्धी आणि तुम्ही खूपच हुषार. तुमच्या आईने मला आत्ताच तुमच्याबद्दल सांगितलं. या तुमच्यातल्या फरकाला तुम्ही कोणीच जबाबदार नाही. तो मंदबुद्धी असला तरी अगदीच टाकाऊ नाही आणि तुम्हीच त्याला हिडीसफिडीस केलंत तर उद्या त्याची वाहिनी आल्यावर ती त्याच्याशी कशी वागेल? प्रेमाने त्याला काम सांगा, करून घ्या, त्याला वाटू द्या की त्याला तुमचा आधार आहे. याचा त्याच्यावर चांगला परिणाम होईल.

अनुक्रमणिका

तुमच्या संसारात घरातला एक मनुष्य म्हणून याचा खूपच उपयोग होईल. ही तुमची जबाबदारी आहे. त्याचे काही चुकले तर जरूर रागवा त्याला."

दुसऱ्या एका घरात मुलाची अनंताची आई सांगायची, "मला सकाळी ऑफिसमध्ये जावे लागते साडेसहाला, तर माझा अनंत भाजी निवडतो, कुकर लावतो, कणीक भिजवून ठेवतो, प्यायचे स्वयंपाकाचे पाणी भरतो लहान कळशीने. पाने मांडणे, वाढून घेणे, उष्टी उचलणे, अंथरुणे घालणे – काढणे एक न दोन कितीतरी कामे करून मला मदत करतो. जरा थंड आहे. कोणतेही काम करायला त्याला वेळ लागतो."

एका मुलाचे वडील येऊन म्हणाले, "आम्हाला एकूण चार मुलगे, पैकी तीन चांगले हुषार आहेत. हाच एक असा आहे. आमचे घर आहे, ते याच्या नावाने करून दिले. आमच्यानंतर याच्या उपजीविकेसाठी तरी पहा. मला खात्री नाही त्याचे बाकीचे भाऊ त्याला पोटभर जेवायला तरी देतील की नाही. त्याच्या नावावरच्या घराचे भाडेसुद्धा घेतील. मोठा हृद्रोग आहे पहा हा आम्हाला." एका मुलीचे श्रीमंत वडील येऊन म्हणाले, "तुमच्या संस्थेच्या स्वाधीन पंचवीस हजार रुपये करतो. माझ्या या मुलीची जन्माची जबाबदारी घ्या."

इंदिराताईंची पालकांशी जवळीक, पालकांचा त्यांच्यावरील विश्वास सर्वच ठिकाणी व्यक्त होतो. अशा या इंदिराताईही एखादेवेळी हतबल होतात. त्या म्हणतात, "प्रयोग म्हणून नंदनवनमध्ये येणारा गरीब परिस्थितीतला मुलगा मी स्वतःच्या घरी ठेऊन घेतला. माझे एकटीचे काम ते किती असणार! मी त्याला झाडायला, पुसायला, झाडांना पाणी घालायला शिकवले. एकही काम तो धड करीत नव्हता. जरा बदल म्हणून स्त्रियांच्या कॅन्टीनमध्ये त्याला काम करायला पाठविले. कपबशा धुताना फोडायचा, कॅन्टीनमध्ये आलेल्या लोकांसमोर वेडेवाकडे चाळे करायचा, मोठ्याने गाणी म्हणायचा. असले प्रकार सुमारे एक महिना सोसून त्यांनी त्याचे येणे बंद केले. मीही एकंदर चार महिने ठेऊन घेतला. शेवटी नाइलाजाने त्याच्या घरी पाठवून दिला."

नंदनवनमधील व्यवस्थापक वनिता मुंडे आणि श्रीमती परेटकर यांच्या लेखात, सामान्य दृष्टीला दिसू न शकणारे दुर्बलमनस्क मुलांचे प्रश्न जाणवतात.

वनिता मुंडे लिहितात, "निरनिराळ्या समाजस्तरातील निरनिराळ्या सवयी असलेल्या मुलांना वळण लावणे म्हणजे महाकठीण कर्म. मुलांचे पालक प्रवेशाच्या वेळी मुलांना असलेल्या सवयी सांगत नाहीत. उदा. अंथरून ओले करणे, पळून जाणे इ. आमच्या मुलांना सर्व येते असे सांगतात. पण प्रत्यक्षात मुलांना दात घासण्यापासून ते अंघोळीनंतर कपडे घालण्यापर्यंत सांगावे लागते. तसेच ही मुले फार लवकर चिडतात. काही मुले मुद्दाम एकमेकांना चिडवतात व दुसरा मुलगा चिडला की त्याला आवरणे म्हणजे महाकठीण. सुट्टीच्या कालावधीत मुलांकडे फारच लक्ष द्यावे लागते. थोडी पाठ वळत नाही तो काही मुले कपबशा फेक, कपडे फेक, मारपीट कर असे नेहमी करतात. मुलांना घरी राहण्याची व हिंडण्याची सवय असल्यामुळे सुरुवातीला वसतिगृहात कोंडवाड्यासारखे वाटते. मुलगा वसतिगृहात ठेवल्यानंतर ४–५ महिन्यांच्या फरकानेच मुलाच्या पालकांनी आपल्या पाल्यात सुधारणा झालेली आढळून आल्याची कबुली दिली म्हणजे आपल्या परिश्रमाचे फळ मिळाल्याचे समाधान लाभते. पैशाच्या मोबदल्यात मुलात होणारी प्रगती कमी व कधी कधी अजिबात नसल्यामुळे व पालकांचे 'तूप खाल्ले की रूप यावे' ही दृष्टी असल्यामुळे काही पालक ताबडतोब प्रगती दिसली नाही की मुलाचे नाव काढण्याचा विचार करतात. अशा

अनुक्रमणिका

वेळी वसतिगृहात १-२ वर्षे राहू द्या, धीर धरा असा सबुरीचा सल्ला द्यावा लागतो. बहुतांश वेळा संस्कारक्षम वय निघून गेल्यानंतर मुलांना वसतिगृहात ठेवण्यात येते. त्यामुळे प्रगती फार हळू असते. पालकांत सबुरीने घेण्याची वृत्ती नसते. इतर चांगल्या मुलांच्या तुलनेत या मुलांवर पालकांचा जो खर्च होतो, त्याच्या तुलनेत मुलातील प्रगती एकदम दिसण्यासारखी नसल्यामुळे बहुतेक पालक मुलांना १-२ वर्षे ठेवतात व लगेच नाव काढून टाकतात. त्यामुळे मुलांच्या वसतिगृहाला पालकांकडून फारसा प्रतिसाद मिळत नाही असे नाइलाजाने म्हणावे लागते."

श्रीमती परेटकर यांचा नंदनवनशी संबंध प्रथम दुर्बलमनस्क मुलाच्या पालक म्हणून आला. पुढे त्या त्याच ठिकाणी मेट्रन झाल्या. दुर्बलमनस्क मुलांचा प्रश्न आणि संस्थेचें कार्य त्यांना वेगळ्या प्रकारे भिडलेले दिसते. त्या लिहितात, "वसतिगृहात मुलांची संख्या २५ होती. सकाळी ५-३० च्या भोंग्याला सगळ्यांनी उठायचे, आपापला बिछाना नीट करून चादर घडी करून त्यांना दिलेल्या मोठ्या कपाटात त्यांचे खण आहेत त्यात ठेवायचे. प्रत्येकजण आपली पेस्ट, कपडे घेऊनच बाहेर येतो. आंघोळ झाली की ७-३० ला प्रार्थना. मग कॉफी, थोडा अभ्यास असे सगळे होईपर्यंत ८-३० होतात. मग शाळेचे कपडे घालणे, ९-३० ते १० ला जेवणे. त्यानंतर आपली ताट वाटी पेला घासणे. त्या मुलांच्या एवढं लक्षात असतं. ती आपली कामे चांगली करतात. आपण लक्ष मात्र द्यायचे. १०-३० ला शाळा. मग शाळेत अभ्यास दोन वाजेपर्यंत. २-३० ते ३-३० पर्यंत तांत्रिक शिक्षण, ३-३० ते ४-३० पी. टी. मग सुट्टी. नंतर होस्टेलमध्ये आले की हात पाय तोंड धुणे, कपडे बदलणे आणि आपली कपबशी घेऊन जागेवर बसणे. त्यावेळी कॉफी, नाश्ता आणि थोडी फळे आम्ही देतो. ५-३० ला ते ग्राउंडवर कधी फुटबॉल खेळायला जातात. ७-३० पर्यंत होस्टेलमध्ये आल्यावर हात पाय धुणे आणि प्रार्थना. ८ ला जेवणे. जेवायला बसताना 'वदनी कवळ घेता' आम्ही म्हणायला सांगतो. आम्ही मुलांसाठी रेडिओ लावतो. महिन्यात एक बोलपट दाखवतो. मुलं अगदी मजेत असतात. रात्री १० वाजता कुठल्याही गोष्टीचा विचार न करता निःशंक आनंदात झोपतात. निर्विकार मनाला कसली काळजी! ना भवितव्याची चिंता, न भूतकाळाची खंत, आटापिटा न करता वर्तमानकाळही संपतो आहे. मला काही येईल की नाही, मी चार पैसे मिळवू शकेन की नाही, पुढे कसे होईल यांपैकी कुठलाच प्रश्न त्यांना भेडसावत नाही. आपल्यामुळे आपले आई वडील दुःखी आहेत याची कल्पना नाही आणि आपण तरी असे का असा प्रश्न त्यांना कधी स्पर्शून गेला नसेल. किती अभागी जीव, जीवनातील खऱ्या आनंदाला वंचित झालेले! एखाद्या खेळण्याला किल्ली देऊन चालवावे तसे यांचे जीवन आहे. किल्ली संपली की आहे त्या ठिकाणी उभे राहणार. शरीरधर्माप्रमाणे गोष्टी करतील. पण प्रगतीचा मार्ग बंद.

पालकांनी केलेले अनेक प्रश्न. मी त्यांना समजावून सांगितले. 'इतके निराश होऊ नका. मी तुमच्या मुलांच्या सहवासात राहते. या मुलांमध्ये नम्रता, मानमर्यादा यांची सुधारणा होते. सतत शिकवून चांगलाच फरक पडतो. अभ्यास जमत नाही. परंतु व्यवसाय शिकून ते चांगल्या सुंदर गोष्टी तयार करतात आणि पैसे मिळवतात. त्यांना समजावून घ्या. आधार द्या. मात्र आंधळे प्रेम काऊ नका.' सांगण किती सोपं असतं. पण आचरणात आणणं किती कठीण!"

आज नंदनवन शाळा जोरात सुरु आहे. प्रवेश देताना प्रथम मुलाचे बुद्धिगुण्य पहिले जाते. सर्व दुर्बलमनस्क मुलांचे सारखे नसते. सामान्यतः त्यात चार भाग पडतात. ० ते २५, २५ ते ५०, ५० ते ७५ असे त्यांचे वर्गीकरण केल्यावर त्यानुसार त्यांना शिकविण्यात येते. शिकविताना त्यांची आवडनिवड समजून घेण्याचा प्रयत्न असतो.

अनुक्रमणिका

**१) शाळा :** शाळेमध्ये ६ ते १८ वयोगटाच्या मुलामुलींना इतर शाळेप्रमाणे औपचारिक शिक्षण दिले जाते. प्रत्येक वर्गातील मुले आणि मुली मिळून संख्या दहा ते पंधरा एवढीच असते. मुलांना चौथीपर्यंत शिकवायचे, यात हिशोब शिकवणे, नोकरीचे अर्ज लिहायला शिकवणे यांवर भर असतो.

**२) संरक्षित कर्मशाळा :** शालेय शिक्षण झाले की संरक्षित कर्मशाळेत व्यावसायिक शिक्षण घ्यावयाचे असा संकेत आहे. तसा नियम किंवा बंधन नाही. संरक्षित कर्मशाळेत १८ वर्षाच्या वरील वयाची मुले असतात.

नागपूर शहरात 'नंदनवन' केंद्राच्या चार शाखा आहेत. लष्करी भाग, गांधीबाग, चंदननगर, धरमपेठ या ठिकाणी महानगरपालिकेच्या शाळेतील एकेक वर्ग भाडयाने घेतला आहे. 'नंदनवन' केंद्र भाडे भरते. या केंद्राची सर्व शाखांची मिळून एकूण विद्यार्थी संख्या १७२ (मुले ११६ + मुली ५६) आहे. 'नंदनवन'ला वसतिगृह आहे. परंतु ते फक्त मुलांसाठी आहे. मुलींसाठी नाही. मुलींच्या जबाबदारीची जोखीम स्वीकारणे आज संस्थेला शक्य नाही.

या संस्थेच्या शाळेत किंवा वसतिगृहात असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत अनियमितता आहे. सर्वसामान्य मुलांइतकी ही मुले नियमित नसतात. मध्येच शाळा सोडून देतात. मध्येच वसतिगृहातून निघून जातात वसतिगृहात वाचनालय आहे. दूरचित्रवाणीसंच आहे. या संस्थेला महाराष्ट्र शासनाची मदत आहे. खर्चाच्या ६६ % अनुदान महाराष्ट्र शासनाकडून मिळते. तर खर्चाच्या काही भागाची जबाबदारी मातृसेवा संघावर असते.

नंदनवन या प्रवृत्तीतून नेमकी चांगली निर्मिती कोणती होऊ शकली याची नोंद मातृसेवा एप्रिल-मे १९८३ अंकात आहे. उदा.

१. अनुपम गडकरी : सुमारे चार वर्षे होता. आय. क्यू. जेमतेम ४० पर्यंत. ग्राउंड वॉटर सर्व्हेमध्ये २ वर्षे चौकीदार म्हणून काम केले आणि सायन्स कॉलेजमध्ये लॅबोरेटरी असिस्टंट म्हणून काम करू लागला.

२. अश्वजित फुले : हा एक वर्षाचा असताना शाळेत आला. अत्यंत अबोल. पुस्तकबांधणी आणि खडू व्यवसाय उत्तम रीतीने करू लागला. १९८१ मध्ये वडिलांच्या निवृत्तीनंतर स्थानिक शासकीय प्रेसमध्ये नोकरी मिळाली.

३. अनिल शिरबावीकर : आठवीपर्यंत शिक्षण. खुर्चीकामात हातखंडा. सायकलवरून शाळेत येत असे. नंतर हिंगण्याला एका कारखान्यात रोजंदारीने काम करू लागला.

४. अरुण देशपांडे : उशिरा, मोठ्या वयात शाळेत आला. प्रयत्न करून दहावी पास झाला. अपस्मार, फेफरे यामुळे शारीरिक व मानसिक शक्ती कमी. खाजगीरीत्या खुर्च्या विणण्याचे काम चांगले करत असे. नागपूर विभागाच्या पदव्युत्तर विभागातील खुर्च्या विणण्याचे काम मिळाले होते. नागपूरच्या लोकशिक्षण संस्थेकडून पुस्तकांची बांधणी करण्याचे काम त्याला दरवर्षी उन्हाळ्यात मिळू लागले.

अनुक्रमणिका

५. प्रभाकर गोडसे : नंदनवनचा एक जुना विद्यार्थी. मातृसेवा संघाच्या कार्यालयात काम करतो. संस्थेच्या पंचवटी प्रवृत्तीत राहणाऱ्या मुलीबरोबर त्याचा विवाह झाला.

अपंगांच्या दुर्बलमनस्कांचा प्रश्न फार वेगळा आहे. कार्यकर्त्यांच्या, संस्थेच्या चिकाटीची आत्यंतिक कसोटी पाहणारा असा हा प्रश्न आहे. कोणत्याही स्वयंसेवी संस्थेत, समाजकार्यात परिश्रमाची फलश्रुती पुरेशा आर्थिक मोबदल्यात मिळू शकत नाही. परंतु बऱ्याच ठिकाणी लाभार्थींकडून मानमान्यता, कृतज्ञता मिळते. ती अमूल्य असते. दुर्बलमनस्कांकडून तीही मिळणे कठीणच. सतत अंधारलेला, अस्थिर भविष्यकाळ सोबतीला असताना हातात पणती घेऊन चालत राहायचे असते. हे लक्षात आल्यावर ही जबाबदारी स्वीकारणाऱ्या मातृसेवा संघाची सामाजिक संवेदनशीलता विशेषत्वाने जाणवते.

## समाजकार्य महाविद्यालय (प्रवृत्ती)

सत्यबाला तायल मातृसेवा संघात हजार झाल्या. आहे तो संस्थेचा व्याप सांभाळत राहायचे, यात त्यांचे समाधान नव्हते. त्यांना स्वतःचे कार्य उभे करायचे होते. ते त्यांच्या ध्येयाशी आणि ज्या संस्थेत त्या आल्या त्या मातृसेवा संघाच्या ध्येयाशी सुसंगत हवे होते. आजवरचे त्यांचे कार्य आंदोलन, चळवळ या प्रकारचे होते; क्रांतीच्या कल्पनेने भारावून जाऊन केलेले होते. मातृसेवा संघ ही संस्था क्रांतीच्या मार्गाने जाणारी संस्था नव्हती. ती सेवाभावी मार्गाने जाणारी कल्याणकारी संस्था होती. आज असे म्हणता येईल की संस्था धीमेपणाने उत्क्रांतीच्या मार्गाने जाणारी होती. त्या चौकटीत बसेल अशा कार्याला आरंभ करावयाचा होता. त्यानुसार त्या विचार करत होत्या.

अखेर त्यांना वाट सापडली. समाजकार्यकर्त्यांची समाजाला किती निकड आहे हे जाणवत होते. कार्यकर्ते जन्मावे, हे समजत होते. तरी ते प्रशिक्षणाने तयार होऊ शकतील असेही वाटत होते. आंतरिक प्रेरणेने समाजकार्यात उतरणाऱ्यांही प्रशिक्षण कसे उपयोगी येऊ शकते याचा अंदाज होता. भविष्यकाळात एकंदरीत सर्व क्षेत्रात प्रशिक्षण गरजेचे आहे याची चाहूल लागली होती.

सत्यबाला तायल यांनी मातृसेवा संघात समाजकार्य महाविद्यालय या प्रवृत्तीला प्रारंभ केला. १९५८ मध्ये हे प्रागतिक पाऊल होते. स्वयंसेवी संस्था म्हणजे त्यागी कार्यकर्ते व ते उत्स्फुर्तपणे अवतरतात असे समीकरण त्या काळात रूढ होते.

समाजकार्य महाविद्यालयाची स्थापना १९५८ मध्ये झाली. मातृसेवा संघाच्या छोट्याशा खोलीत सात विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा आरंभ झाला. समोर प्रसूतिगृहाची इमारत होती. खाली मातृसेवा संघाचे कर्मचारी राहात असत. पहिल्या मजल्यावर समाजकार्य महाविद्यालयाच्या तीन छोट्या खोल्या होत्या. प्राचार्य सत्यबाला तायल आणि कार्यालयीन कर्मचारी एकाच खोलीत बसत. एकाच टेबलावर चहा होत असे. त्यामुळे कर्मचारी वर्गाची बैठक केव्हाही घेणे शक्य असे. या अनौपचारिक वातावरणामुळे हे महाविद्यालय आहे असे वाटतच नसे.

१९६२ पासून संस्था विद्यापीठाशी संलग्न झाली. दोन वर्षांचा समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु झाला. १९७७ दिवाळीच्या सुट्टीपासून संस्था बजाजनगर येथे एका सुंदर इमारतीत हलली. १९७८ पासून पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमास सुरुवात झाली. बॅचलर ऑफ सोशल वर्क हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा

अनुक्रमणिका

होता. १९७८ पासून मास्टर ऑफ सोशल वर्क या पदव्युत्तर अभ्यासक्रमास सुरुवात झाली. १९८८ पासून एम. फील. इन सोशल वर्कला सुरुवात झाली. प्रथमपासून १९८४ पर्यंत सत्यबाला तायल या महाविद्यालयाच्या प्राचार्य होत्या. १९६८ पर्यंत त्या विनावेतन काम करीत होत्या. नंतर वेतन घेऊ लागल्या.

महाविद्यालयासाठी अद्ययावत ग्रंथालय आहे. अनेक पुस्तके, अभ्यासपत्रिका (जर्नल), नियतकालिके तेथे उपलब्ध होऊ शकतात. संगणक विभागही आहे. शिवाय राष्ट्रीय सेवा योजना, शालेय समाजकार्य असे इतरही अनेक उपक्रम सुरु झाले आहेत.

## राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम

या योजनेत एकूण १०० विद्यार्थ्यांचा समावेश करता येतो. विद्यार्थ्यांमध्ये असलेले कौशल्य व कामाची आवड लक्षात घेऊन ही निवड करण्यात येते. त्यासाठी एक प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांची एक निर्देशिका (डीरेक्टरी) तयार करून ती वाचनालयात ठेवण्यात आली आहे. या विद्यार्थिनी समाजकल्याण खात्याच्या यंत्रणांमध्ये आणि झोपडपट्टी मध्ये निरनिराळे कार्यक्रम घेतात. या कार्यक्रमांमध्ये आजारांविषयी माहिती देणारी व्याख्याने, आरोग्यविषयक जाणिवा निर्माण करणाऱ्या चर्चा, पारदर्शिका दाखविणे, काही वादविवाद स्पर्धा इत्यादींचा अंतर्भाव असतो.

केंद्र/ राज्य शासनाच्या सहकार्याने निरनिराळ्या विद्यापिठांद्वारा राष्ट्रीय सेवा योजना राबवली जाते. आपल्याला मिळणारा रिकामा वेळ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवेसाठी वापरावा या उद्देशाने ही योजना राबवली जाते. आपल्यामधील विधायक शक्ती मुलांनी राष्ट्र उभारणीच्या मार्गी लावावी या दृष्टीने कार्यक्रमाची आखणी केलेली असते.

सर्वसामान्य जनता आणि मुठभर उच्चशिक्षित वर्ग यांच्यामध्ये खूप मोठी दरी आहे. ती दरी सांधणे आवश्यक आहे. 'लोक विद्यापीठ' या विचाराच्या आधारानेच ही दरी सांधता येईल. लोक विद्यापीठ ही कल्पना व्यवहारात उतरविण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधून राष्ट्रीय सेवा योजनेत विविध उपक्रम आखले गेले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक तसेच खाजगी, सार्वजनिक, व्यावसायिक अशा सर्व प्रकारच्या कल्याणकारी संस्था, धर्मादाय संस्था यांचे सहाय्य घेतले जाते कारण एखादीच संस्था म्हणण्यासारखे कार्य करू शकत नाही. मातृसेवा संघाच्या समाजकार्य महाविद्यालयाने हे आव्हान स्वीकारले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची शाखा आपल्या संस्थेला मिळवी म्हणून अर्ज केला आणि १९७० मध्ये नागपूर विद्यापीठाकडून तशी मान्यता मिळाली.

राष्ट्रीय सेवा योजना येण्याआधी मातृसेवा संघात विविध उपक्रम होतेच, परंतु या योजनेमुळे खेडेगावातील शिबिरे, स्वच्छता मोहीम, मुलांसाठी आनंदयात्रा यांसारखे उपक्रम अधिक रेखीव झाले आणि त्यांना गती आली.

बी. एस. डब्ल्यू. च्या दुसऱ्या वर्षातील आणि एम. एस. डब्ल्यू. च्या पहिल्या वर्षातील विद्यर्थ्यांसाठी या योजनेखाली संस्थेतर्फे खेडेगांवात शिबिरे आखली जात. त्यांमध्ये खेड्यातील वस्तुस्थिती, तेथील प्रश्न, आर्थिक-सामाजिक-राजकीय रेटे यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात येई. नेतृत्त्वगुण जागे करून

उपक्रमात त्यांना सहभागी करून घेऊन त्यांचे संघटनकौशल्य, निर्णय घेण्याची शक्ती इ.गुणांना वाव दिला जाई. खेडेगावातल्या जनतेशी भावनेने जोडले जाण्याची संधी देणे, सहकार्य, सचोटी एकत्रित कार्य करण्याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न होत असे. स्थानिक प्रश्न लक्षात घेऊन, स्थानिक लोकांबरोबर कार्य करण्याची सवय केली जाई. निरनिराळी सर्वेक्षणे करून माहिती गोळा करण्याचे कामही केले जात असे.

विद्यार्थी स्वयंसेवकांनी झोपड्या, झोपड्यांचे परिसर स्वच्छ केले. पुतळे स्वच्छ केले. काँग्रेस गवत उपटून टाकले. त्या गवताचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगितले. प्राथमिक शाळेतील मुलांसाठी आनंदजत्रा आयोजित केली. रुग्णालयामधील मुलांसाठी आनंदजत्रा घेतल्या. रुग्णांसाठी विद्यार्थी आळीपाळीने स्वयंसेवक होऊन त्यांची कामे करीत.

### वैद्यकीय समाजसेवा केंद्र उपक्रम

१९७५ मध्ये हे केंद्र सुरु करण्यात आले. केंद्राचा मुख्य उद्देश रुग्णालयात दीर्घकाल उपचार होत असलेल्या मुलांना, व्यक्तींना मानसिक आधार देणे, मदत करणे हा आहे. त्यासाठी समाज कार्यकर्ता आणि हस्तकला शिक्षक अशा दोन व्यक्तींची नेमणूक केलेली आहे.

या केंद्रातर्फे उत्सव साजरे केले जातात. केंद्राद्वारे रक्तदानाची सोय उपलब्ध आहे. गरीब रुगानांना अर्थसहाय्यही केले जाते. रुग्णांकरता छोटेसे ग्रंथालय आहे. दीर्घकाल उपचार होत असणाऱ्यांना त्याचा फायदा होतो.

संस्थेच्या अहवालानुसार १९९३-९४ या वर्षात सुमारे आठ हजार रुग्णांना केंद्राद्वारे फायदा झाला. केंद्राने सुमारे सातशे व्यक्तींना मोफत सवलत प्रपत्रे दिली. हे केंद्र सुरु करण्यात डॉ. मारवा आणि श्रीमती यु. व्ही. संत यांचे प्रयत्न होते.

शिशु कल्याण केंद्राकडून मिळालेल्या आर्थिक सहाय्यामुळे केंद्र सुरु होऊ शकले. १९७८ नंतर हॉलंडची विरील्ड किडनर, पश्चिम जर्मनीची टेरेडेस होम आणि ऑक्सफॅम या तीनही संस्थांनी निधी देऊ केला आणि संस्थेची आर्थिक बाजू भक्कम झाली.

रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना केंद्राबाबत हळूहळू विश्वास वाटू लागल्यावर त्यांच्या समाजसेवा केंद्राबाबत अपेक्षा वाढल्या. अन्नवाटपावर देखरेख पाहिजे, फिरते आहारगृह पाहिजे, बाह्य रुग्ण विभागात पिण्याच्या पाण्याची सोय पाहिजे या त्यांनीच केलेल्या सूचनांनुसार केंद्राने हळूहळू आपले कार्यक्षेत्र वाढवले. जवळपासच्या झोपडपट्टीत आरोग्य तपासणी आणि रोगप्रतिबंधक उपायाची शिबिरे सुरु झाली. कुटुंब नियोजनाचा प्रचारही सुरु करण्यात आला. केंद्राने देणग्या जमवून एक कायमस्वरूपी विहीर बांधली.

समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रशिक्षणार्थींना वैद्यकीय आणि मानसोपचार क्षेत्रातील भरीव व्यवहारी अनुभव देणे, रुग्णाच्या सुधारणेच्या आड येणारे सामाजिक आणि मानसिक प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणे, आजारी मुलांचे आरोग्य सुधारण्यासाठी त्यांना शिक्षण आणि करमणुकीच्या माध्यमातून काही

अनुक्रमणिका

विशिष्ठ सेवा उपलब्ध करून देणे, साकाजकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि व्यावसायिक संस्था यांचा रुग्णालयात समन्वय साधणे ही वैद्यकीय समाजसेवा केंद्राची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

वैद्यकीय समाज कार्यकर्ता, डॉक्टर आणि रुग्ण-रुग्णाचे कुटुंब यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतो. तो त्याच्या घरी भेटी देतो. रुग्णाचे पूर्ववृत्त लेखी तयार करतो. रक्त मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देतो. रुग्णाला, त्याच्या नातलगांना मानसिक आणि भावनिक आधार देतो. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन सोपे होते. समाज कार्यकर्ते कशा प्रकारे मदत करू शकतात. त्याचे उदाहरण म्हणजे उत्तम हा पंधरा वर्षांचा मुलगा. चतुरांग- दोन हात दोन पायांच्या- विकलांगतेची (Quadriplegia) ची केस म्हणून रुग्णालयामध्ये आला. तो अगदी फिकटलेला दिसत होता. डोक्यावर मोठे थोरले प्लॅस्टर. गरीब कुटुंबातला. आईवडील वारले होते. काकांजवळ राहत होता. त्याचा आजार बारा झाला. रुग्णालयाने त्याला घरी जाण्याची परवानगी दिली. पण त्याला नेण्यासाठी कोणीच आले नाही. त्याला डिसचार्ज मिळाला होता. डॉक्टरांनी एका समाज कार्यकर्तीला कळवले. तिने काकांकडे दोनदा पत्रे पाठविली. पण उत्तर नाही. मग बरोबर एक माणूस देऊन, थोडे पैसे देऊन, रुग्णवाहिकेची तयारी करून त्याला घरी पाठविण्याचे ठरले. पण तो काकांकडे जाण्यास तयार नव्हता. त्याचे पुनर्वसन करण्याचे आव्हान तिने स्वीकारले. उत्तमशी चांगल्या प्रकारे संवाद साधला. त्याच्या कुवतीचा अंदाज घेतला. त्याला कशात रस वाटतो ते शोधून काढले. त्याला शिकण्यात रस होता. पण त्यासाठी आवश्यक ते आर्थिक साह्य नव्हते. तिने ठरवले, निवासाची सोय असलेल्या अपंगांच्या शासकीय शाळेत त्याला शिकवायचे. पण तो अपंग नव्हता. त्यामुळे त्याला शाळेत घेण्यास शासकीय व्यवस्थापनाची तयारी नव्हती. तोही तेथे जाण्यास तयार नव्हता. तिने शाळेचा अधिकारी व मुलगा दोघांचीही समजूत घातली. त्याच्या खेड्यातल्या शाळेतून त्याची प्रमाणपत्रे मागवली. मुलाखतीच्या वेळी ती पालक म्हणून स्वतः त्याच्याबरोबर गेली. त्याची गरज भागेल इतका पैसा तिने जमा केला. उत्तमला स्वतः च्या पायांवर उभे केले.

या केंद्रात व्यवसाय- शिक्षकांचे कार्यही महत्वाचे असते. रुग्णालयातील मुलांना शिक्षण आणि करमणुकीच्या माध्यमांतून आधार देणे व्यवसाय-शिक्षकांकडून अपेक्षित असते, ते निरनिराळ्या काक्षांमधील मुलांमधून फिरतात. कक्षांमधू रुग्ण मुलांचे वर्गीकरण साधारणपणे पोलिओ, हृदयविकार, कर्करोग, मधुमेह, क्षय या प्रकारे केलेले असते. त्या मुलांचे आजार लक्षात घेऊन व्यवसाय शिक्षकाने आपले कार्य करायचे असते. आजारामुळे शाळेपासून दूर राहावे लागले तरी त्याचे नुकसान होऊ नये हा या मागचा हेतू असतो. व्यवसाय शिक्षकाच्या कामामध्ये पुढील कामांचा अंतर्भाव असतो :

मुलांच्या अंथरुणाजवळ बसून त्यांना अक्षरे, आकडे लिहायला शिकवणे. शालेय अभ्यास करून घेऊन शाळेतील परीक्षेस बसण्यास समर्थ करणे. २) चित्रे काढणे, चित्रे रंगविणे, चांगली चित्रे कापून घेणे. कॅरम, सापशिडी यांसारखे खेळ खेळायला शिकवणे. त्यांना गोष्टी सांगणे, गट जमवून गाणी म्हणवून घेणे. ३) कागदाची फुले करायला शिकवणे. सुईने शिवणे, टोपल्या विणायला शिकवणे. ४) रुग्णालयाच्या वातावरणाचा मुलांवर दबाव असतो. ताण असतो. डॉक्टर, परिचारिका त्यांच्या कामात इतक्या व्यग्र असतात, की मुलांकडे बघण्यास, त्यांचे क्षणभर ऐकून घेण्यास त्यांना फुरसत नसते. व्यवसाय शिक्षक हा वेळ देऊ शकतात. ५) ग्रंथालयात इंग्लिश, मराठी, हिंदी पुस्तके असतात. व्यवसाय शिक्षक कक्षातल्या मुलांना पुस्तके वाटून देतात. त्यांची नोंद आपल्या वहीत ठेवतात.

मकरसंक्रांत, रक्षाबंधन, स्वातंत्र्यदिन यांसारखे वेगवेगळे सण साजरे करणे, रक्तदान शिबिरे घेणे यांसारख्या माध्यमांतून रुग्णांचा जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी संपर्क ठेवण्यासाठी वैद्यकीय समाजसेवा केंद्र मदत करते. गरीब रुग्णांच्या उपचारांसाठी आणि त्यांच्या रोजच्या गरजांसाठी मदत करणे ह्या कामांसाठी रोटरी क्लब, विदर्भ रिलीफ कमिटी या निधी देणाऱ्या संस्थांशी केंद्राचा सतत संपर्क असतो.

त्यामुळे हळूहळू हे केंद्र म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाचा एक विभाग झाले आहे. केंद्रामध्ये प्रशिक्षित वैद्यकीय समाज कार्यकर्त्यांकडून बी. एस. डब्ल्यू, एम. एस. डब्ल्यूच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात मार्गदर्शन मिळते. विद्यार्थ्यांकडे असलेली प्रकरणे, गटचर्चा, गटाचे काम आणि इतर कार्य यांमधून वैद्यकीय समाज कार्यकर्ते हे मार्गदर्शन करतात.

## राष्ट्रीय प्रौढ शिक्षण उपक्रम

भारत सरकारने निरक्षरता निर्मुलनासाठी १९७८ मध्ये प्रौढ शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतला. शासकीय संस्था, अशासकीय संस्था आणि शिक्षण संस्था यांच्या मार्फत निरक्षर प्रौढजनांना शिक्षण देण्यासंबंधीची ही योजना होती. यामध्ये १५ ते ३५ या वयोगटावर लक्ष केंद्रित केलेले होते.

मातृसेवा समाजकार्य महाविद्यालय ही संस्था प्रथमपासूनच म्हणजे १९७८ पासूनच या उपक्रमात सहभागी झाली. केवळ सहभागी झाली असे नाही तर हा उपक्रम पार पाडण्याची सर्व जबाबदारी संस्थेने स्वीकारली. मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालयातच एक समिती स्थापन करण्यात आली. प्राचार्य डॉ. सत्यबाला तायल या समितीच्या अध्यक्ष होत्या. श्री. देवगांवकर, श्री. कुकडे, डॉ. कडुसकर हे समितीचे इतर सभासदही समाजकार्य महाविद्यालयाच्या कर्मचारीवर्गातीलच होते.

या उपक्रमाची दहा केंद्रे नागपूरच्या निरनिराळ्या झोपडपट्टयांमध्ये सुरु झाली. समाजकार्य महाविद्यालयाच्या पासष्ट विद्यार्थिनी तेथे निदेशक (इन्स्ट्रक्टर) म्हणून काम करू लागल्या. अनुसूचित जाती जमातींना शिकविण्याकडे विशेष लक्ष पुरविले जात होते. तेथे शिक्षण घेणाऱ्यांना प्रमाणपत्रे देणेही सुरु केले. या केंद्राचा हेतू केवळ साक्षरता प्रसार एवढाच मर्यादित नव्हता. व्यक्तिमत्व विकासाकडेही लक्ष पुरविले जात असे.

या उपक्रमात आपल्या विद्यार्थिनींना समर्थपणे जबाबदारी पेलावी म्हणून महाविद्यालयाच्या कर्मचारीवर्गाने तात्पुरते प्रशिक्षण सुरु केले. तसेच एकंदर उपक्रमावर पर्यवेक्षक नेमणे सुरु केले. आरोग्य, आहार, दारूबंदी, कुटुंबनियोजन, नागरिकांच्या जबाबदाऱ्या यांविषयी जाणिवा जागृत करण्याचे प्रयत्न होत असत. त्यासाठी पारदर्शिका दाखविल्या जात. चित्र प्रदर्शने भरविली जाऊन चर्चा होत. कधी कधी प्रात्याक्षिके दाखवूनही प्रबोधन केले जात असे. या सर्व उपक्रमात बोलते करण्यावर भर दिला जात असे. स्त्री सुधारली तर पूर्ण घर सुधारते हे कार्यकर्त्यांच्या मनावर ठसविले जात असे.

## महिला कर्मचाऱ्यांसाठी वसतिगृह

मध्यवर्ती समाज कल्याण मंडळाच्या आर्थिक मदतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी वसतिगृह उभारले गेले. येथे शंभर स्त्रियांच्या भोजनाची व निवासाची व्यवस्था आहे. मुख्यतः नोकरी करणाऱ्या स्त्रिया येथे राहतात. पण परिस्थितीनुसार गरजू महाविद्यालयीन विद्यार्थिनींचीही सोय केली जाते.

अनुक्रमणिका

## चैतन्य : व्यसनमुक्ती केंद्र

१९९० मध्ये हे केंद्र सुरु झाले. मद्यासक्त आणि ब्राऊन शुगर इ. मादक द्रव्यांच्या आहारी गेलेल्या व्यसनाधीन व्यक्तींवर येथे उपचार केले जातात. सुमारे ३५ रुग्णांच्या निवासाची सोय येथे आहे. रुग्णांसाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

कर्मचाऱ्यांमध्ये एक डॉक्टर, एक मनोविकृतिचिकित्सक, दोन समुपदेशक, सहा समाजकार्यकर्ते यांचा समावेश आहे. वेतनाचा नव्वद टक्के भाग शासनाकडून मिळतो. दहा टक्के भाग मातृसेवा संघ देतो. नेमणुकांचे स्वातंत्र्य मातृसेवा संघाला आहे.

१९९३-९४ या वर्षात मद्यव्यसनाधीन रुग्णांची, ब्राऊन शुगर, मल्टी ड्रग मिळून एकंदर २०५ प्रकरणे केंद्रात नोंदवली गेली. त्यापैकी १६१ व्यक्ती केंद्रात उपचार घेत होत्या. २६ जून चा आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ निषेध दिन केंद्राने साजरी केला.

३० मे १९९३ रोजी तंबाखू निषेध दिन पाळण्यात आला. बंगलोर येथील योगकेंद्राचे संचालक डॉ. नागेंद्र, पुणे येथील मुक्तांगणचे संचालक डॉ. अनिल अवचट यांनी केंद्राला भेटी दिल्या. केंद्रातर्फे जाणीव जागृती कार्यक्रम झाले. नागपूर महापालिकेतर्फे चैतन्यमध्ये काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचा त्यांच्या कामाबद्दल सत्कार करण्यात आला.

शासन दरवर्षी या उपक्रमाचे नुतनीकरण करते. हा उपक्रम बंद करण्याचा अधिकार शासनाला आहे.

## ग्रामीण सामजिक – आर्थिक विकास प्रकल्प

या प्रकल्पात लुथेरीन वर्ल्ड रिलीफ सर्व्हिसेसकडून सहाय्य मिळाले. ग्रामीण भागातील गरजा शोधून काढून त्यांना सर्व प्रकारची मदत करण्याचे कार्य केले जाते. नागपूर – अमरावती मार्गावरील बावीस कि. मी. अंतरावरील अकरा गावांमध्ये या प्रकल्पाचे काम चालले.

## झोपडपट्टी सुधार योजना

मातृसेवा संघाचे झोपडपट्टयांमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न सतत चालू होते. जून १९८० मध्ये एक प्रकल्प पुढे आला- झोपडपट्टीसुधार योजना. नागपूरच्या झोपडपट्टयां सर्व प्रकारची सुधारणा घडवून आणणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता. झोपडपट्टीची गलिच्छ स्थिती सुधारणे आणि तेथील रहिवाशांच्या जाणिवांची पातळी उंचावणे असा दोन स्तरांवरचा कार्यक्रम राबवण्याचे ठरले.

प्रत्येक झोपडपट्टीचा स्वतःचा असा वेगळा प्रश्न होता.

फकीरवाडी या झोपडपट्टीत पहिला प्रयोग झाला. या ठिकाणी अकुशल कामगार आणि रिक्षा चालकांची वस्ती होती. हा अगदी तळागाळाचा वर्ग. लोक जवळजवळ वीस वर्षे त्या ठिकाणी राहत होते.

नागरी जीवनाच्या प्राथमिक सुविधाही तेथे नव्हत्या. पाणी अपुरे; सांडपाण्याची व्यवस्था नाही; वीज नाही; पोचण्यासाठी धड रस्ते नाही. त्यांचा आवाज व्यवस्थापनापर्यंत पोहोचूच शकत नव्हता. प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी प्रथम त्या वस्तीला, प्राथमिक सुविधा मिळविण्यासाठी सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे याची जाणीव दिली. त्या वस्तीची संघटना उभी केली. रस्ते, ड्रेनेज व्यवस्थित केले. संडासाची रांग केली. सर्वत्र वीज आणि पाणी आणले.

संजयनगर, मरीयनगर, शिवनगरचा प्रश्न वेगळा होता. झोपडपट्टी उठाविण्यासंबंधी बोलले जात असे. ती धास्ती तेथील लोकांच्या मनात सतत असे. झोपडपट्टी सुधार योजनेने कायद्याची बाजू समजावून सांगितली. सर्वांना संघटना करून झगडण्यास उद्युक्त केले. आता हाकलले जाण्याची भीती त्यांना उरली नाही.

शिवनगरमधील लोकांची नावे मतदार यादीत नव्हती. ती समाविष्ट केली गेली.

संजय गांधीनगर झोपडपट्टीत अस्वच्छता, कमी पाणी इ. प्रश्न होतेच. शिवाय तेथे निरनिराळ्या राजकीय पक्षांचे गट होते. त्यांच्यात सतत भांडणे होती. त्या ठिकाणी कार्य करणे फारच कठीण होते. कारण त्या लोकांना अंतर्गत राजकारणाशिवाय कशातच रस नव्हता. लोकांची नावे मतदार यादीत नोंदण्यापासून कार्यास सुरुवात झाली. स्थानिक लोकांच्या संघटनांनाच उत्तेजन देणे सुरू केले. सांस्कृतिक, आर्थिक, आरोग्य सर्वच बाजूंनी सर्वेक्षण सुरु केले. गरजा ओळखून मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरु झाले.

भविष्यात काय करता येईल याची योजना आखण्यासाठी खामला झोपडपट्टीत झाडू तयार करणाऱ्यांना प्रत्येकी दोनशे रुपये कर्ज म्हणून देण्यात आले. लवकरच ही कर्जे फेडली गेली ही त्यांची सचोटी.

समाजकार्य महाविद्यालयाने १९८३ च्या डिसेंबर महिन्यात झोपडपट्टी-सुधारणा या विषयावर तीन दिवसांचे चर्चासत्र घेतले. तीन दिवसांच्या चर्चासत्रामधील एकंदर सहा सत्रांतून पुढीलप्रमाणे काही विचार पुढे आले. झोपडपट्टी रहिवाशांसाठी राज्य शासनाने जे कायदे केलेले आहेत ते प्रत्यक्षात पूर्णपणे निरुपयोगी आहेत. झोपडपट्टी उठाविण्यासंबंधीचे जे कायदे आहेत, त्यात उठवलेल्या झोपडपट्टी रहिवाशांच्या पुनर्वसनाची तरतूद नाही. शासनाचे झोपडपट्टीविषयीचे धोरण सदोष असल्यामुळे तेथे सुधारणा होऊ शकत नाहीत.

कमाल जमीन धारणा कायद्याप्रमाणे जी जास्तीची जमीन असते ती झोपडपट्टीतील रहिवाशांना दिली पाहिजे.

समाजकार्य, कायदेतज्ज्ञ, झोपडपट्टी- रहिवासी यांचा मिळून एक गट निर्माण केल पाहिजे. म्हणजे अस्तित्वात असलेल्या कायद्यातील फटी बुजवता येतील किंवा नवीन तरतुदी सुचवता येतील.

अनुक्रमणिका

झोपडपट्टीतील रहिवाशांची सुव्यवस्थित कार्य करण्याची शक्ती वाढविली पाहिजे. तसेच वस्तुस्थितीचे निरीक्षण, पृथक्करण करण्याची त्यांची जाण वाढली पाहिजे. म्हणजे त्यांना स्वतःच्या ताकदीचा अंदाज येईल आणि ते संघटना बांधू शकतील.

झोपडपट्टीसंबंधी जे काही कायदे अस्तित्वात आहेत त्यांचा सर्वदूर प्रसार झाला पाहिजे.

झोपडपट्टी रहिवाशांमध्ये सामाजिक वस्तुस्थितीची जाणीव निर्माण करून त्यांना निरनिराळ्या शासकीय योजनांचे फायदे मिळवून देण्यासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणे, झोपडपट्टीच्या प्रश्नाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी परिसंवाद आयोजित करणे असे अनेक कार्यक्रम या योजनेद्वारे राबविले जातात.

### दत्तक सेवा प्रकल्प

जानेवारी १९८२ मध्ये या प्रकल्पाला सुरुवात झाली. अनाथ मुलांना आईवडील मिळवून देणे हे ह्या प्रकल्पाचे उद्दिष्ट. मूल दत्तक घेण्यासाठी समाजमन तयार करणे, दत्तक घेतानाच्या जबाबदाऱ्या, अटी, कायदेशीर बाजू समजावून सांगणे इत्यादी सर्व कार्य या प्रकल्पाद्वारे केले जाते. मूल दत्तक दिल्यावर काही काळ कार्यकर्ते त्या घराला भेटी देतात. मूल जर परदेशी गेले तर पत्राने संपर्क साधला जातो. वेळोवेळी छायाचित्रे मागवली जातात.

संस्थेच्या अहवालानुसार भारतात दत्तक देण्याचे प्रमाण ५१ टक्के आहे. प्रकल्पातील समाजकार्यकर्त्या लातूर येथील भूकंपग्रस्त भागात अनाथ मुलांना आणण्याकरिता गेल्या. परंतु अधिकाऱ्यांनी अशा मुलांना नागपूरला नेण्याकरिता परवानगी नाकारली. दत्तक सेवा प्रकल्पाबद्दल जास्तीत जास्त लोकांना माहिती व्हावी म्हणून समाज कार्यकर्त्यांनी खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांना भेटी दिल्या. जानेवारी १९९३ पासून गोरक्षण सभा ही संस्था प्रकल्पातील मुलांना दुध पुरविते.

या योजनेमध्ये मुलांचा समावेश करून घेण्याबाबतची निश्चित कार्यवाही आहे. रुग्णालयांमधून, स्त्रियांच्या कक्षामधून अविवाहित किंवा विधवा स्त्रियांची मुले येथे येतात. आईची संपूर्ण माहिती लिहून घेतली जाते. मुल तिने घरी न्यावे असा शक्य तितका प्रयत्न केला जातो. जर ती तयार झाली नाही तर तिच्याकडून त्याग-प्रमाणपत्र (abandoning certifecate) घेतले जाते. मग मुलाला स्वीकारले जाते. काही मुले पोलीसांमार्फत येतात. तेव्हा पोलिसांचे कथन लिहून घेतले जाते.

ज्या पालकांना मूल दत्तक हवे असेल त्यांच्यासाठीही निश्चित कार्यवाही आहे. केंद्राची माहिती जनतेला अनेक प्रसार माध्यमांद्वारे दिली जाते. जोडप्याचे नाव नोंदवून घेतले जाते. नंतर त्यांची मुलाखत घेतली जाते. उत्पन्न, विवाह, चारित्र्य या सर्व घटकांबाबतची कायदेशीर प्रमाणपत्रे सदर करावी लागतात. नंतर कार्यकर्ते त्या जोडप्याच्या घरी जाऊन येतात. कार्यकर्त्याने शिफारस केल्यानंतर प्रकल्प समिती तीन महिन्यांच्या मुदतीसाठी त्यांना मूल देते. या तीन महिन्यांतल्या तात्पुरत्या पालाकांबाबत दंडाधिकाऱ्यासमोर सही केली जाते. नंतर तीन महिने कार्यकर्ते काही अचानक भेटी देतात. कार्यकर्त्याला, त्या घराला मूल-पालक यांच्या नात्याबद्दल विश्वासार्हता वाटली की अंतिमतः न्यायालयात मूल त्या जोडप्याचे कायदेशीर वारस होते. नंतरही नित्य पत्रव्यवहार आणि भेटीगाठी ठेवल्या जातात.

## कौटुंबिक सल्ला केंद्र

मध्यवर्ती समाजकल्याण मंडळाच्या अर्थसहाय्याने १९८७ मध्ये कौटुंबिक सल्ला केंद्र सुरु झाले. कौटुंबिक संघर्ष दूर करणे हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे. कौटुंबिक संघर्ष, वैवाहिक समस्या, बाल गुन्हेगारी या प्रश्नांमध्ये लक्ष घालून संबंधित व्यक्तींशी बोलून सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र करते. कुटुंबाच्या जबाबदारीची जाणीव निर्माण केली जाते. कौटुंबिक कायद्याची माहिईत दिली जाते.

## शालेय समाजकार्य

शाळेतील गैरहजेरी, गळती या समस्या हाताळल्या जातात. मुलाच्या घरी जाऊन, पालकांशी चर्चा केली जाते; शिक्षक-पालक यांच्यात दुवा म्हणनू महाविद्यालयाचे विद्यार्थी/शिक्षक कार्य करतात. मुलांच्या आरोग्याची तपासणी करणे, कुपोषित विद्यार्थ्यांना सकस आहार देणे हे उपक्रमही वेळोवेळी पार पाडले जातात. मुलांच्या वर्तनविषयक समस्याही हाताळल्या जातात.

१९९३-९४ वर्षात या प्रकल्पाला शिशु कल्याण केंद्राकडून आर्थिक सहाय्य मिळाले. पहिली ते सातवी वर्गातील जवळजवळ ७०० विद्यार्थी असलेले ज्ञानविकास मंदिर आणि २५० विद्यार्थी असलेले मातृसेवा संघाचे नंदनवन यांच्यासाठी या प्रकल्पाने काम केले. रोटरी क्लब (पूर्व) यांच्या सहाय्याने आरोग्य तपासणीचा कार्यक्रमही पार पाडण्यात आला. विद्यार्थ्यांना सकस आहार देण्यासाठी किराणा मर्चंट असोसिएशनची मदत मिळाली. २०० विद्यार्थ्यांना नागपूर दर्शन सहलीला नेण्यात आले. विवेकानंद केंद्र योगाभ्यासी मंडळ यांसारख्या संस्थांच्या मदतीने इतरही शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात आले. मे-जून १९९३ मध्ये विद्यार्थ्यांचे उन्हाळी शिबिरही आयोजित करण्यात आले होते.

समाजकार्य महाविद्यालयाने आपले कार्य अनेक प्रकारे विस्तृत केले. १९७५ पासून प्रशिक्षित समाज कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाने काही उपक्रम हाती घेण्यात आले. महानगरपालिकांच्या शाळांमधून प्रामुख्याने झोपडपट्टीतील मुले असतात. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षण आणि आर्थिक दोन्ही बाजूंनी मागास म्हणावी अशीच असते. या मुलांचे प्रश्न समजावून घेण्यासाठी या संस्थेने प्रयत्न सुरु केले. १९७६-७७ मध्ये प्रथम महानगरपालिकेच्या चार शाळांचे सर्वेक्षण सुरु केले.

या सर्वेक्षणात अनेक बाबी आढळून आल्या. मुलांना शाळा सोडून इकडेतिकडे भटकणे, चोऱ्या करणे, दारू पिणे, आक्रमक वागणे अशा सवयी आहेत. घरात अभ्यासाला जागा नाही. अभ्यासाचे वातावरण नाही. पालकांनाच शिक्षणाची नेमकी गरज कळलेली नाही. मुलांना पुरेसे जेवण नाही, कपडे नाहीत. हे प्रश्न केवळ शोधून संस्था थांबली नाही. संस्थेने या प्रश्नांवर मात करण्यासाठी काही उपक्रम राबवले.

जेवणाच्या सुटीत वर्गात लहानसहान चोऱ्या होत असत. दोनतीन विद्यार्थ्यांना सुटीत पाळत ठेवण्यास ठेवले. असे काही महिने केल्यावर चोऱ्या बंद झाल्या. एका कार्यकर्त्याने सर्व माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून एक संघटना निर्माण केली. त्यांच्या बरोबर बोलण्याचे कार्यकम सादर केले. त्यातून मुलांना शिक्षणाचे महत्व पटू लागले. मुलांना विज्ञान विषयाच्या शंकांसाठी शाळेत एक पेटी ठेवली. शंका लिहून पेटीत टाकावयाच्या. दर आठवड्याला महाविद्यालयाचे प्राध्यापक उत्तरे देण्यासाठी येऊ लागले.

आपल्यावर विशेष लक्ष दिले जाते आहे या जाणिवेने मुलांना उत्साह वाटू लागला. या शाळेतील मुलांना अपंग मुलांच्या शाळेला भेट देण्यासाठी नेण्यात आले. हेतू हा की अपंगांबद्दल मनात बंधुभाव निर्माण व्हावा, यांची परिस्थिती आपल्यापेक्षा अधिक कठीण आहे हे समजावे आणि मुलांमध्ये सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण व्हावी, मुलांना अभ्यास करण्यासाठी जागा मिळावी म्हणून देखील संस्थेने प्रयत्न केले. शाळा सुरु होण्याआधी दोन तास किंवा संपल्यावर दोन तास काही वर्ग उघडे ठेवले जाऊ लागले. मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांच्या अभ्यासात मदत करण्यासाठी अल्प मानधनावर स्वयंसेवक नोकरीला ठेवले. एखादी गोष्ट सतत मोफत मिळाली की तिची किंमत वाटत नाही. एवढ्यासाठी मुलांकडून या सुविधेबद्दल पन्नास पैसे फी घेण्यात येत असे. यामुळे पालकांनाही मुलांना अभ्यासासाठी पाठविण्याची जबाबदारी वाटत असे. मुलांच्या घरात अभ्यासाचे वातावरण होण्यासाठी पालकांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन समाजकार्य महाविद्यालयाने पालकांसाठी प्रौढ साक्षरतावर्ग सुरु केले. कार्यकर्त्यांसाठी दोनतीन दिवसांची शिबिरे आखली. शाळेमध्ये सामाजिक कार्य करण्याची जाणीव शिबिरात दिली गेली. शिक्षकांसाठी शिबिरे घेतली गेली. त्यात समाजकार्य महाविद्यालयाची भूमिका, प्रशिक्षणाची आवश्यकता यांची जाणीव दिली गेली.

समाजकार्य महाविद्यालय जरी विद्यापीठाशी संबद्ध झाले तरी त्या प्रमाणात संस्थेचे कार्य बंदिस्त झाले नाही. भोवतालच्या समाजात शिरून कार्याच्या कक्षा विस्तारण्याचा प्रयत्न सतत सुरु दिसतो. हे सर्व उपक्रम राबवताना समजातील ज्या गटासाठी कार्य करायचे त्यांची गरज आणि विद्यार्थी स्वयंसेवकांची कुवत लक्षात घेतली जाते. पुरेसे मनुष्यबळ आणि आर्थिक बळ मिळवण्याचीही काळजी घेतली जाते.

## पंचवटी प्रवृत्ती

एकदा कमलाताईंच्या मातोश्री त्यांना म्हणाल्या, “तू इतके सगळे करत आहेस. तर वृद्ध लोकांसाठीही काही तरी सोय कर. आपल्या घरात चांगलं आहे पण बऱ्याच ठिकाणी म्हाताऱ्या माणसांची स्थिती फार वाईट असते.” १९४७ मध्ये त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आईचे हे बोलणे कमलाताईंच्या मनात सदैव घोळत होते. काळ चालला होता. ३०-३५ वर्षे मातृसेवा संघाची सेवा करून निवृत्त होऊन थकलेल्या काही स्त्रिया कमलाताईच्या आश्रयास येऊन राहू लागल्या. मातृसेवा संघात अशा स्त्रियांच्या निवासासाठी पुरेशी जागा नव्हती व संघाच्या चालू कामापेक्षा हे अगदीच वेगळ्या प्रकारचे कार्य होते. कमलाताई त्यांच्याच संस्थेतल्या या वृद्ध झालेल्या स्त्रियांची परिस्थिती पाहून अस्वस्थ होत. नागपूरचे श्रीमंत राजा बाळासाहेब चिटणीस यांच्या पत्नी कै. सौ. लक्ष्मीबाई चिटणीस यांनी मातृसेवा संघाला रु. १०, ०००/- ची देणगी लिहून ठेवल्याचे जाहीर झाले होते. कमलाताईनी श्रीमंत राजा बाळासाहेबांची भेट घेऊन ती रक्कम वृद्धाश्रम या नवीन प्रवृत्तीसाठी खर्च करण्याला संमती मागितली. त्यांनी ती दिली. एवढेच नव्हे तर सीताबर्डीपासून सात किलोमीटर अंतरावर नागपूर उमरेड मार्गावर दिघोरी येथे त्यांची बरीच जमीन होती. त्यापैकी सडकेच्या लगतची तीन एकर जमीन कमलाताईच्या इच्छित कार्यासाठी दिली. शहराच्या गर्दीच्या वातावरणाचा संपर्क नसणारी ही निवांत जागा, वानप्रस्थाश्रमाला योग्य होती. तीन एकर जमिनीवर पन्नास खोल्या बांधण्याचे ठरविले. आश्रमात रामाचे देऊळ बांधण्याचा संकल्पही त्याच वेळी करून आश्रमाला ‘पंचवटी’ नाव देण्याचे ठरवून इमारतीस ‘लक्ष्मीस्मृती’ हे नाव देण्याचे ठरले. ६ नोव्हेंबर १९६१ या दिवशी दहा बारा कच्च्या बांधकामाच्या बराकीसारख्या खोल्या तयार झाल्या आणि केवळ निर्वाहवेतनावर जनसेवा केलेले मातृसेवा संघाचे वार्धक्यपीडित सेवक व सेविका यांची तेथे प्रथम सोय करण्यात आली. पुढे जसजशा देणग्या मिळत गेल्या, तसतशा आणखी खोल्या बांधून समाजातील इतर वृद्ध स्त्री-पुरुषांनाही

प्रवेश मिळू लागला. 'पंचवटी' उद्‌घाटनासाठी ६ नोव्हेंबर १९६१ ते १९ नोव्हेंबर १९६१ असा चौदा दिवसांचा भरगच्च कार्यक्रम कमलाताईंनी ठरविला. वानप्रस्थाश्रमाच्या संस्कृतीला अनुसरून काकडआरती, सामुदायिक प्रार्थना आणि साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, प्रा. नारायणशास्त्री द्रविड, प्रा. भा. श्री. परांजपे ह्यांची संत वाङ्मयावर भाषणे तसेच ग्वाल्हेरच्या श्रीमती कमलाबाई बापट, डॉ. नी. र.वऱ्हाडपांडे, प्रा. श्रीधरपंत वर्णेकर, डॉ. पटेल यांची श्रीराम चरित्र, श्रीकृष्ण चरित्र भगवद्‌शिल्प ह्या विषयांवर विचारप्रवर्तक भाषणे झाली. भजनी मंडळाची भजने झाली. ह्या कार्यक्रमाला नागपूरचे आणि बाहेर गावाचे कार्यकर्ते मुद्दाम आले होते. त्यात श्री. शंकरराव देव यांच्यासारखे मान्यवरही होते.

धनत्रयोदशीला आपल्या पन्नासाव्या वैधव्यदिनानिमित्त कमलाताईंनी पन्नास मेहुणे बोलावून भोजन दिले आणि वस्त्रे व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

'पंचवटी' आश्रम ही मातृसेवा संघाची प्रवृत्ती झाली. तिच्यासाठी एक उपसमिती नेमली गेली व कमलाताई तेथेच राहू लागल्या. आश्रमाच्या पहिल्या वर्षात महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाचे संचालक ह्यांनी आश्रमाला भेटी दिल्या. सर्व व्यवस्था कमलाताई स्वतःच पाहत.

१९६३ च्या गुढीपाडव्याच्या नवरात्रात पंचवटीत एक छोटेसे राममंदिर बांधण्यात आले. श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान यांच्या सुंदर मूर्ती मुद्दाम जयपूरहून आणल्या. त्यासाठी कमलाताई स्वतः गेल्या होत्या. त्या मूर्तींची प्रतिष्ठापना म. म. बाळशास्त्री हरदास ह्यांच्या हस्ते झाली. तीन दिवस धार्मिक सोहळा, कीर्तन, भजन, प्रवचनादी कार्यक्रम झाले. तेव्हापासून तिथे दरवर्षी नवरात्रात मुर्तीस्थापनेचा वर्धापन दिन साजरा होतो. भजन, कीर्तन, प्रवचने होतात.

१९६४-६५ सालापर्यंत संघाच्या सेवानिवृत्त सेवक-सेविकांना त्यांच्या वृद्धापकाळी व गरजू सेविकांच्या मुलामुलींना संस्थेच्या खर्चाने निर्वेधपणे राहण्याची सोय होती. पण त्याच्याही पुढे जाऊन समाजातील इतरही योग्य वृद्धांना व पोरक्या मुलामुलींना आश्रमात प्रवेश देण्याची सोय करावी अशी संस्था चालकांची इच्छा होती व अशी सोय केल्यास सरकारी अनुदान मिळू शकेल अशी सूचना कमलाताईचे बंधु व संघाचे ज्येष्ठ सल्लागार श्री. नानासाहेब मोहनी ह्यांनी केली व त्यांच्याच प्रयत्नांना यश मिळून संस्था Fit Person Institute म्हणून मान्य झाली व राज्य समाजकल्याण सेवाविभाग व समाजकल्याण मुंबई ह्या खात्याकडून 'पंचवटी'स दर वर्षी अनुदान सुरु झाले.

याच सुमारास श्रीराम मंदिराचा दोनशे लोक बसतील एवढा सभामंडप तयार झाला. मंदिराभोवती तारेचे कुंपण तयार झाले. कमलाताईंचे वास्तव्य आश्रमातच होते. पण त्यांच्याकरिता निराळी अशी स्वतंत्र जागा नव्हती. म्हणून मंदिराच्या आवारात एक कुटी बांधली. त्यासाठी रु. ४०००/- खर्च झाले. कमलाताईंच्या नातलगांनी व चाहत्यांनी ही रक्कम उभी केली. कुटिला 'राधाकृष्ण कुटी' हे नाव कमलाताईंच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ ठेवले. पुढे काही दिवसांनंतर राधाकृष्ण कुटीच्या शेजारी तशीच एक कुटी तयार झाली. त्याला मुंबईचे सेवानिवृत्त आयकर आयुक्त श्री. बागडे ह्यांनी देणगी दिली. दोन्ही कुटींना जोडून स्वतंत्र संडास, स्नानगृहे आहेत. आश्रमाच्या राम मंदिरात रोज सकाळ सायंकाळ आरती, प्रार्थना होत असते. दरवर्षी नवरात्र उत्सव व रामनवमीचा रामजन्म उत्सव, रामायणावर कीर्तने इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतात. गणेश उत्सव, स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिन कोणाचे तरी व्याख्यान आयोजित करून साजरे होतात. शिवाय वृद्धांचे वाढदिवसही होतात. वर्षातून एकदा तरी सर्व आश्रमवासीयांची सहल

होते. रोटरीक्लबच्या सौजन्याने एक दूरदर्शन संच मिळाला आहे. वृद्धाश्रमात राहणाऱ्या तसेच बाहेरील लोकांनाही त्याचे फार आकर्षण असते. पंचवटीत एक छोटेसे वाचनालय आहे. रोजची वर्तमानपत्रे येतात, वृद्धांना विरंगुळा म्हणून एखादा हस्तव्यवसाय, सुत कताई किंवा लघुउद्योग असावा म्हणून प्रयत्न केले, अंबर चरखा आणला. परंतु हा प्रयत्न सफल झाला नाही. वृद्धांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

आश्रमातील वृद्धांना वैद्यकीय मदत मिळावी ह्या हेतूने काही सेवाभावी डॉक्टरांनी मानद सेवा दिली. वृद्धाश्रम शहरापासून लांब, जवळपास डॉक्टर नाही, अशा वेळी कमलाताईच्या प्रेमापोटी डॉ. कावरे, डॉ. बुचे, मातृसेवा संघाचे डॉक्टर ह्यांनी आठवड्यात दोन वेळा आश्रमात मदत देऊ केली. त्याचप्रमाणे शहरातील सेवाभावी संस्थांनी व नामवंत डॉक्टरांनी आरोग्य शिबिरे घेऊन आपली सेवा रुजू केली. आजही आश्रमातील वृद्धांना जरूर ती वैद्यकीय मदत होत असते.

आश्रमासाठी जबाबदार व्यवस्थापकांची गरज भासू लागली. खादी ग्रामोद्योग मध्ये कार्य करून निवृत्त झालेले श्री. बाळूकाका जोशी हे आश्रमातच राहून व्यवस्थापनाचे कार्य पाहू लागले. त्यांचा मृत्यू पंचवटी आश्रमातच झाला. व्यवस्थापनाच्या कार्यात ज्या दुसऱ्या व्यक्तीचे योगदान महत्वाचे झाले ते म्हणजे श्री. के. कृ. रिंगे, श्री. बाळासाहेब रिंगे हे सेवानिवृत्त उप जिल्हाधिकारी होते. त्यांनी संस्थेत अनेक वर्षे व्यवस्थापनाचे काम केले. वार्धक्यामुळे त्यांचा मृत्यू झाला तेव्हाच त्यांचे कार्य संपले. ह्या दोन व्यक्तींच्या मृत्यूनंतर आश्रमाला योग्य व्यवस्थापक कित्येक दिवस मिळाला नाही. व्यवस्थापकाच्या जागेला सरकारी अनुदान नसल्यामुळे व आश्रमाची आर्थिक परिस्थिती नेहमीचीच तुटीची असल्यामुळे पगारी, सुयोग्य व्यवस्थापक नेमणे परवडणारे नव्हते. आश्रमातच राहणाऱ्या पुरुषनिवासींपैकी काहींनी ही जबाबदारी सांभाळली. कमलाताई जोपर्यंत कार्यक्षम होत्या, तोपर्यंत त्या स्वतःच भाजी बाजार, किरण, दुध वगैरे करत होत्या. फक्त हिशेबनीसाची गरज होती. १९८० नंतर मात्र व्यवस्थापकाची अडचण जास्त भासू लागली. १९८२-८३ मध्ये आरती भट ही तरुण समाजसेविका पंचवटी आश्रमाच्या कार्यासाठी आली. व्यवस्थापन, निवासातील अडचणींचे निवारण किंवा इतर कोणतेही कार्य करण्यास ती तत्पर असे. संस्थाचालक आणि आश्रमवासी सर्वांमध्येच ती प्रिय होती. साडेतीन वर्षे कार्य करून नंतर चांगली नोकरी मिळाल्यामुळे तिने आश्रमाचा निरोप घेतला.

पंचवटीसाठी मातृसेवा संघाची केंद्र-संस्था दरवर्षी तीस ते चाळीस हजार रुपये खर्च करते त्यामुळे सीताबर्डी सुतिकागृहावर खर्च करून कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीच्या मागण्या पुऱ्या करता येत नाहीत. इतर प्रगतिपर योजना सुरु करता येत नाहीत, अशी टीकाही कमलाताईच्या कानावर येई व त्या अस्वस्थ होत. कमलाताई आश्रमाकरिता देणग्या मिळवीत व त्यामधून बराचसा खर्च भागे; परंतु १९७२ पासून त्यांना झालेल्या अपघातामुळे त्या हिंडू शकल्या नाहीत. समाजकल्याण विभागातर्फे प्रथम काही वर्षे प्रत्येक महिलेसाठी रु. ४५ व पुरुषासाठी रु. ६० अनुदान मिळे. पुढे ही रक्कम वाढवून मिळाल्यामुळे सध्या रु. ९५ व रु. ९० असे अनुदान मिळते. परंतु वाढत्या महागाई मुळे खर्चही वाढत असतोच.

पंचवटीत वृद्धांची संख्या पहिल्या वर्षी दहा होती. पंचवटीत वर्षात कधी कधी ८५ व्यक्तीही राहत होत्या. ५० व्यक्तींचा खर्च दर महिन्याला गृहीत धरावा लागतो. सरकारी अनुदान अपुरे पडे. देणग्यांचा ओघही कमी झाला. प्रथम नानासाहेब मोहनी यांच्या प्रयत्नाने ओस्ट्रेलियातून मदत मिळाली. त्याचप्रमाणे रोमन कॅथलिक चर्च कडून धान्य व दुध पावडर रूपाने काही वर्षे मदत झाली. अनेकांनी आपल्या प्रिय व्यक्तींच्या स्मरणार्थ आश्रमवासीयांना भोजने दिली. पंचवटी वृद्धाश्रम ही तोट्यात चालणारी प्रवृत्ती आहे.

पण समाजाची गरज म्हणून ती चालवलीच पाहिजे अशी मातृसेवा संघाची धारणा आहे. पंचवटीत काही व्यक्ती पूर्ण पैसे देऊन राहतात. काही अर्धे पैसे देतात. पुष्कळ अनुदानित आहेत. त्या सर्वांना सारखेच व एकत्र भोजन मिळते. आपल्या पश्चात पंचवटीचे काय होईल ही काळजी कमलाताईना सदैव वाटे. मातृसेवा संघाच्या प्रत्येक आमसभेत, माहेर संमेलनात त्या पंचवटीच्या कार्याकडे अधिक लक्ष द्यावे म्हणून तळमळीने आवाहन करीत. संस्थेला प्रवृत्तीरुपी अनेक मोठ्या शाखा, उपशाखा फुटल्या होत्या. सगळीकडेच पुरेसं अनुदान मिळत नव्हतं. तुट येत होती. एकदा त्यांनी बाबा आमटे यांच्याकडून वचन घेतले की वृद्धाश्रम जर बंद झाला तर त्यामध्ये राहणाऱ्या वृद्धांची जबाबदारी ते स्वीकारतील. बाबांनीही आपल्या मानलेल्या मातेला लगेच आश्वासन दिले की चोवीस तासांच्या आत मी सर्वांना वरोड्याच्या आनंदवनात घेऊन जाईन

कमलाताईंच्या निधनानंतर मातृसेवा संघाच्या अध्यक्षा श्री. प्रमिलाताई दाणी, इंदुताई देशमुख, सौ. कमलाताई धाबे, यांनी पंचवटीची नवीन इमारत बांधलीच पाहिजे म्हणून कंबर कसली व त्या सर्व भगिनी गंभीरपणे विचार करू लागल्या. नवीन इमारतीसाठी जागा भरपूर होती. पैसाच हवा होता. हेल्पेज (इंडिया) ही आंतरराष्ट्रीय संस्था अशा लोकोपयोगी संस्थेला मदत करते ही बातमी होती. श्री. प्रमिलाताई दाणी ह्यांनी त्या संस्थेशी पत्रव्यवहार सुरु केला. मुंबईचे हेल्पेजचे अधिकारी श्री. सुब्रह्मण्यम् वृद्धाश्रम पाहण्यासाठी आले. परंतु वृद्धाश्रमात पाण्याची टंचाई होती. त्यामुळे ती जागा नवीन इमारतीला योग्य नाही, असा अभिप्राय पडला. म्हणून त्यावेळेस या कामाला त्यांची मंजुरी मिळाली नाही. आश्रमातील तिन्ही विहिरी उन्हाळ्यात आटत आणि आश्रमातील वृद्धांना सीताबर्डी, महाल मध्ये दोन महिने हालवावे लागे. महानगरपालिकेची पाण्याची लाईन आश्रमापर्यंत लवकर येणार नव्हती. परंतु यावर मात करून श्रीमती प्रमिलाताई दाणी, श्रीमती इंदुताई देशमुख ह्यांनी महानगरपालिकेचे महापौर, मंत्री व इतर अधिकाऱ्यांच्या मागे लागून आश्रमापर्यंत महानगरपालिकेचे पाणी आणण्यात यश मिळवले व दोन इंचाची पाईपलाईन घेतली. आश्रमात भरपूर पाणी उपलब्ध झाले. १९८३ मध्ये पुन्हा श्री. सुब्रह्मण्यम् व हेल्पेज इंडियाचे संचालक श्री. कोहली यांनी पाहणी केली आणि अडीच–तीन लाख रुपयाची मदत देण्याचे आश्वासन दिले.

१९८४ च्या प्रारंभी हेल्पेजकडून हिरवा झेंडा दाखवला गेला. ५ जुलै १९८४ रोजी केंद्रीय मंत्री वसंतराव साठे व त्यांच्या पत्नी जयश्रीताई ह्या उभयतांनी भूमिपूजन केले व हेल्पेज इंडियाचे संचालक श्री. दिलीपराय कोहली ह्यांनी नवीन इमारतीची कोनशिला बसवली. ह्या समारंभास श्री. बाबा आमटे आवर्जून उपस्थित होते. ह्याच समारंभात श्री. कोहली ह्यांनी मदतीचा पहिला हप्ता म्हणून १ लाखाचा धनादेश दिला. नकाशे तयार झाले. महानगरपालिका व सुधार विश्वस्त मंडळाकडून मान्यता मिळाली. वास्तुशास्त्रज्ञ श्री. निमगडे ह्यांनी स्थापत्याचे काम विनामूल्य करून देण्याची इच्छा प्रकट केली. बांधकामाचे अंदाजपत्रक १५ लाखांचे होते. वृद्धाश्रमाच्या नवीन बांधकामासाठी केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करून त्यात यश आले व दोन लाख रुपये मिळाले. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी उदार मनाने मुखमंत्री निधीतून पंचवीस हजाराची देणगी दिली. इमारत निधी उभारण्यास कार्यकारिणीतील सर्व कार्यकर्त्या देणगी गोळा करू लागल्या. १९८५ च्या ऑक्टोबरमध्ये नवीन कार्यकारी मंडळ निवडून आले. पंचवटीच्या कार्यास वेग आला. वर्ष दीड वर्षात साडेतीन–चार लाख रुपये पंचवटीच्या नवीन इमारतीसाठी गोळा झाले. ले. जनरल अनंतराव मोहनी हे १९८४ च्या सप्टेंबर मध्ये निवृत्त होऊन, त्यांनी मातृसेवा संघाला वाहून घेतले. त्यांच्याच प्रयत्नाने पंचवटीसाठी लष्कराने निकालात काढलेल्या मालातून एक जीप स्वस्तात मिळाली. ती पेट्रोलवर चालत होती; पण श्री. अनंतरावांनी किर्लोस्कर इंजिन्स कडून डिझेल मोटर देणगी म्हणून मिळवली. ती जीप आता पंचवटीचे वाहन म्हणून

अनुक्रमणिका

उपयोगात येते. अशा रीतीने पंचवटीच्या इमारतीचा खालचा मजला तयार होऊन त्यांचे उद्‌घाटन माननीय डॉ. करणसिंग ह्यांच्या हस्ते दि. ८ फेब्रुवारी १९८७ रोजी झाले. ज्येष्ठ नागरिक संस्थेचे उत्साही कार्यकर्ते व त्यांचे रोटरीयन मित्र यांच्यातर्फे ज्येष्ठ नागरिकांचे एक दिवसीय संमेलन पंचवटीत झाले व सर्व वृद्धांना संस्थेतर्फे भोजन देण्यात आले.

कमलाताईंच्या पुण्यतिथीचा दिवस पंचवटीत नेहमी पाळला जातो. त्या दिवशी कमलाताईंचे चाहते आपापले डबे घेऊन येतात व आश्रमवासीयांसमवेत भोजन करतात. कमलाताईंवर व्याख्याने होतात. त्यांच्याविषयीच्या आठवणी सांगितल्या जातात.

अनुक्रमणिका

## ‘मातृसेवा’ मासिक

‘मातृसेवा’ हे मासिक मातृसेवा संघाचे मुखपत्र. १९६६ च्या सुरुवातीला मातृसेवा संघाच्या व्यवस्थापक, शाखा चिटणीस, शाखाध्यक्ष व हितचिंतक कार्यकर्ते यांचे संमेलन ब्रम्हपुरी येथे भरले होते. कमलाताईंचे बंधू श्री. दाजी मोहनी हे या संमेलनास उपस्थित होते. त्यांनी असा विचार मांडला की संस्थेचा विस्तार खूपच झाला आहे. कार्यकर्त्यांनाही संस्थेच्या पूर्ण कार्याची माहिती असते असे नाही. एका शाखेतील समारंभ किंवा उपक्रम दुसऱ्या शाखेत नीटसे माहिती नसतात. संस्थेच्या निरनिराळ्या केंद्रांची आणि उपक्रमांची आपापसात माहिती व्हावी आणि ती जनतेपर्यंतही व्यवस्थितपणे पोहोचावी यासाठी मातृसेवा संघाचे एक मुखपत्र सुरु करावे. त्याद्वारे संस्थेच्या सर्व केंद्रांना एकमेकांशी संपर्क साधता येईल. दाजी मोहनींची ही कल्पना कमलाताई, वेणूताई आणि इतर सर्व कार्यकर्त्यांनी उचलून धरली. त्यांनी प्रमिलाताई दाणी यांना सांगितले, “कामास लागा. तुम्हीच संपादक व्हा. जबाबदारी घेऊन काय करायचे ते करा. पहिला अंक १५ ऑगस्ट रोजी निघाला पाहिजे.”

‘मातृसेवा’ची वाटचाल लिहिताना डॉ. दि. मो. थेरगावकर लिहितात,

“मासिक सुरु करावयाचे म्हणजे काय काय करायचे असते’ हे सुद्धा माहीत नसलेल्या श्री. प्रमिलाताईंनी हे आव्हान स्वीकारले. १९७१ मध्ये संघाचा सुवर्ण महोत्सव निश्चित झाला होता. त्याची पूर्वतयारी म्हणून संघात जन्मलेल्या मुलांची एक सुवर्ण महोत्सव समिती स्थापन झाली होती. त्याचे संचलन श्री. दाजी मोहनी व प्रा. इंदुमती देशमुख करीत होत्या. ब्रम्हपुरी अधिवेशनात मंजूर झालेली नियतकालिकाची कल्पना मूर्त स्वरुपात येण्याचे दृष्टीने संघाच्या ३१ जुलै १९६६ च्या आमसभेत नियतकालिकास मंजुरी मिळून मासिकाचे नाव ‘मातृसेवा’ असे ठरवून, आर्थिक व्यवस्था समाधानकारक होईपर्यंत चक्रमुद्रित स्वरुपात अंक काढावयाचा ठरले. मासिकाचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६६ रोजी प्रकाशित झाला.

मातृसेवा मासिकाचा पहिला छापील अंक दि. १० नोव्हेंबर १९६६ रोजी प्रकाशित झाला. त्या दिवशी धनत्रयोदशी होती.”

कमलाताईंच्या जीवनात धनत्रयोदशीचे महत्व होते त्याच दिवशी १९६१ मध्ये पंचवटी वृद्धाश्रमाची स्थापना आणि दिवाळी म्हणून मातृसेवा मासिकाचा पहिला मुद्रित अंक पद्मश्री कमलाताई व श्री वेणूताई ह्यांना, न्यायमूर्ती डॉ. भवानीशंकर नियोगी ह्यांच्या शुभ हस्ते समारंभपूर्वक अर्पण करण्यात आला.

“मासिक किंवा वृत्तपत्र काढणे म्हणजे त्यासाठी मुद्रण प्रबंधकांकडून मान्यता, जिल्हाधिकाऱ्यासमोर घोषित करणे हे कार्य श्री. प्र. दाणी ह्यांनी पत्रव्यवहार करून संबंधितांच्या भेटी घेऊन पूर्ण केले. त्यात बराच वेळ जरी गेला तरी दिवाळीचा प्रथम अंक प्रकाशित करण्यात यश आले. मासिक चालविणे म्हणजे हाती पैसा हवा. तो वर्गणीदार, जाहिरातदार ह्यांच्याकडूनच मिळतो. वार्षिक वर्गणी रु. ५/- होती. मासिकाचा आकार १/८ डेमी व पाने ३२. वर्गणीदार नोंदणी करण्याचे काम, संघाच्या आजीव सेविका श्रीमती कमल पांडे ह्यांनी पुढाकार घेऊन केले. संघातून यशस्वी रीतीने उत्तीर्ण झालेल्या परिचारिका, संघात जन्मलेली मुले-मुली ह्यांच्याशी संपर्क साधून ३१ मार्च १९६७ अखेर ४४० वर्गणीदार मासिकाच्या पटावर होते.” असे श्री. थेरगावकर यांनी लिहिले आहे.

अनुक्रमणिका

तीन वर्षानंतर मातृसेवा मासिकाचे एकूण उत्पन्न रु. १०१०० व खर्च रु. ९४९९ असा होता.

आठ वर्षांनतर मासिकासाठी स्वतंत्र कार्यालयाची निकड भासू लागली. व्यवस्थापक श्री. बापूराव ठाकरे यांच्या खोलीजवळ त्यांना सोयीचे होईल या दृष्टीने एका स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली. आठव्या वर्षात दोन विशेषांक प्रकाशित झाले. १) पंचवटी विशेषांक आणि २) माहेर संमेलन विशेषांक.

संधिवात इ. आजारांनी ग्रस्त असून प्रथमपासून बापूराव ठाकरे यांनी मातृसेवा व्यवस्थित होण्यासाठी अतोनात परिश्रम घेतले असे संबंधित सर्व व्यक्ती सांगतात. बापूरावांची कमलाताईंवर आत्यंतिक श्रद्धा होती. त्यांच्यासाठी त्यांचे सर्व परिश्रम चालले होते.

मासिकांचा हिशोब, वर्गणीदारांची सुव्यवस्थित यादी, जाहिरातींसाठी पत्रव्यवहार, लेखक, वर्गणीदारांशी संपर्क, साहित्याची जुळवाजुळव अशी सर्व कामे श्री. बापूराव ठाकरे मनःपूर्वक करत असत. यामुळे 'मातृसेवा' मासिकाला स्थैर्य लाभले. परंतु दि. ८ डिसेंबर १९७६ या दिवशी श्री. बापूराव ठाकरे यांचे निधन झाले. 'मातृसेवा' मासिकावर आपत्ती कोसळली. नंतर श्री. प्रभाकर मंगरुळकर, नारायणराव नाईक 'मातृसेवा'चे व्यवस्थापन पाहू लागले. त्यांनी वर्षभर काम रेटले. पुढे श्री. म. प्र. घाटे त्यांच्या जागी आले. नारायणराव नाईक यांची मदत होतीच. त्यांनी दोन वर्षे व्यवस्थापन पहिले. सतत बदलणाऱ्या व्यवस्थापनामुळे मासिकाची घडी जरी विस्कळीत झाली तरी ते चालू राहिले. संस्थेच्या सर्व व्यापांचा एकमेकांशी संपर्क ठेवणारे हे मुखपत्र उत्तम चालले पाहिजे असेच सर्वांना वाटत होते. १९७९ मधे श्री. पु. व्य. हलदुलकर यांनी 'मातृसेवा'ची जबाबदारी स्वीकारली आणि श्री. बापूराव ठाकरे यांच्या शिस्तीनेच कामाला लागले. जाहिरातदार, वर्गणीदार यांची संख्या पुरेशी नव्हती. 'मातृसेवा' आर्थिक बाजूने समर्थ करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. मातृसेवा संघाचे कार्यालय सतत आर्थिक मदत करीत होते. परंतु 'मातृसेवा' स्वयंपूर्ण होणे आवश्यक होते. कमलाताईंच्या निधनानंतर आर्थिक बाजूने स्वयंपूर्ण होऊ न शकलेले 'मातृसेवा' आता बंद करावे असा विचार चालकांच्या मनात येऊ लागला. परंतु मासिक बंद करण्यास कमलाताईंनी कधीच संमती दिली नसती हे लक्षात घेऊन आजीव वर्गणीदारांची अभिनव योजना सुरू केली गेली. वर्गणीदारांची तीन प्रकारे वर्गवारी केली. १) वयोगट ६० च्या आतील रु. १५१/- २) वयोगट ६० ते ७० पर्यंत रु. १०१. ३) वय ७० च्या वर रु. ५१/- नोंदणी करण्याचे काम सुरु केले. मातृसेवा संघाच्या शाखा व प्रवृत्ती यांनी 'मातृसेवा'चा एक एक अंक काढून आर्थिक बोजा कमी करावा अशी विनंतीवजा सूचना अध्यक्ष प्रमिलाताई दाणी यांनी केली. त्याप्रमाणे जबलपूर, वर्धा, हिंगणघाट, आर्वी या शाखांनी 'मातृसेवा'चे विशेषांक काढले. डॉ. कमलाताई जोशी यांनी मासिकाच्या नावे रु. १२, ०००/- ची कायम ठेव बॅंकेत ठेवली. त्या व्याजातून दैनंदिन खर्चास मदत होऊ लागली.

यानंतरच्या वाटचालीबद्दल श्री. दि. मो. थेरगावकर लिहितात, "१९८६-८७ सालापासून मातृसेवा संघाच्या कार्यकारिणीत महत्वाचे बदल झाले. अध्यक्ष डॉ. सत्यबाला तायल, चिटणीस सौ. चंपा वऱ्हाडपांडे या होत्या. 'मातृसेवा' मासिकाला सतत भासणारी आर्थिक टंचाई संघ भरून देत राहिला; पण नवीन कार्यमंडळ आल्यापासून केन्द्राने मासिकाची नित्य भासणारी तुट किती काळ सोसावी असा प्रश्न पुढे आला व मासिक संपादन करण्यात येणाऱ्या अडचणीतून मार्ग शोधण्याचा प्रयत्न झाला. मासिकाची स्थायी समिती व संपादन मंडळ पुनर्गठीत झाले. मासिकाला स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने हे कार्यकर्ते कामाला लागले. १९८७-८८ सालापासून पालक संस्थेकडे मदत मागावी लागली नाही. यात डॉ. कमलाताई जोशी

यांची मदत महत्वाची होती. त्यांनी 'होऊ कशी उतराई' हे माता बालकांना उपयोगी होईल असे पुस्तक लिहून त्याच्या विक्रीची सर्व रक्कम मातृसेवा मासिकाला दिली.

प्रत्येक प्रवृत्ती स्वतंत्रपणे आर्थिकदृष्ट्या सबळ राहिलीच पाहिजे व त्या दृष्टीने धोरण आखले पाहिजे असे कार्यकारीणीचे म्हणणे रास्त होते. दिवस बदलले आहेत याची जाणीव ठेवून मातृसेवा मासिकाने पावले उचलली व त्याचा परिणाम दिसू लागला. कार्याचे दृश्य स्वरूप म्हणजे १९८९-९० साली जमेच्या बाजूस रु. २७६३८/ हा आकडा असून खर्चाचा आकड रु. १८९१५/- आहे."

फेब्रुवारी १९९२ मध्ये मातृसेवा या मासिकाचा रौप्य महोत्सव साजरा झाला. या समारंभाला तेव्हाच महाराष्ट्राचे मुखमंत्री सुधाकरराव नाईक प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांच्या हस्ते रौप्य महोत्सव स्मरणिकेचे प्रकाशन झाले. या निमित्ताने त्यांनी मातृसेवा संघाची गेल्या सत्तर वर्षांची सेवा लक्षात घेऊन सात लाख रुपयांची देणगी दिली.

कोणत्याही मुखपत्राचा पट नेहमीच मर्यादित असतो. तसाच तो 'मातृसेवा'चाही आहे. मातृसेवा संघाच्या व्यक्ती आणि कार्य या भोवतीच अंक स्वाभाविकपणे फिरतो. परंतु मुखपत्राच्या मर्यादेत राहून विषयांची विविधता आणणे, अंकाची व्याप्ती वाढविणे जेवढे शक्य होते तेवढे 'मातृसेवा'ने केलेले आहे. संस्थेच्या निरनिराळ्या प्रवृत्तींवर मातृसेवाचे विशेषांक निघाले आहेत. त्यामुळे काही सामाजिक प्रश्नांवर आपोआपच लेखन केले गेले. 'पंचवटी' विशेषांकात बदलत्या जमान्यातले वृद्धांचे प्रश्न आलेले आहेत. 'नंदनवन' विशेषांकात शिक्षक, पालक, कार्यकर्ते सर्वांनी दुर्बलमनस्क मुलांच्या समस्येचा ऊहापोह केला. 'मातृसेवा' अंकात प्रथितयश लेखकांचे किंवा त्या त्या विषयांतील तज्ज्ञांचे लेख फारसे दिसत नाहीत. हे संपादकीय धोरण आहे की काही परिस्थितीमुळे ते शक्य झाले नाही हे कळण्यास मार्ग नाही. काहीही असो याचे काही फायदे, काही तोटे आहेत. फायदा हा म्हणता येईल की तज्ज्ञांचे, प्रथितयश साहित्यिकांचे लेखन इतरत्र वाचायला मिळू शकते. 'मातृसेवा'मध्ये सामाजिक प्रश्नांबाबत सामान्य व्यक्तीचे मन बोलके झाले आहे. उदा. 'नंदनवन' एप्रिल—मे १९७६ च्या अंकात 'कळी पुन्हा उमले' या नीला सराफ यांच्या लेखात मूल दुर्बलमनस्क का होते, त्याची लक्षणे कोणती, त्यांच्या प्रश्नांबाबत शिक्षक संशोधन कसे करू शकतात याची अनुभवकथन या स्वरुपात माहिती मिळते. १९८२ च्या वृध्द विशेषांकात पद्मा देशपांडे या एखादी वृद्ध स्त्री स्वतःसाठी किती उद्योग लावून घेऊ शकते आणि समाजाच्या उपयोगी कशी पडू शकते ते दाखवतात. याच अंकात ऐन तारुण्यात दुबळ्या प्रकृतीचे असलेले उदापूरकर पुढे कसे निरोगी आणि उत्साही झाले यासंबंधीचे त्यांचे आत्मलेखन सर्वसामान्य व्यक्तीला आशादायी करणारे आहे. तोटा असा की लेखातले विचार सखोल नाहीत. त्यांचा निरनिराळ्या दृष्टीकोनातून अभ्यास झालेला नाही. उदा. 'पंचवटी विशेषांकात वृद्धांची समस्या गंभीर आहे, केविलवाणी आहे, दोन पिढ्यांनी समझोता करायला हवा, एकत्र कुटुंबे नाहीशी झाल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे हेच मुद्दे पुनःपुन्हा सर्व लेखांतून घोळले आहेत. पण जे लोक आज वृद्धाश्रमात आहेत त्यांच्या मुलांच्या भूमिका समजावून घेण्यासाठी मुलांच्या मुलाखती घेऊन लेख तयार करणे, कोणत्या आर्थिक स्तरातले वृद्ध संस्थेत येतात, या समस्येला दारिद्र्य कितपत कारणीभूत आहे. इ. बाबींचा सखोल विचार 'मातृसेवा' अंकातील लेखांत आढळत नाही. निरनिराळ्या परिसंवादांची प्रतिवृत्ते 'मातृसेवा'ने सादर केली आहेत. यामुळे काही सामाजिक प्रश्न, त्यांची उत्तरे सोडविण्याचा प्रयत्न यांचे काही अंशी अभिलेखन (रेकॉर्ड) 'मातृसेवा'च्या अंकात जपले गेले आहे. परंतु 'मातृसेवा'च्या लेखकांनी समाजजागृतीच्या व्यापक प्रश्नाला हात घातलेला दिसत नाही. हे लेखक बऱ्याचदा संस्थेतच नोकरीला असल्यामुळेही त्यांच्या लेखनावर मर्यादा असू शकतील. एकंदर परिसंवादाचे

स्वतःच्या दृष्टीकोनातून मूल्यमापन ही मंडळी करीत नाहीत. उदा. ‘नंदनवन’ एप्रिल—मे १९७६ च्या विशेषांकात दुर्बलमनस्क मुलांच्या औद्योगिक समस्येविषयी परिसंवाद होता. त्या संदर्भात एकात्मीकृत शिक्षण हा वादग्रस्त विषय चर्चेला आला होता. परंतु त्याचा वृत्तान्त लिहिणाऱ्या लेखिकेने त्यावर स्वमत दिले नाही.

मुखपत्राच्या सर्व मर्यादा लक्षात घेता ‘मातृसेवा’ मासिक संस्थेच्या दृष्टीने महत्वाचे कार्य करीत आहे.

अनुक्रमणिका

## मुलांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय व विकलांग मुलांचे पुनर्वसन (प्रवृत्ती)

१९८१ हे आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष म्हणून जाहीर झाले होते. मातृसेवा संघाने या वर्षी अपंग वर्षाचा योग्य संदेश भोवताली पोहोचविणारा उपक्रम सुरु केला. ५ एप्रिल १९८१ या दिवशी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'मुलांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय' व 'विकलांग मुलांचे पुनर्वसन' या जोड प्रकल्पाची मातृसेवा संघात सुरुवात झाली.

नागपूरच्या शासकीय वैद्यक महाविद्यालाचे माजी अधिष्ठाता, अस्थिव्यंगोपचार शल्यचिकित्सक डॉ. विक्रम मारवा यांची प्रेरणा या मागे होती. शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता म्हणून काम करीत असतानाच डॉ. विक्रम मारवा यांचा मातृसेवा संघ या संस्थेशी संपर्क आलेला होता. संस्थेच्या कार्याचे महत्व ओळखून डॉ. मारवा यांनी संस्थेच्या काही उपक्रमांना रुग्णालयामधील जागा मिळवून देण्यात मदत केली होती. अस्थिव्यंगोपचार शल्यचिकित्सेचे दोन भाग आहेत, अस्थिभंग आणि अपंगत्व. यांपैकी अस्थिभंगावर इलाज करण्यात, शस्त्रक्रिया करण्यात रस घेणाऱ्या शल्यचिकित्सकांची संख्या खूप आहे. त्या मानाने अपंगत्वावर इलाज करण्यासाठी फारच थोडे शल्यचिकित्सक पुढे येतात. कारण अपंगत्वावर इलाज करताना चिकाटी खूप लागते आणि पैसा कमी मिळतो. या प्रकारची शस्त्रक्रिया सामान्यतः चार टप्प्यात होते. प्रत्येक टप्प्यानंतर काही दिवस जावे लागतात. डॉ. मारवा नोकरीत असताना विकलांग मुलांसाठी रुग्णालयामध्ये काही काम करीत होते. विकलांगावर इलाज करणाऱ्या रुग्णालयांची आपल्या समाजाला गरज आहे असे त्यांना जाणवले होते. दारिद्र्यापायी येणाऱ्या अज्ञानामुळे, निष्काळजीपणामुळे अनेकदा अपंगत्व येते. स्त्रियांची गर्भारपणी, बाळंतपणी आबाळ होते, त्यातून त्यांना पंगुत्व येऊ शकते आणि त्यांच्या संततीमध्येही दोष येऊ शकतो. डॉ. मारवा यांनी सेवानिवृत्तीनंतर अपंगांवरील इलाजाचेच कार्य हाती घेण्याचे योजले. त्यासाठी रुग्णालय हवे. रुग्णालयासाठी जागा हवी. डॉ. मारवा यांनी मातृसेवा संघाच्या अध्यक्ष श्रीमती प्रमिला दाणी यांच्याशी बोलणे केले. प्रमिलाबाईंनाही ही कल्पना पटली. मातृसेवा संघाच्या ध्येयधोरणाशी सुसंगत असा प्रकल्प होता. डॉ. मारवा यांच्यासारखा अनुभवी शल्यचिकित्सक मिळू शकत होता. मातृसेवा संघाने या प्रकल्पासाठी जागा दिली. डॉ. मारवा यांची कल्पना अशी की उपचार सुरु असेपर्यंत मूल संस्थेत राहावे. त्यानंतर ते नित्याच्या जीवन प्रवाहात मिसळून जावे. मातृसेवा संघाची कल्पना अशी की विकलांग मुलांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यातूनच 'मुलांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय' व 'विकलांग मुलांचे पुनर्वसन' या जोड प्रकल्पाची सुरुवात झाली.

दोन्ही प्रकल्प सहकार्याने व परस्परपूरक कार्य करतील हा आंतरिक समज दोन्ही प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरुवातीपासून रुजला. रुग्णालयाची भूमिका जनतेला परिचित असते. परंतु पुनर्वसन प्रकल्पाचे कार्य इतर सामान्य पुनर्वसन केंद्रांपेक्षा वेगळे आहे. या सेवेचे परिणाम तात्काळ दिसू शकतच नाहीत. ते दूरगामी असतात.

### प्रकल्पातील उपक्रमांचे उद्देश

१ अ. प्रत्येक मुलाला त्याच्या व्यक्तिगत क्षमतेनुसार व वयानुसार शारीरिक, मानसिक, शैक्षणिक व विकासात्मक पातळी जास्तीत जास्त वाढविण्यास संधी देणे.

अनुक्रमणिका

ब. समाजात आत्मविश्वासाने मिसळून आपले उचित स्थान मिळवण्यासाठी त्यांना व्यक्तिगत विकासात सहाय्य करणे. त्यांचे मनोबल, सामान्य ज्ञान व कौशल्य वाढवणे.

क. पुढील आयुष्यात उपलब्ध होऊ शकणाऱ्या व्यावसायिक व आर्थिक पुनर्वसन सेवा सवलतींचा अधिकतम लाभ करून घेण्यास मुलांना सर्वार्थाने प्रवृत्त करणे व सक्षम बनविणे.

२. मुलांना त्यांचे कुटुंब, परिचित वातावरण व अव्यंग मुलांचा सहवास या मूळ गोष्टी टिकवून ठेवण्यास मदत करणे. पालकांना पाल्याच्या पुनर्वसनाची जबाबदारी घेण्यास उचित मार्गदर्शन व सहाय्य करणे.

३. या कार्यातली आपली सामाजिक जबाबदारी जनतेला समजावून सांगणे.

४. 'समुदाय आरोग्य व विकास' या विभागाद्वारे समुदाय स्तरावर स्थानिक लोकांच्या सहभागाने आजार व अपंगत्व प्रतिबंध करणे हा उद्देश प्रकल्प सेवांचा अविभाज्य पैलू मानलेला आहे. या विभागांद्वारे मागास वस्त्यांची निवड करून तेथील समुदायातील लोकांना जाणीव जागृती, माहिती, अभिवृत्ती, कार्यप्रवृत्ती व कृती यात परिवर्तन आणण्यास उद्धृत करणारे उपक्रम स्थानिक लोक व प्रकल्प कार्यकर्ते मिळून राबवणे.

प्रकल्पाच्या आरंभी डॉ. विक्रम मारवा यांनी आपल्या प्रभावी संपर्काच्या बळावर महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी इ. च्या मदतीने रुग्णालयाकरिता देणग्या मिळवल्या. याच काळात डॉ. कमलाताई जोशी यांनी भरपूर देणग्या गोळा केल्या. डॉ. मारवा यांच्या मते काही शस्त्रक्रिया अस्थिव्यंगोपचार शल्यचिकित्सक आणि मज्ञातंतुशल्यचिकित्सक (न्यूरॉलोजिस्ट) यांनी मिळून कराव्या लागतात. या शस्त्रक्रिया गुंतागुंतीच्या असतात. ते आणखी म्हणतात, "मी कमी खर्चात सर्व काही करतो. सुंदर सुबक पाय पाश्चात्त्य देशात परवडतात. आपण लाकडी फळी, सायकलचे भाग यावर चालवू शकतो. सहकार्याने गेलो तर खर्च कमी होतो. बधिरीकरण करणाऱ्या शल्यचिकित्साला पुढची पायरी माहिती पाहिजे. म्हणजे खर्च कमी होतो. एस. एस.सी. नंतर दोन वर्षाचा Orthotist and Prostheist शिक्षणक्रम आहे. त्यामध्ये विकलांगांसाठी लागणारी साधने तयार करणे शिकवले जाते. शिकल्यावर नोकरी करणे किंवा अशी साधने तयार करण्याचा व्यवसाय करणे या सारखे काम करता येते. पोलिओचे कॅलिपर बनवायला एक आठवडा लागतो. डॉ. मारवा यांनी आपल्या प्रकल्पात काहीजणांना अशी साधने तयार करणे शिकवण्यास सुरुवात केली.

पुण्याच्या 'मनिषा शिक्षक प्रसारक मंडळा'च्या संस्थापक व कुशल संचालक श्रीमती पुष्पा बाऊसकर (सौ. माधुरी पाटील) यांच्या मार्गदर्शनाचा अनपेक्षित लाभ प्रकल्पाच्या प्रारंभी मिळाला. संमिश्र सेवांचे उद्दिष्ट असणाऱ्या या प्रकल्पाच्या व्यवस्थापनाचा उत्तम पाया त्यांनी घालून दिला. या कार्यात श्रीमती कमलाताई सारडे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवासदन अध्यापक विद्यालयाच्या शिक्षिका व विद्यार्थिनींचे सहकार्य मिळाले. त्या काळात श्रीमती सारडे यांच्या मदतीने निवड केलेल्या शिक्षिकांनी सतत अडीच वर्षे अल्प वेतनावर अत्यंत कष्टाने प्रामाणिक जिव्हाळ्याने प्रकल्पात काम केले. त्यांनी प्रत्येक मुलाकडे व्यक्तिगत लक्ष देऊन कामाचा पाया घातला. त्यामुळे प्रकल्पाच्या कामाची दिशा स्पष्ट होऊ लागली. सुरुवातीपासूनच औपचारिक शिक्षणासाठी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून प्रकल्पातील अपंग विद्यार्थ्यांना परीक्षांना बसण्याची परवानगी मिळाली. त्यासाठी श्री. मनोहर ओक व श्री. मल्हारराव काळे

यांचा पुढाकार होता. मुलांच्या पूर्व शिक्षणाच्या प्रमाणपत्रांची अट शिथिल करून मुलांना एकदम दोन इयत्तांचा अभ्यास करून परीक्षेला बसण्याची परवानगी १९८२ पासून महानगरपालिकेकडून मिळाली.

रुग्णालय शाळेचे अस्तित्व व विकलांग व्यक्तिमत्व विकास करण्याच्या कार्यामुळे हा प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरला. मुले जरी अपंग असली तरी त्यांच्या शारीरिक, मानसिक अशा सर्व शक्तींचा सर्वांगीण विकास होणे महत्वाचे असते. हा दृष्टीकोन ठेवूनच शस्त्रक्रियेसाठी, व्यायामासाठी येणाऱ्या बालकांसाठी प्रकल्पात रुग्णालय शाळेची व्यवस्था आहे. उपचारार्थ दीर्घ काळ वास्तव्य करणारी बालके हीच या शाळेचे विद्यार्थी असतात. त्यांच्या निवासाची आणि भोजनाचीही व्यवस्था प्रकल्पामार्फत केली जाते. बाहेरून शाळेत येणारे काही अपंग रुग्णालय- शाळेत येऊन शिक्षणाचा लाभ घेतात. प्रशिक्षित शिक्षकांकडून पूर्वप्राथमिक ते क्रमाक्रमाने १२ वी पर्यंतचे शिक्षण देण्याची सोय येथे करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाकडूनही 'रुग्णालय शाळे'ला कायमची मान्यता मिळाली आहे. १९८५ पासून केंद्रीय समाजकल्याण मंत्रालयाकडूनही अनुदान मिळते आहे. उपचारार्थ प्रविष्ट होणाऱ्या काही बालकांनी शाळेचे तोंडही पाहिलेले नसते किंवा घरीही त्यांच्या पालकांचे त्यांच्या शिक्षणाकडे आवश्यक ते लक्ष नसते. उपचारार्थ प्रविष्ट झालेल्या बालकाचे वय व प्रवेश घेताना असणारा त्याचा शैक्षणिक स्तर बहुधा विसंगतच असतात. या दृष्टीने वय, शैक्षणिक स्तर, त्याची शिक्षणाविषयीची आवड व बौद्धिक आवाका विचारात घेऊन बालकास कोणत्या वर्गात बसविणे योग्य ठरेल, याबाबत मूल्यमापन करण्यात येते. बरेचदा बारा वर्षाच्या बालकाला लेखन, वाचनही येत नसते; असे आढळल्यास किंवा वयानुसार शिक्षण झाले नसल्यास त्याच्याकडे व्यक्तिगत लक्ष देऊन शिक्षक अभ्यास करून घेतात व बौद्धिक पात्रतेनुसार त्याला विशिष्ट वर्गात बसविण्यात येते. मग पुढील काळात त्या त्या विशिष्ट वर्गाचा अभ्यासक्रम त्याला शिकवला जातो.

साधारणपणे ६ ते ८ वर्षाच्या बालकांना पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गात प्रवेश दिला जातो. त्यांच्यावर अधिक मेहनत घेऊन त्या वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण शिकवून त्या वर्गाच्या परीक्षेस बसविण्यात येते.

इतर सामान्य शाळेतील अभ्यासक्रमच रुग्णालय शाळेत राबविला जात असला तरी अपंग बालकांची आवड, ग्रहणशक्ती, अभ्यास करण्याचा आवाका यांनुसार विशिष्ट वर्गातील अभ्यासक्रम पूर्ण करणे वा न करणे अवलंबून असते.

उपचारार्थ कक्षात असणाऱ्या मुलांचे वरीलप्रमाणे मूल्यमापन केल्यानंतर शाळेतील वेगवेगळ्या वर्गात त्यांची नोंद केली जाते. हिंडू फिरू शकणाऱ्यांना विशेषतः ४ थी ते ८ वीतील मुलांना केंद्रात किंवा कक्षात एकत्र जमवून शिकविले जाते. हात पाय किंवा पाठीच्या कण्याचे ट्रॅक्शन असल्यास अंथरुणावरून हालता येत नाही. अशा बालकांना अंथरुणाजवळ बसून शिकवण्याचे काम शिक्षक करतात. अशा मुलांची शिकण्याची मनःस्थिती असेल तर शिक्षिका त्यांच्याकरिता लिहिण्या-वाचण्याचे काम करून अभ्यास मागे पडू नये म्हणून प्रयत्न करतात. त्यांना गोष्टी सांगून, गाणी ऐकवून, चित्रे काढण्यास देऊन किंवा हस्तकलेची कामे देऊन त्यांचे मन गुंतविले जाते. दुःख वेदना सुसह्य करण्याचा यत्न होतो व तो बहुतांशी सफल होतो. रुग्णालय शाळेचे स्वरूप सामान्य शाळेपेक्षा फार वेगळे असते. इथे बालक वर्षभर शिकेलच असे नाही. शाळेचे काम सकाळी ८-३० ते संध्याकाळी ६-०० पर्यंत चालू असते. अभ्यासाप्रमाणे दैनंदिन व्यायामही बालकांना द्यावा लागतो. वेळापत्रक व काटेकोरपणे ठरावीक तासिका इथे शक्य नाही. आपापला वर्ग व विषयानुसार शिक्षिका वेगवेगळ्या वेळेला येऊन शिकवतात. काहींचे काम सकाळी ८-३० ते १-०० पर्यंत असते तर काही दुपारी १२ ते ६-०० पर्यंत काम करतात. येथे तासिकांचे बंधन काटेकोरपणे

पाळले जात नाही तर उपस्थिती, बालकांची संख्या व व्यायामासाठी वेळ विचारात घेऊन दैनिक वेळापत्रकात बदल करावा लागतो. खूप कडक शिस्त ठेवता येत नाही. मुलांची प्रकृती व मनःस्थिती यांचे विशेष भान ठेऊनच जरुरीप्रमाणे जरब तर कधी क्षमा, स्नेह यांचा उपयोग करावा लागतो.

इतर शाळांप्रमाणे मोठमोठे वर्ग, कक्ष, फर्निचर व वर्गातील मुलांची संख्या येथे असू शकत नाही. आधीचे शिक्षण व बौद्धिक स्तर विचारता घेऊन विशिष्ट वर्गात प्रवेश दिल्यावर एकेका वर्गात कमीत कमी चार पासून जास्तीत जास्त दहापर्यंत बालके असतात. दहा बालकास एक याप्रमाणे येथे प्रशिक्षित शिक्षिका नेमल्या जातात. बिछान्यावरून हालता ना येणाऱ्यांची गोष्ट व गाण्यांनी करमणूक केली जाते. त्यातूनच औपचारिक शिक्षण दिले जाते. कॅरम व इतर बैठे खेळ मुले खेळतात.काही बाहेरचे कार्यकर्ते भजने वगैरे शिकवतात. राख्या बनविणे, भेटकार्ड तयार करणे, वायरच्या पिशव्या तयार करणे, मण्यांची तोरणे करणे, कागदाचे कातरकाम, क्रेपची फुले, शोभेच्या वस्तू तयार करणे मुले शिकतात आणि शिकता शिकताच घडत असतात.

या प्रकल्पाचे तिसऱ्याही प्रकारचे कार्य आहे, ते मातृसेवा संघाच्या आवारापासून खूपच दूर आहे व ते नागपूरमधील मागास वस्तीमध्ये चालते. हे कार्य अधिक मुलभूत आहे. मूल अपंग/विकलांग होण्याची वेळच येऊ नये यासाठी काय केले पाहिजे याबद्दलची जागरूकता निर्माण करणे अशा स्वरूपाचे हे कार्य आहे. या कार्यासाठी प्रकल्प सुरु झाल्यावर काही वर्षातच, शासकीय, निमशासकीय संस्था व कार्यालये यांचा सहभाग मिळू शकला. इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, मेयो हॉस्पिटल, डागा मेमोरियल हॉस्पिटल, शासकीय वैद्यक महाविद्यालय, नागपूर महापालिका यांनी प्रकल्पाच्या या कार्यास सहकार्य दिले. दारिद्र्यातून उद्भवणारे अनारोग्य आणि हेळसांड यामुळे बहुतेक मुले विकलांग झालेली आढळतात. वेळीच काळजी न घेतल्यास दुखण्यामुळे कोणते गंभीर परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात याची जाणीव नसते. म्हणून हलगर्जीपणा होतो. या प्रकारची माहिती देण्यासाठी मागास वस्तीत अधूनमधून आरोग्य शिक्षण व आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातात. त्यातून प्रतिबंधक उपाय आणि उपचारांबद्दल मार्गदर्शन केले जाते. रुग्णांना औषध देणे, जरूर त्या रुग्णांना रुग्णालयात पाठविणे, रुग्णालयामधील योग्य त्या विभागांकडून रुग्णांना मदत मिळवून देणे या प्रकारचे सहाय्य प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी केले. वस्तीमधील निरक्षर महिलांना याबद्दल जागरूक करण्याचा कार्यकर्त्यांचा विशेषकरून प्रयत्न असतो. आरोग्य आणि सर्वांगीण जीवन विकास यांचे नाते समजावून सांगणे हे काम जिकिरीचे आहे. पण कार्यकर्ते सातत्याने प्रयत्न करत असतात.

अनुक्रमणिका

## अखेरचे पर्व

कमलाताईंच्या अखेरच्या पर्वात मातृसेवा संघाला, कमलाताईंना, इतरही कार्यकर्त्यांना अनेक मानसन्मान, पुरस्कार मिळाले. कमलाताईंचे शरीर आता कुरकूर करू लागले होते. बारीकसारीक दुखणी एकसारखी सुरु होती. एकदा अपेंडिक्सची शस्त्रक्रिया झाली. अतिसार, पोटात मुरडा, उलट्या, जुलाब काही ना काही चालू असे. त्या औषध घेणे फार टाळत. त्यातल्या त्यात आयुर्वेद आणि होमिओपॅथीवर त्यांचा विश्वास होता.

१९७२ मध्ये त्यांच्या पायाचे हाड मोडले. शस्त्रक्रिया करावी लागली. जवळजवळ आठनऊ महिने त्यांना बर्डीवर राहावे लागले. बऱ्या झाल्यानंतर त्या पुन्हा पंचवटीवर आल्या. काम रेटू लागल्या. परंतु आता थकवा चांगलाच जाणवू लागला होता.

अनेक कार्यकर्त्यांच्या जीवनात येणारा संघर्ष कमलाताईंच्या आयुष्यातही आला. एका बाजूला मोहनी कुटुंबातील भावंडे आणि दुसऱ्या बाजूला समर्पित कार्यकर्ते. मोहनी कुटुंबातील पुढची पिढी सेवानिवृत्तीनंतर मातृसेवा संघात कार्य करू लागली होती. एवढ्या मोठ्या संस्थेची अधिकारसूत्रे कोणाकडे जाणार? या वेळी कमलाताई कुटुंबाच्या बाजूला झुकल्या असे ऐकण्यात येते. आपल्या कुटुंबाची मनोवृत्ती सेवाभावी आहे, म्हणून हा अधिकार प्राप्त होतो असे त्यांना वाटत होते. सत्‌शील आणि सेवाभावी कुटुंब असाच मोहनी कुटुंबाचा नागपूरमधील लौकिक होता. (आणि आजही आहे). तथापि कमलाताईंच्या हयातीत हा प्रश्न तीव्र झाला नाही.

१९७५ मध्ये आजारी जयप्रकाशना भेटण्यासाठी त्या नागपूरहून मुंबईला आल्या. स्वतः अपंग झालेल्या. कुबड्या घेतलेल्या. दादर स्टेशनवरून त्यांनी शरयू धोत्रे यांच्याशी संपर्क साधला. शरयूताईनी त्यांना स्थानिक गाडीच्या पहिल्या वर्गाने चर्चगेटपर्यंत नेले. पुढे टॅक्सी. कमलाताईंना पाहताच जयप्रकाशांचे डोळे भरून आले. शरयू धोत्रे लिहितात, “ते म्हणाले ‘आप क्यों इतनी तकलीफमे मिळणे आयी?’ यमूताईनी त्यांच्या बिछान्यावर टेकून, त्यांच्या तोंडावरून, डोक्यावरून असीम प्रेमाने थबथबलेला आपला हात फिरवायला सुरुवात केली. जे. पीं. चा चेहरा असा काही फुललेला दिसला की ते दृश्य अजून माझ्यासमोर आहे.”

१९७९ साली कमलाताई पुन्हा पडल्या. पुन्हा त्याच हाडाला इजा झाली. चालणे जवळजवळ बंद पडले. १९८० साली कमलाताईंना जानकीदेवी बजाज पुरस्कार मिळाला. तो घेण्यासाठी कमलाताईंनी दिल्लीला यावे अशी जमनालाल बजाज यांच्या कन्या मदालसाबेन यांची फार इच्छा होती. कमलाताईंची तब्येत ढासळलेली होती. चालणे मुश्कील झाले होते. तरी मदालसाबेन कमलाताईंना भेटायला ‘पंचवटी’मधे आल्या. या संदर्भात कमल वैद्य लिहितात, “मदालसाबेननी कमलाताईंना पुष्कळ आग्रह केला. तेव्हा त्या म्हणाल्या कोण कोण येणार आहेत? बेन म्हणाल्या, ‘अध्यक्ष, सेक्रेटरी अन् आपण’ हे ऐकून कमलाताई नाराजीच्या स्वरात म्हणाल्या, ‘माझ्या वृद्धाश्रमातील स्त्रियांना नाही नेणार? बाकीच्या तर केव्हाही दिल्ली पाहू शकतात. पण यांना दिल्ली कोण दाखवणार?’ वृद्धाश्रमातील दोन भगिनींना घेण्याचे बेनने मान्य केले तेव्हाच त्या स्त्रियांसह कमलाताई दिल्लीला गेल्या.”

राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार घेण्यासाठी सर्व व्यवस्था होऊन त्या दिल्लीला पोहोचल्या. पंतप्रधान इंदिरा गांधींनी त्यांना त्यांच्या निवासस्थानी भेटीस बोलावले होते. तिकडेही त्या जाऊन आल्या. परत

नागपूरला आल्या. नंतर मात्र कमलाताईंची प्रकृती फारच ढासळत गेली. पंचवटीहून त्यांना बर्डी सूतिकागृहात कृष्णाताई भावे यांच्या खोलीत आणले गेले. दोघींचा एकमेकींवर गाढ विश्वास, प्रेम; त्यांनी कमलाताईंची सेवा अखेरपर्यंत जिव्हाळ्याने केली. त्यांचा अंत जवळ आल्याचे आता सगळ्यांनाच जाणवत होते. अखेरच्या दिवसांत त्या बोलत नसत. पण त्यांना बोललेले समजत असे. खूप लोक भेटून जात होते. जवळच्या कार्यकर्त्यांना वाटत होते त्यांना पंचवटीची चिंता लागली आहे. सत्यबाला तायल आणि डॉ. प्रमिलाताई असोलकर यांनी कमलाताईना सांगितले की, पंचवटीचे काम बंद पडू देणार नाही. हे शब्द ऐकल्यावर कमलाताईंनी स्मित करून समाधान व्यक्त केले. कमलाताईंचा क्षीण चेहरा क्षणभर समाधानाने उजळला.

दि. १५ नोव्हेंबर १९८१ रोजी कमलाताईंची प्राणज्योत विझून गेली.

निधनानंतर कमलाताईंच्या देहाला नेहमीच्या घाटावर अग्नी न देता गावाबाहेर असलेल्या 'पंचवटी आश्रमा'च्या प्रशस्त जागेत त्यांचे दहन व्हावे अशी कल्पना पुढे आली व नानासाहेब मोहनी, केशवराव मोहनी ह्यांनी संमती दिल्यावर जिल्हाधिकारी व पोलिस आयुक्त ह्यांची परवानगी काढून दुसऱ्या दिवशी श्रीमती कमलाताईंच्या पार्थिव देहावर त्यांच्या 'राधाकृष्ण' कुटी समोरच्या जागेवर अग्निसंस्कार करण्यात आला. नागपूरमधील खूप लोकांचा समुदाय जमलेला होता. कमलाताईंना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यानंतर दरवर्षी कमलाताईंच्या पुण्यतिथीला 'पंचवटी'त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कमलाताईंवर व्याख्याने होतात, आठवणी सांगितल्या जातात. त्या दिवशी कमलाताईंचे चाहते आपापले डबे घेऊन आश्रमवासीयांसोबत भोजन करण्यासाठी येतात.

## कमलाताईंनंतर

कमलाताई होस्पेट यांच्या हयातीत मातृसेवा संघाच्या घटनेप्रमाणे दर तीन वर्षांनी व्यवस्थापन समिती सर्वानुमते निवडली जात असे. गुप्त मतदानाचे नियमच अस्तित्वात नव्हते. या परंपरेचा मान राखून १९८५ मध्ये मावळत्या व्यवस्थापन समितीच्या नावाचे तज्ज्ञमंडळ (पॅनेल), अधिमंडळासमोर (जनरल बॉडी) ठेवले. अधिमंडळाने हे तज्ज्ञमंडळ जसेच्या तसे संमत केले. त्यानुसार नवीन व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सत्यबाला तायल झाल्या आणि चंपा वऱ्हाडपांडे कार्यवाह झाल्या. याखेरीज समितीचे १७ सभासद होते. ही व्यवस्थापन समिती तीन वर्षांसाठी होती.

१९८८ मध्ये अधिमंडळाच्या एका गटाने गुप्त मतदानाच्या निवडणुकीची मागणी केली. अधिमंडळाची वार्षिक सभा ४/५ दिवसांवर आलेली असताना ही मागणी पुढे आली. या मागणीची कार्यवाही शक्यच नव्हती. कारण त्यासाठी नियमच अस्तित्वात नव्हते. घटनेनुसार मातृसेवा संघाच्या ज्येष्ठांची समिती तयार केली गेली आणि समितीने कार्यकारी समिती नेमली. डॉ. श्रीमती सत्यबाला तायल पुन्हा अध्यक्ष झाल्या. डॉ. श्री. जोशी- उपाध्यक्ष. श्रीमती नलिनी दाणी- कार्यवाह. श्रीमती वझलवार- खजिनदार. श्रीमती सिंधुताई वरखोडकर आणि श्रीमती धाबे सहकार्यवाह. या नव्या चमूने जानेवारी १९९० पर्यंत कार्य केले.

श्रीमती चंपा वऱ्हाडपांडे यांनी, ज्या पद्धतीने व्यवस्थापन समिती निवडली गेली त्या पद्धतीविरुद्ध धर्मादाय आयुक्तांच्या न्यायालयात अर्ज केला. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार निवडणुकीची नवीन

नियमावली तयार केली गेली आणि जुलै १९९० मध्ये अधिमंडळाच्या खास बैठकीमध्ये ती मंजूर करून घेण्यात आली. त्यानंतर १५ सप्टेंबर १९९० या दिवशी, वार्षिक सर्वसाधारण सभेआधी एक दिवस निवडणूक घेण्यात आली. डॉ. श्रीमती सत्यबाला तायल अध्यक्ष म्हणून पुन्हा निवडून आल्या. श्रीमती असोलकर उपाध्यक्ष, नलिनीताई दाणी- कार्यवाह, कुसुमताई वांकर- खजिनदार, आणि सर्व श्रीमती गंधे, बोधनकर, घाटे, भावे, क्षीरसागर, पाठक, गोवर्धन, कानफडे, देशकर, गवई, पराशर सभासद म्हणून निवडून आल्या. नव्या नियमानुसार, अस्तित्वात आलेली व्यवस्थापन समिती नव्या उत्साहाने काम करू लागली.

**मातृसेवा संघ : कमलाताई-सत्यबालाबाई**

या दोघींनी, शेकडो कार्यकर्त्यांच्या सहकार्याने मातृसेवा संघाला घडवले. दोघींची कौटुंबिक पार्श्वभूमी भिन्न व्यक्तिमत्वाची. जडणघडण निराळी.

कमलाताई मध्यमवर्गीय गरीब कुटुंबातल्या होत्या. अल्पशिक्षण, बालविवाह, सासुरवास, वैधव्य या पारंपारिक मनस्तापाच्या अनुभवातून गेल्या होत्या. मातृसेवा संघाची स्थापना करण्यापूर्वी केवळ सासर-माहेरच्या कौटुंबिक परिघातच वावरत होत्या. अशा स्त्रीने काही जनसेवेच्या ध्येयाने प्रेरित व्हावे, जिद्दीने परिश्रमाने आपले ध्येय प्रत्यक्षात उतरवावे, भोवताली निस्पृह, निष्ठावंत माणसे जमवावीत हे खरोखर त्यांचे फार मोठे श्रेय आहे. सार्वजनिक कार्यात शिरल्यावरही त्यांनी घराचा परिसर सोडला नाही. शेवटपर्यंत कुटुंबाचे धागे त्यांच्याभोवती घट्ट होते. तरीही त्या ध्येयजीवनाशी समरस झालेल्या होत्या. आपण संस्थेसाठी त्याग केला. इतरांकडून तशी अपेक्षा केली. त्यांना माणसांचा लोभ होता. संस्थेच्या संपर्कात येणाऱ्या माणसांपर्यंत, दुःखाने गांजलेल्या माणसांपर्यंत त्या व्यक्तीशः पोहोचत होत्या. त्या शेवटपर्यंत स्वतःच्या श्रेयावर देणग्या मिळवत होत्या. निधी जमविण्याचा तोच मार्ग त्यांना सगळ्यात जवळचा आणि विश्वासाचा वाटत होता. चिकाटी, परिश्रम, जनसंपर्क या मार्गाने त्यांचे कार्य जीवनभर चालू होते.

सत्यबालाताई गर्भश्रीमंत कुटुंबातल्या होत्या. उच्च विद्याविभूषित होत्या. पारंपारिक घरातल्या मुलींच्या प्रश्नाला त्यांना सामोरे जावेच लागले नाही. घरात समाजकार्याची परंपरा होती. त्या सहजपणे कौटुंबिक परिघाच्या बाहेर पडून सार्वजनिक कार्यात सहभागी होऊ शकल्या. स्वेच्छेने अविवाहित राहिल्या. मातृसेवा संघात दाखल होण्यापूर्वी त्यांना समाजकार्याच्या अनुभवाची, स्वकर्तुत्वाची केवढी तरी पार्श्वभूमी होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, त्यांनी स्वतःला या संस्थेत मर्यादित कसे केले याचेच आश्चर्य वाटते. त्या घरापासून खूप दूर निघून आल्या. त्यांच्याभोवतीचे कौटुंबिक धागे ढिले होत होत हळूहळू गळून गेलेले दिसतात. त्यांनी संस्थेची आर्थिक बाजू मजबूत करत, काळाच्या गरजेनुसार नवे प्रकल्प उभे केले. धनसंचयासाठी शासकीय योजना, परदेशी अनुदाने यांचा विचार केला. सतत आर्थिक विचार, सर्वंकष चौफेर नजर असा त्यांच्या कार्याचा मार्ग दिसतो.

दोघींचीही कार्याची तळमळ, त्यासाठी झोकून देण्याची वृत्ती, आंतरिक सामर्थ्य तुल्यबळ. कमलाताईंनी आत्मबळाच्या ताकदीने जनसेवेच्या व्रताची पायाभरणी केली. त्यांनी त्यागाच्या पायावर उभारणी केलेल्या संस्थेला सत्यबालाताईंनी व्यवहारी जोड दिली. काळाचे भान ठेवून संस्था अनेक प्रकारे विस्तारित केली.

याचे फलित म्हणूनच मातृसेवा संघाचा पंचाहत्तरावा वाढदिवस समारंभाने उत्साहात साजरा झाला.

**आज**

मातृसेवा संघ या संस्थेला आता पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. हीरक महोत्सव थाटाने साजरा झाला. भोवतालच्या जगातील नीतीमुल्यांचे स्थित्यंतर होत आहे. आर्थिक परिस्थिती कुटुंबाच्या, समाजाच्या रचनेत बदल घडवत आहे. याचा परिणाम कोणत्याही संस्थेवर होणार तसा तो मातृसेवा संघावरही होत आहे. संस्थेच्या आरंभ काळातील वृत्ती आता उरलेली नाही, असे सर्वजण सांगतात. हे फार स्वाभाविक आहे. आता विनावेतन कार्य करणारे कार्यकर्ते मिळू शकत नाहीत. चांगली गोष्ट म्हणजे व्यवस्थापनाचा त्याबद्दल अट्टाहासही नाही. कामगार संघटना अधिक वेतनाची, अधिक सुखसोयींची मागणी करीत आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या मुलींची अनेक गैरसोयींबद्दल तक्रार आहे. शासकीय योजनेत नोकरी करणाऱ्यांच्या मनात योजना बंद झाली तर पुढे काय याची धास्ती सतत आहे. योजना बंद झाली तर नोकरदार माणसे न्यायालयात जातील, मातृसेवा संघाकडून भविष्यनिर्वाह निधी इ. मागतील हा प्रश्न व्यवस्थापनाला भेडसावू लागला आहे.

कोणत्याही संस्थेचा व्याप वाढत जातो तसतसे हे सर्व घडत जाते. कारण नित्याचेच आहे. समाजाच्या गरजा प्रचंड. स्वयंसेवी संस्थांची आर्थिक ताकद मर्यादित. मनुष्यबळ अपुरे. शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ आणि आर्थिक मदत याची योग्य वितरण व्यवस्था नाही.

मातृसेवा संघाच्या शाखाशाखांमध्ये आपसात मतभेद आहेत. तरीही निरनिराळ्या शाखांचे रौप्य, सुवर्ण महोत्सव साजरे होत असताना सर्व शाखांच्या संबंधित व्यक्ती, कार्यकर्ते, स्नेहसंमेलनासाठी उत्साहाने गोळा होतात. आपल्या संस्थेचे कार्य बंद करावे असे कोणालाही वाटत नाही. शेकडो गरजू स्त्रियांना, मुलाबाळांना संस्थेच्या छपराचा आधार वाटतो. काळाशी सुसंगत असे नवे प्रकल्प उभे करण्याकडे व्यवस्थापनाचा कल आहे. दुर्बलमनस्क मुलांच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण महाविद्यालय सुरु करण्याची इच्छा आहे. परीचर्येचा समग्र अभ्यासक्रम सुरु करण्याची देखील गरज आहे. जुन्या प्रवृत्तींसाठी संगणकासारख्या अनेक नव्या सुविधा हव्या आहेत.

आपले अंतर्गत कलह निभावत, नोकरशाहीच्या मर्यादांसह नव्या काळाचे आव्हान स्वीकारत संस्थेची पुढची वाटचाल सुरु आहे.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट चरित्रपट
## कमलाताई होस्पेट

- जन्म- २३ मे १८९६. नाव 'यमू.'
- वडील- कृष्णाजी तात्या मोहनी.
- विवाह- १९०८ मध्ये गुरुराव होस्पेट यांच्याशी.
- विवाहानंतरचे नाव 'कमला.'
- १९११ मध्ये धनत्रयोदशीच्या दिवशी पती गुरुराव होस्पेट यांचे निधन.
- वैधव्यानंतर महर्षी कर्वे यांच्या संस्थेत हिंगणे येथे अल्पकाळ वास्तव्य.
- १९८१ मध्ये नागपूरच्या डफरीन रुग्णालयात परिचर्या अभ्यासक्रमासाठी दाखल.
- ८ मे १९२१ (अक्षय तृतीया) या दिवशी 'सीताबर्डी सुतिकागृह' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवून कार्यास प्रारंभ.
- १९५२ पासून भारतभर फिरण्यासाठी पहिल्या वर्गाचा दोन जणांचा पास.
- १९६१ रेडक्रॉस नलवा मेडल मिळाले.
- १९६१ मध्ये पद्मश्री किताब.
- १९७५ मुंबईत जयप्रकाशांच्या आजारपणात भेट.
- १९८० जानकीदेवी बजाज पुरस्कार.
- निधन- १५ नोव्हेंबर १९८१.

## सत्यबाला तायल

- जन्म- ७ ओक्टोंबर १९२४.
- वडील लाला जयदेव आणि आजोबा लाला चंदुलाल हे बडे जमीनदार आणि आर्यसमाजी कार्यकर्ते
- १९४३-४४ बी. ए. बीटी उत्तीर्ण (पंजाब विश्विद्यालय)
- १९४४ मध्ये निर्वासित पुनर्वसन कार्यास सुरुवात.
- १९५२ ते १९५५ भूदान चळवळीत व्यग्र.
- १९५६ मातृसेवा संघात प्रवेश.
- १९५७ मध्ये भूदान चळवळीतील कार्याबद्दल पंजाब शासनाचे मानपत्र.
- १९६२ समाजकार्य महाविद्यालयाची स्थापना.
- १९६४-६५ समाजशास्त्र विषयात एम्.ए. उत्तीर्ण (नागपूर विश्वविद्यालय).
- १९६२ ते १९८४ समाजकार्य महाविद्यालयाच्या प्राचार्य.
- १९७३ कालिका व्हॅली होम्स पुरस्कार.
- १९८५ ते १९९६ मातृसेवा संघाच्या अध्यक्ष
- १९८८ आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मानपत्र.
- १९९० सावित्रीबाई फुले पुरस्कार.
- १९९४ मध्ये व्यसनमुक्ती कार्यासाठी नागपूर महानगरपालिकेकडून पारितोषिक.
- १९९५ वृद्ध नागरिक कार्यासाठी इंडियन मर्चंट्स चेंबर पुरस्कार
- १९९५ महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेशनतर्फे पुरस्कार.

अनुक्रमणिका

[अनुक्रमणिका](#)

## मातृसेवा संघ (कार्यपट)

- ८ मे ९१२१ (अक्षय तृतीय) या दिवशी नागपूर येथे ‘सीताबर्डी सुतिकागृह’ या नावाने संस्थेची स्थापना.
- पहिल्या वर्षी दिल्ली येथील लेडी चेम्सफर्ड ऑल इंडिया मॅटर्निटी ॲन्ड चाइल्ड वेल्फेअरच्या वार्षिक सभेत ‘अनुकरणीय संस्था’ म्हणून उल्लेख.
- १९२४ मध्ये रेडक्रॉस सोसायटी, नगरपालिका समिती यांनी आर्थिक सहाय्य/सवलती देऊ केल्या. श्री. बापूराव पातुरकर यांनी मोटरगाडी दिली.
- १३ मार्च १९२४ रोजी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वये ही संस्था परोपकारी संस्था म्हणून नोंदवली.
- १९२६ पासून सी. पी. मेडिकल एक्झॅमिनेशन बोर्डाच्या परीक्षेस विद्यार्थिनी पाठविण्यास सुरुवात.
- २७ ऑक्टोंबर १९२८ नगरपालिका समितीकडून आर्थिक सहाय्य संमत.
- १९२८ मध्ये लक्ष्मणराव देशमुख यांनी इमारत निधीस देणगी दिली.
- १९२८ मध्ये विकृतीचिकित्सा शाखा (पॅथॉलॉजिकल युनिट) सुरु.
- १ मे १९२९ संस्थेची जागा बदलली.
- २ ऑक्टोंबर१९३३ कस्तुरबा गांधींची संस्थेला भेट.
- १९५४ मध्ये संस्थेची नवी घटना तयार होऊन नामांतर ‘मातृसेवा संघ.’
- १९५६ पं.नेहरूंची संस्थेला भेट.
- १९६६’क्ष’ किरण विभागाची सुरुवात.
- १९६७ रक्तपेढीचा आरंभ.
- १९७२ इंदिरा गांधींची संस्थेला भेट.
- १९७३ अपूर्णकाल- अर्भक विभाग सुरु.

**संस्थेच्या विविध शाखांचा प्रारंभ :**

| | शाखा | स्थापना दिवस |
|---|---|---|
| १) | सीताबर्डी | ८ मे १९२१ |
| २) | महाल | १ ऑगस्ट १९२७ |
| ३) | वर्धा | १५ फेब्रुवारी १९३७ |
| ४) | भंडारा | १ एप्रिल १९३८ |
| ५) | आर्वी | १ जुलै १९३८ |
| ६) | जबलपूर | ११ फेब्रुवारी १९४१ |
| ७) | हिंगणघाट | ६ फेब्रुवारी १९४१ |
| ८) | आरमोरी | २४ मार्च १९४५ |
| ९) | ब्रम्हपुरी | २५ मार्च १९४५ |
| १०) | बिलासपुर | १४ एप्रिल १९४५ |
| ११) | वरोडा | २० मे १९४५ |
| १२) | सागर | १९४७ |
| १३) | चांदूर रेल्वे | १५ ऑगस्ट १९५१ |
| १४) | कुऱ्हा | ३१ ओक्टो. १९५१ |
| १५) | अमरावती | ३ मार्च १९५४ |
| १६) | अकोला | गुढीपाढवा १९५७ |

अनुक्रमणिका

१७)	करेली	१५ ऑगस्ट १९५८
१८)	नरसिंगपूर	५ जुलै १९४६

**संस्थेच्या विविध प्रवृत्ती :**

१) समाजकार्य महाविद्यालय (१९५८)
२) नंदनवन (१ एप्रिल १९६०)
३) पंचवटी (६ नोव्हेंबर १९६१)
४) मातृसेवा मासिक (१० नोव्हेंबर १९६६)
५) मुलांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय व विकलांग मुलांचे पुनर्वसन हा जोड प्रकल्प (५ एप्रिल १९८१).

अनुक्रमणिका

## संदर्भ सूची


- ‘कमलगंध’ – इंदुमती देशमुख
- ‘दिलासा’ – संपादक- इंदुमती देशमुख, डॉ. कुसुम वांकर
- एका वानप्रस्थाची कथा – रमेश गुप्ता
- सीताबर्डी सुतिकागृह नागपूर – रजत महोत्सव स्मृती ग्रंथ १९२०- १९४७
- मातृसेवा – नंदनवन विशेषांक, एप्रिल – मे १९७६
- मातृसेवा – महल शाखा नागपूर सुवर्ण महोत्सव विशेषांक, नोव्हेंबर – डिसेंबर १९७८ जानेवारी १९७९
- मातृसेवा – नंदनवन शाळा विशेषांक, एप्रिल – मे १९८३
- मातृसेवा – लक्ष्मीबाई तोष्णीवाल प्रसूतिगृह, अकोला, रजत जयंती विशेषांक, १९८३
- तरुण भारत – २३ डिसेंबर १९८४ डॉ. वि. स. जोग.
- मातृसेवा – नंदनवन रजत जयंती स्मरणिका, १९८५
- मातृसेवा – वृद्ध विशेषांक, डिसेंबर १९८२
- मातृसेवा – पंचवटी वृद्धाश्रम विशेषांक, फेब्रुवारी १९८७ १३ मार्च १९८८
- मातृसेवा – पंचवटी वृद्धाश्रम रौप्य महोत्सव सांगता अंक, १३ मार्च, १९८८
- मातृसेवा – संघ वर्धा शाखा सुवर्ण महोत्सव स्मरणिका, १९८८
- मातृसेवा – रजत महोत्सव विशेषांक, १९९१
- मातृसेवा – संघ जबलपूर शाखा सुवर्ण जयंती स्मरणिका, १९९१
- मातृसेवा – संघ विलासपूर सुवर्ण जयंती स्मरणिका, १९९५
- Matrusewa Sangh – Institute of Social work Souvenir-Silver Jubilee 1983-84
- Matrusewa Sangh – Sitabuldi, Nagpur. A Brief Overview October 1985 to June 1992
- विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ – डॉ. य. दि फडके.
- मराठी स्त्री-शक्तीचे राजकारणी रूप- रोहिणी गवाणकर.
- वृत्तपत्रांचा इतिहास- वि. कृ. जोशी, रा.के.लेल.
- श्रीमती रमाबाई रानडे : व्यक्ती आणि कार्य- माधवराव विद्वांस, सरोजिनी वैद्य
- मध्यप्रांत - वऱ्हाडातील डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ –वसंत मून
- शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोदक : पद्मजा फाटक
- स्त्रीस्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तन – विनया खडपेकर


अनुक्रमणिका

## मातृसेवा संघाला आणि मातृसेवा संघातील कार्यकर्त्यांना मिळालेले महत्वाचे पुरस्कार

| | |
|---|---|
| **दिनानाथ मंगेशकर पुरस्कार -** | मातृसेवा संघ |
| **इंडियन मर्चंट्स चेंबर -** | मातृसेवा संघ |
| **विमलाबाई तिडके पुरस्कार** | १) मातृसेवा संघ, नागपूर<br>२) मातृसेवा संघ, वर्धा शाखा |
| **पद्मश्री -** | श्रीमती कमलाताई होस्पेट |
| **जमनालाल बजाज पुरस्कार** | श्रीमती कमलाताई होस्पेट |
| **नलवा पुरस्कार -** | श्रीमती कृष्णाताई भावे |
| **सावित्रीबाई फुले पुरस्कार** | डॉ. सत्यबाला तायल,<br>श्रीमती लीलाताई गुप्ते |
| **दलित मित्र पुरस्कार -** | प्रमिलाताई दाणी |
| **अहिल्याबाई होळकर -** | श्रीमती कुमुद पाठक |
| **बा-बापू पुरस्कार -** | कमुताई लेले |

अनुक्रमणिका

## ‘अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण’
## या मालिकेतील इतर प्रकाशने

**महाराष्ट्र साहित्य परिषद**
म. श्री. दीक्षित / ५० रुपये

**मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य**
कृ. श्री. अर्जुनवाडकर / ५० रुपये

**प्रा. गं. बा. सरदार : व्यक्ती आणि कार्य**
हेमंत इनामदार / ६० रुपये

**काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य**
मृणालिनी जोगळेकर / १५० रुपये

**बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य**
मोहिनी वरदे / ६० रुपये

अनुक्रमणिका

आपल्या समाजातील आजारी स्त्रीची अवहेलना कमलाताईंच्या जिव्हारी झोंबली होती. जेथे आपल्या स्त्रियांचा, किंबहुना कोणत्याच जातिधर्माच्या स्त्रियांचा अपमान होणार नाही असे सूतिकागृह असावे या इच्छेने त्यांच्या मनात मूळ धरले...

कमलाताईंची कृती उत्स्फूर्त दिसते. त्यामागे माणसाविषयीचा कळवळा आहे. जिव्हाळा आहे. परोपकारी बुद्धी आहे. दयाळू अंतःकरण आहे. समाजमनाच्या समतोल सूक्ष्म अभ्यासातून येणारे वैचारिक अधिष्ठान नाही, पण कार्यकर्तीच्या अनुभवांतून आलेले व्यावहारिक शहाणपण आहे.

या शहाणपनातूनच आपला विचार अगदी सोप्या भाषेत, नित्याच्या उदाहरणांतून त्या जनतेपर्यंत पोहोचवूही शकत होत्या.

अनुक्रमणिका